॥ ॐ नमो श्रीआद्या ॥

श्रीज्ञानदेव सिद्धबेट तपोवन

ज्ञान-योग-अध्यात्म विद्यापीठ प्रतिष्ठानचे मुखपत्र

# ॥ बापरखुमादेविवरु ॥

सद्‌गुरु श्रीसंत ज्ञानेश्वर महाराजांच्या तत्त्वज्ञान आणि साहित्य-परंपरेच्या सर्वांगीण अभ्यासाला वाहिलेले एकमेव मराठी मासिक

**खण्ड ९ । अंक ८**

श्रीनृसिंह जयंती

वैशाख शु. १४, दिनांक : ७ मे २००९

मूल्य : रु. २०

वार्षिक शुल्क : रु.१७५

द्विवार्षिक शुल्क : रु. ३००

**संस्थापक**

वै.श्रीसंत प.पू.श्री.श्री.द.(मामा) देशपांडे

**संपादक**

शिरीष शांताराम कवडे

**सहसंपादक**

सौ.शकुंतला जयंत आगटे

**कार्यकारी संपादक**

डॉ.प्रल्हाद वडेर

**व्यवस्थापक**

निरंजन कुलकर्णी

वसंत महादेव पाटणकर

**मुखपृष्ठ आणि सजावट**

विजय गडकरी

**॥ श्रीवामनराज प्रकाशन ॥**

‘श्रीगुरुकृपा’, श्रीसंत मामासाहेब देशपांडे पथ,

आनंदनगर, सिंहगड रस्ता, पुणे - ४११ ०५१



या अंकातील लेखांत व्यक्त झालेल्या मतांशी अध्यक्ष, विश्वस्त व संपादक सहमत असतीलच असे नाही.




**वाचकांच्या माहितीकरिता**

‘बापरखुमादेविवरु’ या मासिकाचे मराठी महिन्यांप्रमाणे अनुक्रमे दर महिन्याला एक यानुसार वर्षाचे बारा अंक प्रसिद्ध होतील. वर्षारंभ आश्विन अंकापासूनच होईल. वार्षिक शुल्क एकशे पंचाहत्तर रुपये. द्विवार्षिक शुल्क केवळ तीनशे रुपये. किरकोळ अंकाचे मूल्य केवळ वीस रुपये.

## अनुक्रमणिका


- **अमृतानुभव : एक आस्वाद ।** डॉ.दत्तात्रेय ना.जोशी ४
- **सांडूनि कवणा भजावे : २४।** श्री.भालचंद्र बुर्से १४
- **श्रीक्षेत्र आळंदीमाहात्म्य ।** एक अप्रकाशित हस्तलिखित ३३
- **संत तुकाराम आणि संत कबीर;**
  **चरित्र व वाङ्मय : १० ।** डॉ.कृ.ज्ञा.भिंगारकर ३९
- **एका जीवननिष्ठाचा वाङ्मयीन परिचय : ६।** प्रा.जयंत वष्ट ५२
- **वारी : एक शोध; कीर्तन, सादरीकरण**
  **आणि विवेचन।** सौ. अंजली जोशी ६९
- **श्रीसंत ज्ञानदेवांची परम-भक्ती :**
  **स्वरूप आणि व्याप्ती ।** डॉ.ब.ना.तुरंबेकर ७९
- **श्रीसंत ज्ञानेश्वर आणि महानुभाव संप्रदाय।** डॉ.मीरा घांडगे ९०




# संपादकीय

आज ‘भगवान श्रीनृसिंह जयंती’च्या पावन पर्वावर, आपल्या हाती **‘बापरखुमादेविवरु’**चा नवव्या वर्षीचा हा आठवा अंक; वैशाख अंक येत आहे. सद्‌गुरुकृपेनेच मासिकाची नवव्या वर्षीची ही वाटचाल देखील सुखरूप होत आहे.

गेल्या वर्षीपासूनच या मासिक-प्रकाशनकार्यात जाणत्या, तळमळीच्या मनुष्यबळाची वानवा, चणचण भासू लागलेली आहे. इतर आर्थिक, व्यावहारिक अडचणींमधून एकवेळ कशीतरी वाट काढता येऊ शकते; पण मासिकाच्या दर्जाबाबत, तत्त्वांबाबत तडजोडी स्वीकारता येत नाहीत. त्यामुळे संपादक-मंडळ, संचालक-मंडळ व विश्वस्तांनी प्रदीर्घ विचाराअंती, जड अंतःकरणाने हे मासिक या वर्षाअखेर बंद करण्याचा निर्णय एकमताने घेतलेला आहे. या नवव्या वर्षीचा बारावा अंक; भाद्रपद अंक (सप्टेंबरचा अंक) हा त्यामुळे **‘बापरखुमादेविवरु’**चा शेवटचा अंक असेल.

मासिकाच्या नऊ वर्षांच्या सुखद, अविस्मरणीय मार्गक्रमणात आपण सगळ्यांनी आम्हांला नेहमीच मनोभावे सहकार्य केलेले आहे, उदंड प्रेम दिलेले आहे. खरेतर अनेक अडचणी सोसत, प्रतिकूल परिस्थितीतही इतके दिवस हे मासिक केवळ त्या स्नेहबळावर व सद्‌गुरुकृपेच्या अधिष्ठान-आश्रयावरच चालू राहू शकले. आपला कृपालोभ, सदिच्छा व आशीर्वाद नेहमीच आमच्या पाठीशी राहतील, याची आम्हांला मनोमन खात्री आहे.

मासिकाच्या ज्या हितचिंतक सभासदांनी पुढील वर्षाची वर्गणीही कार्यालयात भरलेली आहे, त्यांना संदर्भित रकमेच्या परताव्यासंबंधी कार्यालयातून स्वतंत्र पत्रसूचना पाठविण्यात आलेली आहे.

आपणां सगळ्यांच्या अंतरंग भावना जाणून, **‘बापरखुमादेविवरु’** कार्यालयीन परिवारातर्फे मी आपला मनःपूर्वक क्षमाप्रार्थी आहे ! आपण आजवर आपुलकीने, सहानुभूतीपूर्वक दिलेल्या सस्नेह सहयोगाकरिता आम्ही सारे आपले सदैव ऋणी आहोत.

**पुणे :** **- शिरीष शांताराम कवडे**
‘श्रीनृसिंह जयंती’,
वैशाख शु.१४, श्रीशके १९३१
दिनांक : ७ मे २००९



# अमृतानुभव : एक आस्वाद

**लेखांक : २३**

डॉ.दत्तात्रेय ना. जोशी

परा, पश्यंती, मध्यमा आणि वैखरी या चार वाणी अबोल होतात. परब्रह्माचे स्वरूप शब्दरूपाने, नादरूपाने दाखविण्यास त्या असमर्थ ठरतात. हे तत्त्व केव्हा ध्यानी येते ? तर परब्रह्माविषयी ज्ञान प्राप्त झाल्यावर; असे उत्तर संभवते, असे मानता येते. हे कसे शक्य आहे ? असा एखाद्यास संभ्रम पडला, तर त्यास उत्तर देताना माउली म्हणतात;

**चेइलियाही[१] पाठी । चेवणयांचिया[२] गोष्टी[३] ।**
**किं[४] धाला बैसे पाटीं[५] । रंधनाचां[६] ॥अमृ.५.६४॥**

धाला - तृप्त झाला.

१ = चेइलियाहि, २ = चेवणयाच्या, ३ = गोठी, ४ = कां, ५ = पाठीं, ६ = रंधनाच्या - श्रीज्ञानेश्वर महाराज संस्थान प्रत, पृष्ठ १९. १ = चेइलिया, २ = चेवणेंयाचिया, ३ = गोठी, ५ = पाठीं, ६ = रंधनाचेया - श्री.निरंजन रघुनाथ कृत अनुभवामृत-पदबोधिनी, पृष्ठ ८६. २ = चेवणयाच्या, ३ = गोठी, ६ = रंधनाच्या - श्री.बाबा गर्दे कृत श्रीअमृतानुभव, पृष्ठ ७२. १ = चेइलिया, २ = चेवणयाच्या, ३ = गोठी, ४ = कीं, ५ = पाठीं, ६ = रंधनाच्या - श्री.ना.पै.पंडित कृत अमृतानुभव कौमुदी, चतुर्थ आवृत्ती, पृष्ठ २६७. १ = चेइलिया, २ = चेवणयाच्या, ३ = गोठी, ४ = कीं, ५ = पाठीं, ६ = रंधनाच्या - पू.श्री.जोग महाराज कृत सार्थ अमृतानुभव, सातवी आवृत्ती, पृष्ठ १६७.

जागे झाल्यावर जागे करण्याच्या गोष्टी कोणी करतो का ? तसे करणे जसे अगदी व्यर्थ असते, तशाच प्रकारे ज्ञान झाल्यावर पुन्हा काही करायचे आहे, पुन्हा काही मिळवायचे आहे असे म्हणता येत नाही. तसे करणे निरर्थक असते. जोपर्यंत तुम्हांला क्षुधा आहे, भूक लागली आहे; तोपर्यंतच तुमच्या मनात भोजनाविषयी, स्वयंपाकाविषयी आस्था असते. पाकसिद्धी केव्हा होईल ? आपण केव्हा जेवू ? अशी ओढ लागलेली असते तोपर्यंतच आपण भोजनासाठी आसुसलेले असतो. भोजन मिळवण्यासाठी आपण प्रयत्नशील असतो. भोजन सिद्ध झाले, तुमच्या

समोर ते आले आणि तुम्ही त्याचा यथेच्छ आस्वाद घेतलात की, भोजनाविषयीची तुमची आस्था संथ गतीने लोप पावते आणि त्या आस्थेच्या ठायी समाधान येऊन बसते. मनासारखे भोजन मिळाल्यामुळे तुम्ही तृप्त झालात की, पुन्हा स्वयंपाकगृहाकडे तुमचे पाय वळत नाहीत. किंबहुना तुम्ही पाकशाला सोडता, शांत मनाने तेथून बाहेर पडता. पाकशालेत शिरावे, तेथेच बसावे असे तुम्हांस वाटत नाही. हे जसे आपल्या नित्याच्या अनुभवाचे असते, अगदी तसेच ज्ञानाच्या संदर्भात असते.

या अनुभवाचे उदाहरण देऊन माउलींना असे सांगायचे आहे की, 'असंदिग्ध' म्हणजे स्पष्ट; तसेच अविपर्यस्त म्हणजे जसे शुद्ध स्वरूप असते, तसे ब्रह्मवस्तूसंदर्भातले नित्य, समक्ष ज्ञान झाल्यावर मग उगाच कोण कशाला केवळ तत्त्वज्ञानाच्या गोष्टी करीत बसेल ? परब्रह्माचे ज्ञान झाल्यावर, इतर श्रवण, मनन, जप, तप अशा साधनांचा त्यास कोणता लाभ होणार आहे ? तो ज्ञानी अशा साधनांचा उपयोग करून घेण्यास प्रवृत्त होणार नाही. कारण आता त्याला त्यांची आवश्यकता नसते. आपले हे म्हणणे स्पष्ट करण्यासाठी माउली सूर्योदय आणि दिवे यांचे उदाहरण घेत म्हणतात;

**उदेलेया[१] दिवसपती[२] । ते[३] [४]दिवे कैसे[५] शोभती[५] ।**
**वांचौनि[६] पिकला[७] शेतीं[८] । सुजती[९] नांगर काई ॥ अमृ.५.६५ ॥**

१ = उदैजलिया, ४ = कीं, ५ = सेजे येती, ६ = वांचूनि, ७ = पिकलां, ९ = सुइजताती - श्रीज्ञानेश्वर महाराज संस्थान प्रत, पृष्ठ १९. १ = उदेलिया, २ = दिवसपति, ४ = किं, ५ = सेजे येति, ६ = ×, ८ = सेतिं, ९ = सूजती - श्री.निरंजन रघुनाथ कृत अनुभवामृत-पदबोधिनी, पृष्ठ ८७. १ = उदैजलिया, ४ = कीं, ५ = सेजे येती, ६ = वांचूनि, ७ = पिकल्या, ८ = सेती, ९ = सुजताती - श्री.बाबा गर्दे कृत श्रीअमृतानुभव, पृष्ठ ७३. १ = उदैजलिया, ३ = तैं, ४ = कीं, ५ = सेजे येती, ६ = वांचूनि, ७ = पिकल्या, ९ = सुजताती - श्री.ना.पै.पंडित कृत अमृतानुभव कौमुदी, चतुर्थ आवृत्ती, पृष्ठ २६७. १ = उदेलिया, २ = दिवसपति, ३ = तैं, ४ = कीं, ५ = सेजे येती, ६ = वांचूनि, ७ = पिकलां, ९ = सुइजताती - पू.श्री.जोग महाराज कृत सार्थ अमृतानुभव, सातवी आवृत्ती, पृष्ठ १६५.

जसे सूर्योदय झाल्यावर दिवे झोपायला लागतात, ते निस्तेज होतात, म्हणजेच त्यांचे अस्तित्व नसल्यासारखे होते. तसेच शेतामध्ये असलेले पीक काढून झाल्यावरच शेत नांगरतात. पीक असताना नांगरट केली जात नाही, हे आपणांस माहीत असते. या दोन उदाहरणांचा अर्थ स्पष्ट आहे. एकदा का



ज्ञानाचा सूर्योदय झाला की तेथे अन्य उपायांची, दुसऱ्या साधनांची आवश्यकता उरत नाही. सूर्योदय झाल्यावर जसे दिवे निरूपयोगी होतात, तसे परब्रह्म म्हणजे काय ? जीव म्हणजे कोण ? ही बंधने कशामुळे आली ? ती कशी नाहीशी केली जातात ? या संबंधातले ज्ञान प्राप्त झाल्यावर जीवदशा नाहीशी होते. संपूर्ण जग हे मुक्त आहे. सर्वत्र ब्रह्म भरून राहिले आहे, या परब्रह्मावाचून अन्य काही नाहीच असा विचार दृढ होतो. असे झाले की, त्याला कर्तव्यस्वरूप कुठलेच कर्म बांधून ठेवत नाही. जन्माला आला असल्याने, शरीरधर्मासाठी जे करणे आवश्यक असते, केवळ तेवढेच त्याला करावे लागते. आपला हा विचार स्पष्ट करण्यासाठी 'शेत', 'नांगरट', 'उभे पीक' यांचे उदाहरण घेत, माउली आपल्यापुढे स्पष्टीकरण करतात.

जसे आधी शेत नांगरायला लागते, त्यात लागवड घालावी लागते, मग बीज पेरावे लागते, ते झाकावे लागते, पुढे पाऊस पडून ते उगवल्यावर त्याचे रक्षण करावे लागते; तसे आपले असते. मन हे चंचल असते. त्याच्यावर संस्कार करायचे. मग त्यात सातत्याने संयमाची, अभ्यासाची लागवड घालायची. गुरुकृपेचे बीज पेरायचे, नित्याच्या साधनेचा जलवर्षाव करायचा. पीक उगवले म्हणजे कार्य झाले असे न मानता, षड्रिपू किंवा अन्य दोष यांचा उपद्रव होणार नाही याची दक्षता घेत त्या पिकाचे रक्षण करायचे. पीक डोलू लागले तरी दक्ष राहून, ते फुलोऱ्यावर येईपर्यंत जागे राहायचे आणि एका क्षणी ते कापून त्याची रास करायची, त्याला घरी आणायचे. हे सारे झाल्यावरच कष्टाचे वा साधनेचे फळ मिळाल्यासारखे होते. 'नांगर' हे प्रतीक आहे. नांगर हा शेतात बीजोत्पादन वाढवण्यास जसा साहाय्यभूत होतो, तसाच उपजाऊ असलेल्या शेतास हानिकारक होईल अशीही कृती करू शकतो. म्हणजेच त्याचे उपयोजन विचारपूर्वक करावे लागते. विधायक आणि विध्वंसक अशी दोन्ही कामे नांगर करू शकतो.

माउली या अनुभवाचा लाभ घेत म्हणतात की, ''तरारून आलेल्या, फुलोऱ्यावर असणाऱ्या पिकावर बुद्धिमान शेतकरी नांगर फिरवीत नाही. योग्य वेळी योग्य रीतीनेच तो त्या नांगराचे साह्य घेतो. असा हा प्रकार म्हणजे मुमुक्षूची वाटचाल होय.'' म्हणजे एका अर्थाने, परब्रह्मासंबंधी ज्ञान

मिळवण्याचा हा प्रयत्न असतो. ज्ञानी मनुष्य, उचित आणि वेदांनी सांगितलेल्या कर्माच्या अनुष्ठानाने चित्तशुद्धी करून घेतो. चित्तशुद्धी होत गेली की, ज्ञानप्राप्ती होत जाते. नरदेहरूपी क्षेत्रात समाधानाचे आणि ज्ञानाचे पीक तरारून आले तरच, आता त्याला कोणतेच अन्य कष्ट घेण्याचे कारण उरत नाही. त्या मुमुक्षूचे जीवन 'सफल' होते, 'सार्थ' होते, 'सानंद' होते, 'सास्मित' होते. 'सास्मित' म्हणजे जेथे रज, तम या गुणांचे आधिक्यच नव्हे तर त्यांचे अस्तित्वच अत्यंत न्यून होते आणि केवळ सत्त्व गुणाचेच आधिक्य राहते अशी स्थिती होय. सत्त्व गुणाच्या अशा आधिक्यामुळे **'हे विश्वचि माझे घर ।'** अशी त्याची भावना दृढ होते. तो ज्ञानी झालेला असल्याने, या जगाची बंधने त्याला बांधू शकत नाहीत. अर्थात् येथे एक गोष्ट अगदी स्पष्ट आहे; ती म्हणजे हे ज्ञान सुद्धा अज्ञान नाहीसे झाल्यावर प्राप्त होते असे मानले जाते, ते सुद्धा योग्य नाही. ज्ञान आणि अज्ञान हे दोन्ही प्रकार नाहीसे व्हायला हवेत. यासाठी माउली पुढे म्हणतात;

**म्हणौनि[1] बंधमोक्षाचें व्याज । नाही[2] निमालें[3] काज ।**
**आतां निरूपणाचें[4] भोज । वळघैल[5] काय[6] ॥ अमृ.५.६६ ॥**

भोज - आदर, कौतुक. वळघणें - चढणे. वोळगणे - आश्रय करणे, राबणे. व्याज - निमित्त.

१= म्हणोनि, ५ = वोळगे, ६ = जऱ्ही - श्रीज्ञानेश्वर महाराज संस्थान प्रत, पृष्ठ १९. २ = ×, ३ = निमालिया जालें, ४ = निरूपणभोज, ५ = वळघेल, ७ = काई - श्री.निरंजन रघुनाथ कृत अनुभवामृत -पदबोधिनी, पृष्ठ ८७. १ = म्हणोनि, ४ = निरूपण, ५ = वोळगे, ६ = जऱ्ही - श्री.बाबा गर्दे कृत श्रीअमृतानुभव, पृष्ठ ७३. ४ = निरूपण, ५ = ओळगे, ६ = जरी - श्री.ना.पै.पंडित कृत अमृतानुभव कौमुदी, चतुर्थ आवृत्ती, पृष्ठ २६८. १ = म्हणोनि, ४ = निरूपण, ५ = वोळगे, ६ = जरी - पू.श्री.जोग महाराज कृत सार्थ अमृतानुभव, सातवी आवृत्ती, पृष्ठ १६५.

आपण एक गोष्ट ध्यानी घ्यायला हवी ती ही की, परब्रह्माच्या ठायी ज्ञान-अज्ञान असा भाव नसतो. बंध, त्या बंधापासून मुक्तता, हा सारा प्रयास, ही सारी कल्पना, हे निमित्त, यासाठी ज्ञान हवे असा जो विचार आपण करतो त्याचाही उपयोग नाही; उपयोग नसतो. अशा शब्दांचे साह्य घेऊनही जरी आपण निरूपण करीत, विवेचन करीत परब्रह्माविषयी काही सांगण्याचा यत्न केला तरी, अथवा ज्ञानाचे कौतुक करीत किंवा ज्ञान-अज्ञान या निमित्ताने काहीही परब्रह्माविषयी सांगत बसलो तरी ते व्यर्थ असते. बंध-मोक्ष हे आहेत,



असतात; आणि हे बंध आहेत त्यामुळे आपले अज्ञान आहे. अथवा त्यापासून मुक्तता हवी असे कितीही ओरडून सांगत आपण कार्य करीत राहिलो तरी त्यातही तथ्य नसते. कारण शब्दांच्या साह्यानेच आपण हे काम करीत असतो. हे कार्य म्हणजे तरी काय असते ? तर ते ब्रह्मनिरूपणच असते ना ? मग असे हे विवेचन करीत असता, आपण नकळत द्वैताचा आश्रय करीत नसतो का ? द्वैत स्वीकारून अथवा नकळत द्वैत मानून, आपण आपली नित्य असणारी ब्रह्मस्थिती त्याक्षणी विसरत नसतो का ? आपला हा विचार स्पष्ट करताना माउली पुढे म्हणतात;

**आणि पुढिलां कां[1] आपणपें[2] । [3]विसराचेनि हातें हारपे[4] ।**
**[5]तैं [6]शब्देंचि घेणे । आठौनियां[7] ॥ अमृ.५.६७ ॥**

१ = आपणापें, ३ = वस्तु, ५ = मग, ६ = ×, ७ = आठवूनियां - श्रीज्ञानेश्वर महाराज संस्थान प्रत, पृष्ठ २०. २ = आपणापें, ३ = जें, ५ = तें - श्री.निरंजन रघुनाथ कृत अनुभवामृत-पदबोधिनी, पृष्ठ ८८. १ = का, २ = आपणापे, ३ = वस्तु, ४ = हरपे, ५ = मग, ६ = ×, ७ = आठऊनियां - श्री.बाबा गर्दे कृत श्रीअमृतानुभव, पृष्ठ ७३. १ = का, २ = आपणापे, ३ = वस्तु, ४ = हरपे, ५ = मग, ६ = ×, ७ = आठवुनिया - श्री.ना.पै.पंडित कृत अमृतानुभव कौमुदी, चतुर्थ आवृत्ती, पृष्ठ २६८. २ = आपणापे, ३ = वस्तु, ५ = मग, ६ = ×, ७ आठवूनियां - पू.श्री.जोग महाराज कृत सार्थ अमृतानुभव, सातवी आवृत्ती, पृष्ठ १६५.

दुसरा किंवा आपण, आपण आणि ब्रह्मस्थिती या सर्वांना जाणताना, त्यांचे ज्ञान प्राप्त करीत असताना, आपण एका अर्थाने प्रत्येकाला विसरून जात असतो. अर्थात् हे विसरून जाणे हेही शब्दांचे साह्य घेऊनच आपण केलेले असते. म्हणजेच अज्ञान नाहीसे केले असे आपण जेव्हा म्हणतो, तेव्हा आपण केवळ शब्दांचेच साह्य घेतलेले नसते का ? किंवा 'मला ज्ञान प्राप्त झाले' असे म्हणणे हेही शब्दांनीच व्यक्त झाले नाही का ? या सर्वांचा अल्पांशाने असा अर्थ होतो की, अज्ञान नाहीसे झाल्यावर ज्ञान मिळाले असे म्हणणे हे शब्दांनीच व्यक्त केलेले असते आणि हे शब्द तर ज्ञान मिळाल्यावर लुप्त होतात, नाहीसे होतात. कारण ज्ञान होणे म्हणजे एका अर्थाने आपण त्या परब्रह्माचे स्वरूप आहोत ही जाणीव होणे. पूर्वी आपण म्हणजेच हे शरीर, हा संसार, हे विश्व अशी जी संकल्पना केली होती, त्या संकल्पनेचे विस्मरण करणे होय, तो विचार सोडणे होय, ते मत संपूर्णपणे विसरणे होय.

मात्र येथेही एक गोम आहेच. हे विस्मरण, हे विसरणे आपण कसे व्यक्त करतो ? शब्दांनीच ना ? मात्र हेही सत्य नव्हेच. कारण विस्मरण, विसरणे हे सारे फसवे आहे, त्यात तथ्य नाही. मुळात ज्ञान म्हणजे 'परब्रह्म' असे जे आपण मानतो, ते शब्दांमुळे व्यक्त झालेले असते. असे हे शब्द त्या परब्रह्मात नसतातच. परब्रह्म हे वाणीच्या अतीत, शब्दांच्या पलीकडचे, शब्दांनी व्यक्त करता येणार नाही अशा पद्धतीचे अरूप, अगम्य असे असते. आणि म्हणूनच एक विसरायचे नि दुसरे आठवायचे हा प्रकारही फसवाच आहे. ते आठवणे, विसरणे हे केवळ अल्पांशाने सत्य आहे. माउली हेच या पाचव्या प्रकरणाच्या अंतिम ओवीत (किंबहुना, आपल्या दोनशे सत्त्याऐंशीव्या ओवीत) सांगतात. ते म्हणतात;

**येतुलिया परौतें । चांगावें नाहीं शब्दातें ।**
**स्मारकपणें कीर्तीतें । भोगी हा जगीं ॥ अमृ.५.६८॥**

परौता - पलीकडे, पेक्षा. चांगावा - चांगूलपणा, श्रेष्ठत्व.

श्री.निरंजन रघुनाथ कृत अनुभवामृत-पदबोधिनीमध्ये, ही व ह्याच्या पुढची अशा दोन ओव्या या सहाव्या प्रकरणाची पहिली आणि दुसरी ओवी म्हणून स्वीकारलेल्या आहेत.

शुद्ध स्वरूपाचे ज्ञान स्वयंप्रकाश असते. तेच परब्रह्म असते. ते स्वयंप्रकाशी असल्याने तेथे अज्ञान असतच नाही. अशा रीतीने, अज्ञानाने झाकलेले ब्रह्म संभवतच नाही. म्हणजेच त्याचे प्रमेयत्व (सिद्ध करण्यासमान गोष्ट) संभवत नाही. ते सिद्ध करता येत नाही. एखादी गोष्ट सिद्ध करायची म्हणजे तरी काय केले जाते ? तर नाव, जात, लिंग, संबंध, गुण इत्यादींपैकी एकेकाचा वा समूहाचा आधार घेत वा इत्यादी धर्मांचा पुरस्कार करीत, शब्द आपल्या त्या अर्थाने त्या गोष्टीचा बोध करून देत असतो. मात्र त्या परब्रह्माकडे असा प्रकारच नाही. 'विष्णू', 'हरी', 'घट', 'पट' इत्यादी नावे देऊन, त्या वस्तूंविषयी 'भेद' दाखवून अथवा 'सामंजस्य' दाखवून, आपण शब्दांच्या साह्याने त्या गोष्टीचे वा वस्तूचे स्वरूप दाखवून देत असतो. परब्रह्माकडे असा 'भेद'ही नसतो अथवा असले 'साधर्म्य' दाखवावे अशी स्थितीही नसते. म्हणून तेथे शब्दांना स्थान नाही.

'ज्ञान' अथवा 'साक्षात्कार' हे दोन्ही अनुभवजन्य असतात. संत किंवा



साक्षात्कारी व्यक्ती सोडून आपण सारेजण, देहात्मबुद्धीने जगाकडे तसेच परब्रह्माकडे पाहत असतो. परब्रह्मावर 'आवरण' घालून, 'आच्छादन' घालून आपण त्याला 'पाहण्या'चा यत्न करतो. परब्रह्माकडे 'पाहता' येत नाही. ते 'दिसणार' नाही. केवळ त्याचा 'अनुभव' घेता येतो. तेही देहात्मबुद्धीचा त्याग केल्यावरच, संतांच्या शिकवणुकीनुसार वर्तन ठेवले तरच ! आणि म्हणूनच 'विस्मरण' वा 'विसर' असे करून काहीही साध्य होत नाही. एकाचा 'विसर' करायचा म्हणजे दुसऱ्या कोणत्या तरी अन्य वस्तूचा 'आठव' करायचा असे ठरते. हा आठव नाम, रूप इत्यादींनी केला जातो; तोही शब्दांच्या साह्याने. पण परब्रह्माकडे असे नाम, रूप इत्यादी प्रकार नाहीतच ! परब्रह्म कसे आहे ? हे सांगताना, अन्य स्थानी ('भावार्थदीपिके'त म्हणजेच 'ज्ञानेश्वरी'त) माउलींनी म्हटले आहे;

**नाम, रूप, संबंधु । जाति क्रिया भेदु ।**
**हा आकारासीच प्रवादु । वस्तुसि नाही ॥ ज्ञाने.१५.९०४॥**

नाम, रूप, संबंध हे भेद, हा प्रवाद केवळ साकारालाच संभवतात आणि परब्रह्म हे तर निराकार, अरूप, नामरहित असते. तेव्हा त्याला या शब्दांचे काही देणे घेणे नसते. परिणामतः शब्द हे निरूपयोगी ठरतात.

याचा अर्थ असा की, बंध वा मोक्ष या संदर्भातले निमित्त सरल्यावर तेथे निरूपण, विवेचन इत्यादींचा उपयोग होत नाही. आधी ध्वनिरूपी वेद मग वर्णस्वरूपी शब्द, आणि अंतिमतः नामरूपी जगत् या न्यायाने आपण परब्रह्माची, जगाची आणि आपली 'ओळख' करून देत असतो. त्यासाठी चार 'वाणी' आपल्या साह्यास येतात. म्हणजेच 'विस्मरण' वा 'स्मरण' यासाठी शब्दांचे साह्य घेतले जाते. मात्र या शब्दाची थोरवी 'स्मरण' वा 'विस्मरण' करून देण्याइतपतच आहे; यापेक्षा त्याला अन्य महत्त्व नाही.

कारण परब्रह्माची अशी स्वयंसिद्ध स्थिती आहे. त्या परब्रह्मासंबंधी विपरीत कल्पना, त्याच्या संबंधांचे प्रतिबंध यांमुळे परब्रह्माचे विस्मरण झालेले असते. हा जो प्रतिबंध आहे, हा जो अडथळा आहे तो नाहीसा करण्यासाठी शब्दांचे साह्य घेतले जाते; असा या ओव्यांचा भावार्थ आहे. श्रीमदाद्य

शंकराचार्य महाराज काय अथवा श्रीज्ञानेश्वर माउली काय; उभयता म्हणतात की, ''जीवाने आपल्या अविचाराने आपल्याविषयी विपरीत कल्पना करून घेतल्या. त्या विपरीत कल्पनाच नाहीशा करायच्या असतात. ब्रह्मज्ञान 'करून देण्याचा' प्रयत्न करायचा नसतो. कारण ब्रह्म हे अत्यंत परिचित असेच आहे. अत्यंत परिचित म्हणजेच केवळ तुमचे, तुमच्यापाशी असणारे आत्मस्वरूप ब्रह्म !''

अविद्यादी दोषांमुळे, ते जीवाला अत्यंत जवळ असूनही अनोळखी वाटते, आपल्याहून भिन्न भासते. 'मी ब्रह्म जाणत नाही', अशी जी त्याने ब्रह्मविस्मृतीची कल्पना आपल्याशी करून घेतलेली आहे, ती नाहीशी करण्यासाठी काही वेळेला द्वैताचा आश्रय करून, काही वेळेला दृष्टांताचा लाभ घेत, केव्हा तरी उपपत्ती म्हणजे युक्तीस उपयोगात आणून, यथार्थ अनुभव देऊन कल्पना करून दिली जाते आणि मग कल्पनारहित परब्रह्माशी एकरूप होण्यासाठी त्या कल्पनाही सोडून देण्यास सांगण्यात येते. सारांश; शब्दांचा उपयोग आत्मविस्मृती नाहीशी करून आत्मस्मृती करून देण्याकरिताच आहे. शब्दांचा उपयोग 'ब्रह्मदर्शन' करून देण्यासाठी कधीही नसतो. ज्ञानेश्वरीच्या अठराव्या अध्यायात माउली म्हणतात;

**तैसा आत्मदर्शनीं आडळु । असे अविद्येचा तो मळु ।**
**तो शास्त्र नाशी येरु निर्मळु । मी प्रकाशरूपें ॥ज्ञाने.१८.१२३२॥**

''त्याप्रमाणे आत्मदर्शनाला प्रतिबंध करणारा असा जो अविद्येचा मल आहे, तो मल शास्त्रे (शब्दांच्या साह्याने) नाहीसा करतात एवढेच. याविना मी जो स्वयंसिद्ध, स्वतःसिद्ध निर्मळ स्वरूपी आहे, तो (मी) आपल्याच प्रकाशाने प्रकाशित होत असतो.''

त्या आत्मसिद्धाला अन्य कोणत्याच वस्तूची, शास्त्राची वा उपायांची आवश्यकता नसते. परिणामतः शब्दही निरूपयोगी ठरतात. म्हणजेच 'सच्चिदानंद' ह्या पदाच्या अथवा 'सत्ता', 'प्रकाश', 'सुख' यांच्याही पलीकडे 'ते' (परब्रह्म) असते आणि आहे.

येथे एका अर्थाने, 'अनुभवामृता'चे (अमृतानुभवाचे अथवा सिद्धानुभवाचे) पाचवे प्रकरण आटोपते घेतले आहे, संपवले आहे.



या पाचव्या प्रकरणात, माउलींनी 'सच्चिदानंदा'चे विवरण केलेले आहे. श्रुतीने या जीवाला त्याच्या मूळ ब्रह्मस्वरूपाची म्हणजेच सत्, चित्, आनंद (अथवा सत्ता, प्रकाश, सुख) या तीन पदांची ओळख करून दिलेली आहे. मुळात ब्रह्म हे अशा तीन धर्मांचे नाहीच ! 'अमृत' म्हटले की तेथे जसे अमृतच असते, तसे 'ब्रह्म' म्हटले की तेथे केवळ ब्रह्मच असते. हे सत्य असले तरी, जीव हा 'वृत्तिरूप' असतो; मनाच्या स्थितीचा अवलंब करणारा असतो. त्यामुळे मनाच्या स्थितीनुसार तो प्रत्येक वस्तूमधील अंशांचा अनुभव घेत असतो.

चंद्राला कला असतात, त्या दिसतात हे सत्य आहे. मात्र या भिन्न भिन्न कला कोणाला दिसतात ? जो चंद्राहून भिन्न असतो अथवा दुसरा असतो त्यालाच त्या दिसतात. आपल्याला कला आहेत हे चंद्राला माहीत नसते. तो जसा आहे तसाच स्वतःला पूर्ण मानतो. कारण तशा कला चंद्राच्या ठायी नसतात. आपल्याला कला दिसतात, म्हणजे आपल्या मनामध्ये असणाऱ्या त्या त्या वेळची स्थिती जशी असते तशा त्या दिसतात. म्हणजेच जीवाची जशी मनःस्थिती असते तशी त्याची दृष्टी होते. 'मी जड देह आहे', 'मी विनाशी आहे', 'मी दुःखी आहे' इत्यादी विपरीत कल्पना करून घेतल्यामुळेच तशी मनःप्रवृत्ती निर्माण झालेली असते. **'शिवोऽहं'**ची संकल्पना करून, ही विपरीत कल्पना नाहीशी करायची असते. **'निर्वाणषटकम्'**मध्ये श्रीमदाद्य शंकराचार्य महाराज स्पष्टपणे म्हणून गेले आहेत;

**मनोबुद्ध्यहंकारचित्तानि नाहं कर्णं न जिव्हा न च घ्राणनेत्रे ।**
**न च व्योम भूमिर्न तेजो न वायुश्चिदानन्दरूपः शिवोऽहं शिवोऽहं ॥**

- निर्वाणषटकम् वेदान्त संदर्भ, पृष्ठ ३७३

जेवढ्या काही विपरीत म्हणजे स्वरूपाला विसरून आणि त्या स्वरूपाला धरून केलेल्या कल्पना असतात, त्या कल्पनाच नाहीशा करायच्या असतात. ब्रह्मज्ञानाकरता प्रयत्न करण्याची आवश्यकता नाही. कारण ब्रह्म हे आपले स्वरूपच असते. विपरीत कल्पना गेल्या की, मागे उरते ते ब्रह्मच असते. सत्य वा असत्य कल्पना या आपल्या बुद्धीत असतात. त्या नाहीशा केल्या की, हीच बुद्धी आत्माकार होते आणि मग शब्द, प्रमाण, अनुभव

किंवा जाणीव अशी स्थिती नाहीशी होते. या प्रवृत्ती कुणीतरी दुसरा असला तरच निर्माण होतात. आपण अलग राहिलो तरच असे सुचत जाते. पण जर हा जीवच आत्माकार झाला, तर ही तिन्ही पदे वाटेला लागतात. जी प्रतीती, जो अनुभव उत्पन्न होतो; त्याचीच आटणी करायची असते.

'आत्माकार' हाही दोन प्रकारचा आहे. एक आहे 'सगुण आत्माकार' तर दुसरा आहे 'निर्गुण आत्माकार'. नाम-रूप-गुण विरहित आत्माकार म्हणजे 'निर्गुण आत्माकार'. नाम-रूप-गुण इत्यादींसहित प्रेम, भक्ती, श्रद्धा इत्यादींच्या साह्याने आपल्याला 'अनन्य' होता येते. असे अनन्य होत, सगुणाचा आधार घेत आपल्याला स्वतःचे विस्मरण करायचे असते. असे विस्मरण करणे हा असतो 'सगुण आत्माकार' ! व्यवहारात निर्गुण आत्माकार होता येत नाही. माउलींनी या दोन्ही प्रकारच्या आत्माकारांसंदर्भात विवेचन केलेले आहे. कापूर, सुवर्ण इत्यादी उदाहरणांनी हे दाखवून दिलेले आहे.

कुणी म्हणतील सगुण आत्माकार म्हणजे नाशवंत स्वरूप नव्हे काय ? अर्थात् अशी शंका घेणे म्हणजे केवळ व्यर्थ वाद घालण्यासारखे आहे. कारण या सगुण आत्माकारामध्येही निर्गुण आत्माकार अंशरूपाने असतोच. अधिकात अधिक एवढे म्हणता येईल की, निर्गुण आत्माकाराच्या आधीची ती अवस्था आहे. सगुण आत्माकाराच्या आधारावरच निर्गुण आत्माकाराकडे जाता येते. योगशास्त्रात 'सविकल्प समाधी' घेतल्यानंतर 'निर्विकल्प समाधी' घेता येते (संस्कृतात 'समाधी' हा शब्द पुल्लिंगी आहे.) असे म्हटले आहे.

**तत्र शब्दार्थज्ञानविकल्पैः संकीर्णा सवितर्का समापत्तिः ॥१.४२॥**

**स एव सबीजः समाधिः ॥१.४६॥**

**तस्याऽपि निरोधे सर्वनिरोधान्निर्बीजः समाधिः ॥१.५१॥**

- पा.यो.सू. स.पा.

''समाधीत 'संप्रज्ञात' आणि 'असंप्रज्ञात' असे दोन प्रकार असतात. 'संप्रज्ञात' समाधीत चित्ताला सूक्ष्म आलंबने देत देत, अखेरीस ते चित्त केवळ 'मी आहे'; 'अस्मि' या शुद्ध आणि अतिसूक्ष्म आलंबनावर स्थिर करायचे असते. त्यानंतर, 'अस्मि' या स्फुरणाचाही उपशम करून घेतल्यावरच 'असंप्रज्ञात समाधी' सिद्ध होत असते. येथे जीवाला आपल्या तात्त्विक स्वरूपाचा प्रत्यय येतो.



हाच 'आत्मसाक्षात्कार' होय. यालाच योगशास्त्रात 'कैवल्य' असे म्हटले आहे. (पातंजल योगदर्शन; लेखक - श्री.कृ.के.कोल्हटकर; पृष्ठ २७४; प्रकाशक - श्री.के.भि.ढवळे; तृतीय आवृत्ती शके १८९७).

'जेथे बोल खुंटतो तीच अनिर्वाच्य शाश्वत ब्रह्मस्थिती होय', असे म्हणता येते.

**- (क्रमशः)**

□□

# सांडूनि कवणा भजावे

**लेखांक : २४**

श्री.भालचंद्र बुर्से

**माझे हे मंगळसूत्र, श्रीमद् भागवत शास्त्र ॥१॥**
**तेचि आर्यपुत्रमूर्ति, ऐसी पुराणांत कीर्ती ॥२॥**
**कंठी धरीन आवडी, शोभा हृदयाची फुडी ॥३॥**
**स्वामी आळंदीजीवन आदिमध्यांती प्रमाण ॥२९५.४॥**

- श्रीगुलाबराव महाराजांच्या अभंगांची गाथा.

विदर्भज्ञानेश्वर परमसद्गुरु श्रीगुलाबराव महाराजांची ही अभंगश्रुती. 'श्रीमद् भागवत' ही आर्यपुत्र श्रीकृष्णमूर्ती; माझ्या हृदयाची शोभा ! त्यांच्या नावाचे हे मंगळसूत्र मी माझ्या कंठात प्रेमाने धारण करीन. भगवान श्रीकृष्णांची माधुर्यभक्ती श्रीगुलाबराव महाराजांच्या ठायी अत्युच्च कोटीची. भागवत शास्त्र, भागवत-धर्म, श्रीकृष्ण-धर्म या सच्चिदानंद शब्दश्रुतींत ओतप्रोत रूपात. जसे नाम-रूपांचे अद्वैत, तसेच भगवान श्रीकृष्णांचे आणि तत्स्वरूप भागवत श्रुतींचे. म्हणून हे भागवत शास्त्र महाराजांचे मंगळसूत्र. या सर्व श्रुतींनी, आपापली संपूर्ण सार्थकता श्रीमहाराजांच्या जीवनात अनुभवली.

## नाथ महाराजांचा विचार :

वेद-शास्त्र-पुराणे ही बाजूला राहोत, पण प्रत्यक्ष श्रीकृष्ण भगवंतांनी आपल्या मुखाने हेच सांगितले आहे की, **'मी सर्वथा भक्तिअधीन ।'** भगवंतांच्या उक्तीत भक्तीलाच प्राधान्य. इतकेच नव्हे तर, साक्षात् श्रीकृष्णप्रभूंनी आपले चारी बाहू उभारून निजात्मप्राप्तीचा उपाय सांगताना, **'भक्त्याहमेकया ग्राह्यः ।'** असे सांगितलेले आहे. गजेंद्राचा उद्धार, परीक्षिताचे गर्भातच संरक्षण, अंबरीषाचे गर्भवास चुकवणे इत्यादी अनेक उदाहरणांतून **'अहं भक्तपराधीनः ।'** हे भगवंतांचे ब्रीद सहजच दृष्टोत्पत्तीस येते.

भगवंतांनी वनचर वानर तारले. अस्वलांच्या उद्धारास्तव गुहेत प्रवेश केला. नाना तऱ्हांचे, विचारांचे, विवेकी वा अविवेकी सुद्धा गवळी, गोधने, श्रीकृष्णसखे, सवंगडी, गोपाळ हे सारे भगवंतांच्या अनन्य प्रीतीने उद्धरून गेले. (अज्ञानी जनांना वाटणाऱ्या) जारभावनेने गोपी श्रीकृष्णांवरील परमप्रीतीमुळे उद्धरल्या. भगवंतांनी त्यांच्या सुलभ प्राप्तीसाठी शास्त्रादी न पढता, काठिण्यपूर्ण साधनांची उपासना न करता, भागवतातून भक्तिशास्त्र प्रकट केले. ही;

**अज्ञानालागी निज पव्हे । भवाब्धि तरावया भजनभावे ।**
**महानाव देवे । निर्माण केली ॥ ए.भा.२.३१९॥**

स्त्री-शूद्रादिक सारे कर्माकर्मरूप जळाला तोडून या नावेतून पैलतीराला (मोक्ष-परमानंद) पोहोचतात. या मार्गाच्या ठायी भाव धरला की, बुडणे मिथ्या होऊन जाते. पोहोचण्याचे स्थानच आपण होतो. 'प्रयासाविण प्राप्ती' होते.

असे हे भागवत-धर्म, श्रीकृष्णोक्त धर्म सांगणारे भागवत-पुराण. 'पुराण' हा शब्द, भगवंतांस अनुलक्षून पुरातन, अनादि या ध्वन्यार्थाने 'विष्णुसहस्रनामा'च्या नामावलीत आलेला आहे. त्याही अर्थाने श्रीमद् भागवत हे साक्षात् श्रीकृष्णस्वरूप. या भागवताच्या एकादश स्कंधावर नाथांचे विवरण श्रीकृष्ण-धर्माचे विशदीकरण करणारे. नाथांच्या भागवताला मूळ भागवताचे सर्व विशेष जसेच्या तसे लागू पडतात. याचे थोडक्यात विवेचन आमच्या नाथांवरील पूर्वीच्या लेखांत आलेले आहे. या लेखात सप्ताक्षरी



स्मरणपूर्वक भागवताची कथा आम्ही **'बापरखुमादेविवरु'** प्रेमिकांपुढे सादर ठेवीत आहोत. सप्रेम सेवा सेवावी, ही विनंती !

नैमिषारण्यात सर्व ऋषि-मुनी जमलेले. त्यात शौनक, भार्गव अग्रणी. त्यांनी सूतांचा गौरव करून, विनीत भावाने कलीत तरून जाण्याचा सुलभ उपाय त्यांना विचारला. महाकारुणिक श्रीसूतांनी श्रोत्यांचा भक्तिभाव जाणला आणि सांगण्यास सुरुवात केली, ते हे शुकाचार्य कथित भागवत-पुराण !

एकदा महाभागवत शुकाचार्य मुनी कथा सांगत असताना, सुरवर तेथे आले आणि त्यांना विनंती करते झाले की, ''अमृत आम्हांपासून घेऊन, आम्हांस आपण श्रीभागवत परमामृत कथा सांगावी !'' अमृताचा लाभ झालेल्या सुरवरांना सुद्धा ही कथा ऐकावी असे वाटावे, असे हे श्रीमद् भागवत महापुराण. (**'निगमतरूचे पक्व फळ । ते हे भागवत महारसाळ ॥'** असे संक्षिप्त, सुलभ भागवतकर्ते हरिवंशज, ज्ञानेश्वरमाउली वंशज श्री.अ.ना.भावे ऊर्फ ज्ञानेश्वरचरणदास म्हणतात.) भागवत ही साक्षात् श्रीकृष्ण परब्रह्ममूर्ती; ज्याचे सेवन शुकमुनी नित्य करीत. सर्वांनी याचेच सेवन करावे.

एकदा महाभागवत नारदाचार्य मुनी भ्रमण करीत करीत सनक, सनंदन, सनातन, सनत्कुमार यांच्याकडे आले असता त्यांना ते फार दुःखित दिसले. महर्षी नारदांनी सर्वत्र अनाचार पाहिल्याने ते दुःखित झालेले होते. त्यांनी भक्तीला दुःखित पाहिले. तिला वृंदावनी नेले. पण भक्तीची कळी खुलेना. भक्तीची मुले ज्ञान, वैराग्य ही मृतप्राय झालेली. त्यांच्या संचारात त्यांनी हेही पाहिले की, पतिपत्नींत प्रेमाचा अभाव, पितापुत्रांत वैर, बंधुबंधूंत कपटाचरण, एकमेकांचा घात करून वा करवून केवळ पोटार्थी जगणे; आळशी शिष्य, भोंदू गुरु यांचा स्वैराचार. शुद्धतेला शुद्धीच राहिलेली नाही. भगवत्प्रेमाची संपूर्ण वानवा. त्यामुळे भक्तीला अवकळा स्थिती आलेली.

देवर्षी नारदांची ही स्थिती पाहून, कुमारांनी त्यांना भागवत कथा ऐकविली. भक्तीची मुले ज्ञान व वैराग्य यांना प्रेमसंजीवनी लाभली. भक्तीची अवकळा नाहीशी झाली. सनकादिकांचे उच्च स्वरात **'हरिः शरणम्'** म्हणत, त्या भावात हरिनाम-संकीर्तन. अशा महापर्वणी काळात, द्वादशवर्षी शुकाचार्यांचे आगमन झाले आणि पुन्हा भागवत कथा-संकीर्तन सुरू झाले.

प्रह्लादांनी टाळांची साथ धरली. उद्धवांनी झांजेवर हरिनामाची धून धरली. नारद स्वयं वीणावादन करू लागले. इंद्राने मृदंग वाजविण्यास सुरुवात केली. सारे भक्तजन, सुरवर-सुजन, **'कीर्तनी गाती नाचती । हर्षे टाळ्या वाजविती । जयजयकारे दिशा कोंदती । देहभान नुरले कवणासी ॥सं.सु.भा.१.७२॥'** साक्षात् भगवान श्रीकृष्ण शिवशंकरांसहवर्तमान त्या धुंद प्रेममयतेत भागवत कथा संकीर्तनात आपणच आपणांस आठवू-विसरवू पाहात होते, हे सारे सुजन अनुभवत होते. सगळ्यांनी भगवंतांचे पूजन केले. प्रेमप्रसाद वाटला.

शुकाचार्य महामुनी भागवत महिमा सांगतात; 'या भागवतात प्रेममयी भक्ती, ज्ञानज विरक्ती, प्रेममयी नैष्कर्म्यस्थिती यांचे विस्ताराने त्यांच्या विविध उपांगांसह विश्लेषण आलेले आहे. भागवत-धर्ममूलक, श्रीकृष्ण-धर्ममूलक, नामसंकीर्तनपूर्वक भगवंत-नामस्मरण करण्याचा व संपूर्ण शरणागतीसह सकल कर्मे भगवंतचरणी समर्पण करण्याच्या साधनेचा सुलभ उपाय यात ठामपणे सांगितलेला आहे. असे कर्माचरण असणाऱ्यांना ब्रह्मादी सर्व ओळंगतात. इतकेच नव्हे तर; साक्षात् श्रीकृष्ण भगवान **'चित्ती ध्यात तया ।'**.

या भागवताचे नित्य सेवन करता न आल्यास, त्याचे सप्ताह श्रवण करावेत. सुदिन, सुमुहूर्त पाहावा. पुण्याहवाचन करावे. संकल्पपूर्वक भागवताची, श्रीकृष्णस्वरूपाची षोडशोपचारे पूजा करावी. मंडप घालून हरिप्रेमिकांना पाचारण करावे. सदैव संतुष्ट, सदाचारी, सज्जन, विनम्र, ब्रह्मचारी, तपस्वी, व्रतधारी **'ब्रह्मं जानाति ।'** अशा विप्रास वक्ता म्हणून बोलवावे. तो असा सत्पुरुष असावा की, ज्याला कांचन-कीर्ती विषासमान वाटावी. कशाचीही अभिलाषा नसावी. (हल्ली भरगच्च दक्षिणेवाचून भागवत कथेचा वक्ता मिळणे दुर्लभ !) तो हरिभजनी सदा रत-रंगलेला असावा. त्याला शुक महामुनी मानून, त्याचीही पूजा सप्रेम मनोभावे करावी. ग्रंथपूजा करावी.

**संसारसागरी मी मग्न । माझे करावे उद्धरण ।**
**भागवता तू प्रत्यक्ष कृष्ण । तुजला शरण आलोसे ॥**

अशी भागवत, भागवतस्वरूपी श्रीकृष्ण, श्रोता-वक्ता श्रीकृष्णचरणी विज्ञापना करून, सप्ताह श्रवण करावा. कथा-श्रवण, मनन, निदिध्यासन,



नामस्मरण नामसंकीर्तनाच्या गजरात करावे. सांगतेला शक्य तर हवन करावे, अगर विष्णुसहस्रनामपाठ, गीतापाठ करावा.

महाभागवत शुकाचार्य एक उदाहरण सांगतात. तुंगभद्रेच्या काठी एका नगरात आत्मदेव नावाचा एक विद्वद्वर विप्र सदाचार पाळून राहात होता. वेदशास्त्रपारंगत, विधिवत् आचार, नामस्मरणी रत; पण संतान नसल्याने खिन्न. सुंदर भार्या सुदैवे लाभलेली; तिचा पण ऐश्वर्यासक्त स्वभाव, देहकेंद्रित वृत्ती. आत्मदेवाला संततीवाचून आलेली खिन्नता वाढता वाढता एके दिनी प्राणत्याग करावा असे वाटले. त्याने मंदिरात भगवान श्रीकृष्णांचे दर्शन घेतले, खिन्नता प्रतिपादन केली. जलाशयात उडी मारून जिणे संपवायची इच्छा सांगून झाली. या वृत्तीनुसार नामस्मरणाच्या संगतीत प्रयाण केले. तेवढ्यात एक यतिवर भेटले. यतिवर कसले ? त्याच्या सदाचाराला, नामभक्तीला भुलून भगवान श्रीकृष्णच यतिवेषाने आलेले. ''सात जन्म तरी तुझ्या नशिबात पुत्रसंतती नाही. त्याची अपेक्षा करण्याऐवजी, भगवद्भक्ती करून या भवभयास तरावे !'' असा उपदेश त्या यतींनी केला; पण आत्मदेवाला संततिध्यासापुढे तो रुचला नाही.

करुणासागर भगवंत या अशा नामधारकासाठीही द्रवले. त्यांनी एक फळ त्याला प्रसाद म्हणून दिले व भार्येस भक्षण करण्यास देण्यासाठी सूचना केली. हा सुखावला. त्यांना साष्टांग नमस्कार करून परतला. प्रिय पत्नीस सर्व वृत्तांत निवेदन करून फळ भक्षण्यास सांगितले. पत्नीचे सारे लक्ष आपल्या शरीरसौष्ठवावर. प्रथमपासूनच गर्भ राहील, उदरवृद्धी होईल, प्रसूतिवेदना होतील, सुखाने प्रसूती झाली नाही तर ? आणि झाली तरी बाळाचे सारे करण्यापायी जीव नकोसा होईल, सांभाळलेले शरीरसौष्ठव नाहीसे होईल; या विचाराने शेजारणीबरोबर सल्ला-मसलत झाली. फळ घरातल्या गाईस भक्षण्यास दिले. त्याच समयी नित्य प्रतिवर्षी बाळंत होणाऱ्या बहिणीची आठवण झाली. तिला दिवस गेल्याची वार्ता. कारस्थान रचले. तिने बाळ हिला आणून द्यायचे ते नेमकी प्रसूतिवेळा साधून. तोपर्यंत दिवस गेल्याचे नाटक करायचे. इकडे गाय गाभण राहिली. बहिणीची आणि गाईची प्रसूती एकाच वेळी झाली. कारस्थान व्यवस्थित पार पडले.

पुत्रप्राप्तीचा आनंद आत्मदेवास. त्याचवेळी गाय व्याली. मानवाकृती पुत्र प्रसवली. गाईसारखे कान होते. त्याचे नाव 'गोकर्ण' असे ठेवले. स्वपत्नीच्या मुलाचे नाव 'धुंधुकारी' ठेवले. दिवसांमागून दिवस जाऊ लागले. गोकर्ण नित्य भजन करू लागला. स्नान, संध्या, माता-पित्यांस रोजचे वंदन. सुमधुर वार्तालाप. कीर्तन-भजनाच्या आवडीत गोकर्ण दंग; तर धुंधुकारी नित्य शिव्या देई, कलह माजवी, चोऱ्या करी. पार व्यभिचारापर्यंत त्याची मजल गेली. त्याला पाहून आत्मदेवाच्या मनी विषाद निर्माण होत असे. त्यापेक्षा वांझपण बरे होते; अशा वृत्तीत तो यतीस आठवून नामस्मरण करी. गोकर्ण भगवद्‌भक्तीत रंगलेला. संतसमागमासाठी तो तीर्थयात्रा करून आला. वडिलांच्या विषादवृत्तीने त्यालाही दुःख झाले. श्रीकृष्ण-धर्माचे विवरण गोकर्णाने पित्याजवळ केले. पित्याची अनासक्त वृत्ती आता बळावली. तो तीर्थाटन करू लागला. भागवत दशमस्कंधाचे नित्य वाचन, हरिस्मरण-हरिनाम संकीर्तनात तो गढून गेला. गोकर्ण पुढील तीर्थयात्रेस गेला. आत्मदेव मुक्त झाला.

पिता, बंधू घरी नसल्याने धुंधुकारीचे चांगलेच फावले. माता धुंधुलीस त्याने इतके छळले की, आपल्या शरीरसौष्ठवाचे पार वाटोळे झालेले पाहून तिने शेवटी जीव दिला. धुंधुकारी व्यभिचारात दंग; अगदी राजरोसपणे. अखेर धन संपले. साऱ्या होत्याचे नव्हते झाले. अखेर वारांगनांनी धुंधुकारीस ठार मारले. प्रेत विहिरीत टाकले आणि स्वतः सूंबाल्या केला. राहत्या घरात धुंधुकारीचे भूत नांदू लागले.

बारा वर्षांच्या तपोभ्रमणानंतर गोकर्ण गावी परतले. या महाभगवद्‌भक्ताच्या दर्शनाला गाव लोटले. सारा वृत्तांत गावकऱ्यांकडून त्याला विदित झाला. गोकर्ण मुनी आपल्या भग्नावस्थेतील वाड्यात आले; मात्र त्यांस धुंधुकारीची अवस्था समजली. सूर्यनारायणांकडून उपाययोजना मिळाली की, 'भागवत सप्ताह करावा !'

सप्ताह सुरू झाला. वक्ता गोकर्णकृपेने, सर्वेंद्रियांचे कान करून, एकाग्र चित्ताने धुंधुकारीचे श्रवण-मनन-निदिध्यासन आपोआप होऊ लागले. प्रत्येक दिवसाच्या कथेअंती ग्रंथी-भेदन झाले. पिशाचयोनी सरली. दिव्य देह प्राप्त झाला. मुखावाटे धन्यता बाहेर पडली. विष्णुदूतांनी त्यास वैकुंठी नेले. गोकर्ण



महामुनींस वाटले की, इच्छेनुसार सर्वांसच वैकुंठवास येथेच घडावा. त्यासाठी आणखी एक भागवत सप्ताह पार पडला आणि गोकर्णइच्छा फलद्रूप झाली.

आत्मदेव जीव. धुंधुली देहबुद्धी. कुबुद्धीचा उसना पुत्र धुंधुकारी. यती भगवंत. ज्ञान हे फळ देहबुद्धी सेवन करू शकली नाही. भक्ती ही गाय. तिने ते सेवन केले. ज्ञानभक्ती साकार; तो गोकर्ण. भक्ती-ज्ञानाच्या प्रसारास्तव त्याचे तीर्थयात्रा भ्रमण, निजरूपाचा सन्मार्ग दाखविण्यासाठी. विषय त्या वारांगना. अज्ञान्यांना गुंतविणाऱ्या भागवत कथेने अज्ञाननाश. पराभक्तिलाभ हेच वैकुंठ.

असा महिमा असणारे हे भागवत-पुराण. सर्वत्र आत्मरूप अनुभवणाऱ्या व्यासपुत्र शुकाचार्यांनी हे भागवत-पुराण उपदेशिले. श्रीमद् भागवतात ज्या नाना अवतारकथा गायिल्या आहेत, त्या श्रीव्यास महर्षींनी श्रीशुकांना सांगितल्या आणि शुकाचार्यांनी परीक्षिताला सांगितल्या.

केव्हा तरी एकदा शुकाचार्यांच्या मागे व्यासमुनी जात असताना, सरोवरात मुक्तपणे स्नान करणाऱ्या स्त्रियांनी, शुकाचार्यांना स्नान करता करता नमन केले. शुकाचार्य निघून गेले. व्यास महर्षी जात असताना मात्र, त्यांनी नमन करण्यास्तव वस्त्रे ल्याली. व्यासमुनींच्या ते लक्षात आले. शुकाचार्यांच्या मनी नरनारी असा भेदभाव नाही. त्यांस श्रीकृष्णांवाचून चराचराचे भान नाही. हे जाणल्यानेच ह्या स्त्रियांना तरुण शुकाचार्यगमनावेळी लाज वाटली नाही. वृद्ध व्यासांच्या गमनावेळी वाटली. असे अखंड श्रीकृष्णरूपाची अनुभूती चराचरात (जीवदृष्टीने) घेणारे शुकाचार्य. त्यांना वारंवार नमन असो !

महामुनी व्यासांनी वेदांचे चार भाग केले. पुराणे, इतिहास रचले. तरी त्यांना चित्ताची प्रसन्नता लाभलेली नव्हती. त्यामुळे ते सखेद आश्रमात बसले होते. आकस्मिकपणे ब्रह्मदेवांचे मानसपुत्र, महासंत, त्रिकालज्ञानी देवर्षी नारद व्यासआश्रमात आले. व्यासांनी नारदांची महापूजा केली. नारद महर्षींनी विचारल्यावरून व्यासांनी त्यांना आपल्या खिन्नतेचे कारण सांगितले; ''अखंड परमानंद-अनुभूतीचा अभाव !''

महाविष्णूंच्या अनुग्रहाने, पूर्वजन्मीच्या अनुसंधानाने, श्रीकृष्णांची नामरूपलीला देवर्षी नारदांना नित्य आठवे. अखंड हरिभजनी रंगून, त्रिलोकांत स्वरब्रह्मवीणेसहवर्तमान भगवंतकाजास्तव नारद मुनी भ्रमण करीत असतानाच,

ते व्यासआश्रमात प्राप्त झालेले. त्यांच्या हरिसंकीर्तनाच्या श्रवणाने, असुर देखील क्षणभर देहभान विसरत. हे व्यासांना ज्ञात. म्हणून अखंड प्रसन्नता, परमानंदताप्राप्तीस्तव त्यांनी नारदांना पृच्छा केली. हरिनाम-संकीर्तनाने त्रैलोक्य ढवळून काढणाऱ्या नारदांची नित्य प्रसन्नता. नारदमुनी व्यास महर्षींना सांगतात;

**नारद म्हणती व्यासराया । ध्यावे प्रेमे हरिपाया ।**
**सगुण हरिचे गुण गाया । बुद्धी आपली योजावी ॥ सं.सु.भा.स्कं.१.४४॥**
**सगुण हरिलीला कथन । जै न घडेल प्रेमे करून ।**
**शुष्क ज्ञाने मन प्रसन्न । कदापि नव्हेल की ॥ सं.सु.भा.स्कं.१.४५॥**
**ज्यात गायिल्या हरिलीला शुद्ध । तो व्याकरणदृष्ट्या असो अशुद्ध ।**
**परि सेविती भागवत सिद्ध। व्याकरण त्याचे न पाहती॥ सं.सु.भा.स्कं.१.४६॥**
**हरिलीला अवघ्या काव्यकला । वृथा त्यागावे शब्दजाला ।**
**त्याहूनि बरवे भज गोपाला । सगुण लीला गाई तू ॥ सं.सु.भा.स्कं.१.४७॥**
**संत सेविती लीला काव्यासी । जैसे हंस मानसासी ।**
**शब्द भ्रमित वायसांसी । तेथील रुचि कळेना ॥सं.सु.भा.स्कं.१.४८॥**
**म्हणोनी गाई कृष्णलीला । तेणे अखंडानंद होईल तुला ।**
**व्यास लागे चरणाला । म्हणे मजला धन्य केले ॥सं.सु.भा.स्कं.१.४९॥**

आणि व्यासनिर्मितीने, सच्चिदानंद परब्रह्म सात्त्वतसंहितारूप असे महाभागवत पुराण, सच्चिदानंद शब्दरूपात अवतरले. 'असे हे भागवतशास्त्र साक्षात् आर्यपुत्र मूर्ती. त्यांनाच मंगळसूत्र म्हणून मी कंठी आवडीने धरले आहे आणि हृदयाची शोभा मिरवते आहे'; असे साक्षात् ज्ञानेश्वरअवतार परमसद्गुरु श्रीगुलाबराव महाराज म्हणतात. **'माझेनि मुखे वदती तात', 'प्रत्यक्ष ज्ञानेश्वर विभूती प्रकटली म्हणती ।'**

जे या श्रीमद् भागवत पुराणाचे माहात्म्य, तेच परिपूर्णपणे नाथ-भागवताचे.

धन्य धन्य तो परमभागवत भक्त उद्धव. त्याच्या ठायी भगवान श्रीकृष्ण परिपूर्ण प्रेमाने प्रेमासक्त. एक भक्तांग अर्जुन तर दुसरे उद्धव. एकास स्वमुखाने



गीता सांगितली तर दुसऱ्यास अकराव्या स्कंधी (श्रीव्यासांनी भागवताच्या अकराव्या स्कंधात वर्णिलेला) उपदेश. हा भगवंतांचा उपदेश समजावा, त्याचा अर्थ ध्यानी यावा, हृदयात पोहोचावा यासाठी **'एकादशावरी टीका । करी जनार्दनाचा एका। ती वाचता अर्थ निका । वाचकांसी समजेल ॥सं.सु.भा.११.१८.६३॥'** म्हणून **'श्रीनाथ भागवत । अवश्य जाण वाचावे॥सं.सु.भा.११.१८.६५॥'**.

माउली भगवान श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणजे साक्षात् श्रीकृष्ण भगवंत. त्यांनी रणांगणावर उपदेशिलेली गीता 'भावार्थदीपिका' या शब्दब्रह्मरूपाने **'ये हृदयींचे ते हृदयीं घातले ।'** अशी पुन्हा प्रकट केली. आपला लीलाविग्रह माउलींनी लवकर संपवला. ज्या भागवत-धर्माचा भावार्थ त्यांनी श्रीकृष्ण-धर्म म्हणून ज्ञानेश्वरीत प्रकट केला, त्याचाच विस्तृत उपदेश करणे अनिवार्य ठरले तेव्हा, आपणच प्रतिष्ठानी भानुदासांच्या कुळी लीलावतार घेतला अन् हे महत्कार्य पूर्ण केले. माउली परंपरेने नाथ. एकनाथांचे भागवत ते नाथभागवत. माउली हेच एकनाथ. म्हणून माउलींचेच गुह्यकथन करणारे ते नाथभागवत. माउलींचेच हे नाथभागवत.

या भागवताचा इतिहास, कुलकथा साक्षात् 'काशीविश्वेश्वर परिपूर्ण परब्रह्म शिवशंकरां'नी घडविली. एका लीलाविग्रहाने आपल्याच दुसऱ्या लीलाविग्रहाला दृष्टांत दिला. कीर्तन-प्रवचनांतून 'भावार्थदीपिके'चे विवरण नाथ करीत होते. दृष्टांतदिनीचे कीर्तन संपले. एक एक श्रोता नाथचरणांचे दर्शन घेत होता, बाजूस उभा राहत होता. त्यांनी 'हस्तामलक' वाचलेले, 'स्वात्मसुख' अभ्यासिलेले. आजच्या कीर्तनात, नाथांनी एकादश स्कंधातल्या श्रीकृष्ण-धर्माचे विवेचन ओघाओघाने ज्ञानेश्वरीच्या बाराव्या अध्यायातील ओवीचे प्रतिपादन करताना केलेले. साऱ्या श्रोत्यांनी नाथांना विनंती केली;

**पुराण श्रेष्ठ भागवत । त्याहीमाजी उद्धवगीत ।**
**भक्ती उत्कर्ष अद्‍भुत । वैराग्ययुक्त निज ज्ञान ॥२२.७॥**
**तयावरी उपाय टीका । श्रीवाणीचा बोध निका ।**
**श्रवणी उद्धार भाविकां । कीजे नेटका महाराष्ट्र ॥२२.८॥**

- श्रीकेशवस्वामी विरचित एकनाथ चरित्र.

दृष्टांत. संत-श्रोत्यांची प्रेमळ विनंती. नाथभागवत-लेखन सुरू झाले. दोन अध्याय झाले. एक नित्य येणारा श्रोता, नाथांचे भागवत श्रवण करी. त्याला काशी विश्वेश्वरांचे दर्शन घेण्याची इच्छा झाली. तो नित्य शंकरांवर रुद्राचा अभिषेक करी, हरिपाठ म्हणे. काशी विश्वेश्वर शिवशंकर भगवान त्याच्या स्वप्नात आले. नाथ-भागवताच्या झालेल्या भागाचे काशीस पठण करण्याची आज्ञा झाली. त्याने पारायण प्रत तयार करून घेतली. वाराणसी तीर्थास प्रयाण केले. दर मुक्कामी टीका वाचावी, वाचून दाखवावी. नाथांचे स्मरण करावे. नामसंकीर्तनात मार्गक्रमणा करावी. वाराणसीस येताच, शिवशंकर विश्वेश्वर भगवंतांचे दर्शन घेतले. रुद्रावर्तने करून अभिषेक केला. आणि या दोन अध्यायी भागवताचे मनकर्णिकेच्या तीरी भगवद्आज्ञेने पारायण सुरू केले.

स्नान-संध्यादी नित्यकर्म उरकावे. शंकरांचे पूजन करावे आणि निष्ठेने पारायण करावे, असा दिनक्रम सुरू झाला. त्रिपुंडधारी, वीरासनस्थित या तेजस्वी विप्रास, एका षट्शास्त्रसंपन्न मठाधिपतींच्या दोन विद्यार्थ्यांनी पाहिले. कोणी पंडित असावेत असा कयास बांधला. समर्याद सुसंवाद साधला. पठणाच्या ग्रंथाबाबत पृच्छा केली. विप्राने सांगितले, **'मी गृहस्थ । प्रतिष्ठानाहोनी आलो येथ । पुस्तक हे श्रीभागवत । उद्धव गीत एकादश ।। २२.२२ ।।'**

**'स्ववाचा करावे पठण ।'** अशी विद्यार्थ्यांची विनंती. प्रेमभरे साश्रू नयनांच्या साक्षीत वाचन. ऐकताच भाव धरावा अशी ओवीरचना; पण मराठी भाषेत. न जाणो; यामुळे गीर्वाण भाषेचा अव्हेर होईल असा विचार त्यांच्या मनात येऊन, त्यांनी मठाधिपतींस ही वार्ता कळविली.

मठाधिपतीस पांडित्याचा, गीर्वाण भाषेचा इतर भाषांना दुय्यम लेखणारा अभिमान. त्या विप्रास शासन करावे असा विचार मनी आला; पण काही शोध घ्यावा म्हणून त्या नाथभक्त विप्रास बोलावून आणले. विप्र थोडाफार भयभीत. पण नाथजप, श्रीकृष्ण-नामसंकीर्तन अखंड चालू. भेट झाली. मठाधिपतींनी या पठणास दुराचरण संबोधले. हे लेखन कुणाचे ? याची पृच्छा केली. विप्र ठाम गप्प राहिला. शेवटी विप्राने सांगितले;

**श्रीएकनाथ विख्यात नाम । प्रतिष्ठानी राहती तपोधाम ।**
**तो वरिष्ठ पूज्य परम । करी निस्सीम भगवद्भक्ती ।। २२.४३ ।।**



**जडासी व्हावया बोध । भक्ति ज्ञान वैराग्य शुद्ध ।**
**अंगे आचरूनि प्रसिद्ध । प्राणी जड मुग्ध तारीतसे ।। २२.४४ ।।**
**त्याचे संगती प्रतापे करी । जनासी देख लागली बरी ।**
**हरिकीर्तन नामगजरी । भक्तीची थोरी विस्तारली ।। २२.४५ ।।**
**त्याचिये वाणीचा हा ग्रंथ । होत असे प्रतिष्ठानात ।**
**लिहोनी आणिला पठणार्थ । दोन अध्याय प्राप्त झाले ।। २२.४६ ।।**
**सत्यचि हे वर्तमान । तेचि करितसे निवेदन ।**
**मी तंव केवळ अज्ञान । स्वतः ज्ञान मज नाही ।। २२.४७ ।।**
**भागवत श्रवणाची गोडी । म्हणोनि पठणी श्रद्धा गाढी ।**
**नित्यनेमे अतिआवडी । हेचि घडी घडी वाचितो ।। २२.४८ ।।**

पंडितांनी हा विचार मानला. दोन अध्याय त्याच्याकडून काढून घेतले. त्याला शासन देणे अनुचित मानले. विचार-विमर्श केला आणि दोन पत्रे लिहून, (एक नाथांसाठी, दुसरे पैठणातल्या ब्राह्मणांसाठी.) त्यासह दोन ब्राह्मणांना पैठणास रवाना केले. पैठणातील ब्राह्मणांनाच त्यांनी नाथांना या अन्याय्य, अनर्थकारक कृतीबद्दल शासन करण्यास फर्मावले. त्यांच्यावर बहिष्कार घालायचे सुचवले. त्या अहंमन्य ब्राह्मणांखेरीज समस्त पैठणकर मंडळी नाथांना सादर सप्रेम मानणारी. त्यामुळे नाथांविरुद्ध काही करणे त्यांच्या आवाक्यापलीकडचे होते. सगळे करून, सवरून, त्यांनी अपयश पदरी घेतले होते. साहजिकच दुसऱ्या, नाथांना आमंत्रण देणाऱ्या पत्राप्रमाणे कार्यवाही करण्याचे ठरवून, त्यांनी ते काम या काशीहून आलेल्या ब्राह्मणांवरच त्यांची अक्षमता प्रतिपादून सोपविले.

येथपावेतो नाथांची पाच अध्यायांपर्यंत टीका लिहून झालेली होती. निजसमाधानात सहजासनी बसून नाथ पंचाध्यायी पुन्हा एकदा पैठणकर श्रोतृवृंदास समजावून सांगत होते. इतक्यात नाथांनी या वाराणसीच्या विप्रवर्यांस येताना पाहिले. नाथांनी आसन सोडले. विप्रांना नमन करून उराउरी भेट दिली. जवळ बसवून घेतले आणि सन्मान केला. प्राथमिक विचारपूस केली. भोजनाचे आमंत्रण दिले. त्यांच्या मनी मठाधिपतींनी सांगितल्याप्रमाणे कोपच होता. पैठणातल्या मोजक्या ब्राह्मणांनी तसे त्यांचे मन कलुषित केलेले

होतेच. निरोपपत्र वाचण्याचा आग्रह त्यांनी सोडला नाही. नाथांनी पत्र वाचले. आपल्या मस्तकी आदराने धरले. त्या अक्षरांतून त्यांना भगवान काशी विश्वेश्वरांच्या आमंत्रणाची प्रचिती आली. ''धन्य हा दिन !'' असे उद्‍गार काढून, वाराणसीतल्या ब्राह्मणांना नाथ म्हणाले; **'धन्य म्हणे आजिच्या सुदिना । विश्वेश्वर निजदर्शना । पाचारी जाणा । कृपेस्तव ।।२२.७६।।' याहून कवण लाभ थोर । तेथे जावयाचा निर्धार ।(२२.७७)'** शिवशंकर काशी विश्वेश्वरांच्या कृपेची स्पष्ट सूचनाच जणू त्यांच्या मनाने हेरली अन् आमंत्रणाचा प्रेमपूर्वक स्वीकार केला.

वाराणसीचे ब्राह्मण स्तिमित झाले. नाथांच्या समाधानी वृत्तीस अनुभवता, आपला झालेला सन्मान पाहता, हे ब्राह्मण मूळ निरोपाचे विसरले. नाथदर्शनाने त्यांचे भान हरपले. ते स्वतः अभिमानभग्न होऊन लीन झाले. प्रवचन-कीर्तनाच्या लाभ श्रवणात दंग झाले. नाथांचा दुःस्वास करणारे पैठणकर पंडित, नाथ वाराणसीस जातील आणि तेथे त्यांचा आपणांस हवासा निवाडा होईल म्हणून सुखावले. पण वाराणसीतील ब्राह्मणांतला बदल पाहून ते अचंबित झाले. केशवस्वामींचा भाव;

**नेणोनि तुझी स्वरूपस्थिति । जे जे उन्मत्त छळू येती ।**

**तुझिया ऐश्वर्याची ख्याती । तेचि होती भूषणे ।।**

काशी विश्वेश्वरांना नाथदर्शनाची आस. त्यांनी प्रेरली ही लीला. वाटेत मुक्कामी दर मुक्कामी, नाथांची पैठणाप्रमाणेच रोजची जीवनचर्या. रोज कीर्तन, नामसंकीर्तन, नामगजर. नाथांचे 'चोखटे मानस'; त्यात 'मी होऊन असे क्षेत्रसंन्यासी' असा श्रीकृष्ण भगवंतांचा वास. त्यामुळे **'हें सर्वस्व आमुचें गूढ । परि दाविलें तुज उघड । आतां इंद्रियां देऊनि कवाड । हृदयीं भोगीं ।।ज्ञाने.९.१०.१३५।।'** अशी अंतर्बाह्य श्रीकृष्ण स्वरूपास पाहणारी नाथवृत्ती. ती उठे वा मुरे ती श्रीकृष्णस्वरूपी. अखंड ज्ञानगंगेत अवगाहन. पूर्ण ब्रह्मस्थितीची तृप्ती. त्याला येणारे कोवळे कोंब-पल्लव म्हणजे नाथांचा वृत्तिविहार. **'मीचि होऊनि पांडवा । करिती माझी सेवा ।'** असा हा वृत्तिविहार. या वृत्तिविहार कीर्तनात अखंड नामस्मरण. भगवंतलीला गान. **'कृष्ण विष्णु हरि गोविंद । या नामांचे निखिल प्रबंध । (ज्ञाने.९.१४.२१०)'** या भगवन्नामसंकीर्तनाच्या



श्रवण-मनन-निदिध्यासनत्वात्, साऱ्या श्रोतृवृंदाची मानीव दुःखांची काळजी झडून, सारा आसमंत ब्रह्मसुखाने दुमदुमित करणारे नाथांचे कीर्तन. श्रोत्यांना सूर्यप्रकाशावाचून, अमृतावाचून, कष्टपर योगावाचून, कर्मकांडावाचून, 'याचि देही याचि डोळा' भगवंत-दर्शनाचे सुख नाथांच्या ठायी अनुभवाला येई. कीर्तन-परिवार जागच्या जागी संपूर्ण वैकुंठमय !

असा अनुभव घेत, नाथांसहवर्तमान वाराणसीकर विप्र काशीस परतले. ''स्वामींच्या कृपेने नाथांना आणले''; असा सांगावा दिला. नाथांना गंगातीरावरील मठात बसविण्याचा आदेश. स्वामी आपल्या मठातील तीनशे संन्याशांना आज्ञा देतात; ''प्रतिष्ठानाहून जो अन्यायी आपल्या पत्रानुसार आणला आहे, त्याला पाच पाच दंड मारावेत. यातून वाचला तर मी येऊन शासन करीन !'' अशी दर्पोक्ती.

संन्याशांनी विचार केला; ''ही शासनपद्धती अनुचित. चौकशीविना शासन ? पण गुर्वाज्ञा मोडावी कशी ? तरी आपण एकेकाने जाऊन, त्याचे लक्षण निरसून योग्यायोग्य पाहून शासन करावे;'' असा विचार ठरला.

एक एक संन्यासी गंगातीरावरील मठात आला. केशवस्वामी वर्णन करतात;

**एक एक संन्यासी येऊन । करी श्रीनाथांचे दर्शन ।**

**तंव चतुर्भुज श्रीकृष्ण । मूर्ति नयनी पाहती ।।२३.२८।।**

**दर्शने सद्भाव चित्ता । येऊनि करिती दंडवता ।**

**वंदोनी अति नम्रता । तटस्थता पाहती ।।२३.२९।।**

असे तीनशे संन्यासी आले. त्यांना नाथांठायी श्रीकृष्णदर्शन. त्यांचे सद्‍भावे नमन आणि तिथेच ठाण. काय सत्संग असेल या संन्याशांचा ! काय त्यांची पुण्याई या आणि पूर्वजन्मींची ! त्यांना शंखचक्रगदाधारी श्रीकृष्ण भगवंतांचे दर्शन नाथांठायी ! या श्रीकृष्ण भगवंतांना काय शासन करणार ? कोण हे पाप फेडणार ? त्यांनी ऐकले असणार नाथभक्त पैठणकर विप्राने केलेले दोन अध्यायांचे पारायण-वाचन. केवळ त्या श्रुतींच्या पठण-श्रवणाचे का हे फळ ? का त्यांनाही होता साक्षात् श्रीकृष्ण स्वरूप षड्गुणैश्वर्यसंपन्न मायबाप महाराज श्रीज्ञानेश्वर माउलींच्या सहवासाचा लाभ घडलेला ? चार शतांपूर्वीचा काशी विश्वेश्वर शिवशंकरांच्या

आज्ञेने झालेला महासत्कार समारंभात हजेरी असणारा पूर्वजन्म ? त्या पुण्याईचे हे फळ ?

**येणे ज्ञानोत्तर भक्ती । दाखविली मधुराद्वैती ।**

**हा उपकार जाहला वेदान्ती । अभूतपूर्व ।।**

या न्यायाने, शुष्क संन्यास-वेदान्ताला विटून, पराप्रेमाच्या अद्वैतभक्तीची इच्छा बाळगून होते, म्हणून का त्यांना लाभले सच्चिदानंद लीलाविग्रही अफूट अमर्याद तरी निरुपाधिक सगुण साकार असे हे श्रीकृष्णदर्शन ? म्हणून का त्यांनी गंगातीरी ठाम होऊन अश्रुधारा ढाळणे अवलंबिले ? एकनाथ-स्मरण आरंभले ? ही वार्ता मठाधिपतींच्या कानी गेली. मठाधिपती आले. त्यांना साक्षात् भेटणे अनुचित वाटत होते; म्हणून मध्ये पडदा लावून ते उभे राहिले. ''तुझे कपट परीक्षावया मी येथे आलो आहे;'' अशी दर्पोक्ती.

सहजस्थितीत सुखसंपन्न असणारे शांतिब्रह्म नाथ जे म्हणाले, ते केशवस्वामी सांगतात;

**अहो जी स्वामी समर्था । तुमचे चरणी माझा माथा ।**

**कृपा करोनी या अनाथा । कीजे मनोरथा परिपूर्ण ।। २३.४९ ।।**

**इतुका दूरी पंथ क्रमोन । बोलाविले दर्शनालागून ।**

**मध्ये आंतरपट आणून । विषमपण किमर्थ मनी ।। २३.५० ।।**

**अन्याय भासला असेल चित्ती । तो क्षमा कीजे कृष्णमूर्ती ।**

**दीनाची ऐकोनी विनंती । अल्पमती मी निराग्रही ।। २३.५१ ।।**

**नाही वेदशास्त्रसंपन्न । कवित्वाचा नसे अभिमान ।**

**समर्थी न मानिता कवण । उपयोग लक्षण ग्रंथाचे ।। २३.५२ ।।**

**प्रत्यक्ष नारायणमूर्ती । ज्ञानसंपन्नता विख्याति ।**

**तुम्हां न मानता युक्ती । व्यर्थ श्रम निश्चिती कां ऐसे ।। २३.५३ ।।**

**संकल्प-विकल्पाचे शून्य । श्रीगुरुकृपा निवांत मन ।**

**या काव्याचा अभिमान । या देही आपणापें नसे ।। २३.५४ ।।**

**कृपा करोनी करुणानिधी । शांतवोनी कोपबुद्धी ।**

**दर्शन देऊनि प्रसिद्धी । अनाथ त्रिशुद्धी तारावा ।। २३.५५ ।।**



**पंचाध्यायी लेखन । इतुके झाले टीका व्याख्यान ।**

**शास्त्र विवेक दूषण । लागल्या कवण उपयोग त्याचा ।। २३.५६ ।।**

**जितुके झाले टीकालेखन । त्या व्याख्यानी लागता दूषण ।**

**करावे जळी निमग्न । मणिकर्णिका पूर्ण सहजचि ।। २३.५७ ।।**

नाथांची श्रुतिवाणी. संन्यासी मठाधिपतींचा कोप किंचित् शमला. विचारमग्नता आली. इतक्यात अगोदर येऊन ठाण मांडून बसलेल्या तीनशे संन्याशांनी एकमताने सांगितले;

**परब्रह्म परंज्योती । सच्चिदानंद ज्याते म्हणती ।**

**वेदान्तगर्भ श्रुतिसंमती । अद्वैतस्थिती प्रतिपाद्य ।। २३.६१ ।।**

**जे निर्गुण निर्विकार । निष्प्रपंच निरुपचार ।**

**मायातीत निजसाकार । श्रुतिनिर्धार नेति नेति ।। २३.६२ ।।**

**ते हे साकार ब्रह्ममूर्ती । प्रत्यक्ष आली मठाप्रति ।**

**आता कायसी येथे भ्रांती । आंतरपट निश्चिती काढिजे ।। २३.६३ ।।**

**हा मानवी नव्हे निर्धारी । लीलाविग्रही तनुधारी ।**

**सत्य सत्य हे वैखरी । विनंती मान्य करी आमुची आता ।। २३.६४ ।।**

हे ऐकून मठाधिपतींचे मन द्रवले. सत्त्ववृद्धी होऊन अंतःकरण शुद्ध झाले. (अज्ञान) पडदा दूर झाला. पाहतात तो, **'श्रीकृष्णमूर्ती घवघवीत बैसलीसे ।'**. श्रीकृष्णमूर्तीची चिदानंद लहरी संन्यासी मठाधिपतींस मिनताच, डोळा दृष्टीस पडताच, अष्टसात्त्विक भाव अंतःकरणातून ओसंडून वाहू लागले. देहभान नाही राहिले. साष्टांग प्रणिपात 'त्राही त्राही' म्हणत घातला.

नाथ नाथरूपात उठले. मठाधिपतींस दोन्ही हातांनी धरून उठविले. **'ॐ नमो नारायणाय'** म्हणून आलिंगले. लीला झाली. भागवताच्या एका श्लोकाचे विवेचन नाथांनी केले. शास्त्र झाले. नाथ-ऐश्वर्यसंपत्ती पाहून मठाधिपती नाथांना शरण गेले. आपल्या मठी घेऊन गेले आणि येथेच टीका पूर्ण करावी अशी विनंती त्यांनी केली. काशी विश्वेश्वरांचे आमंत्रण याचसाठी; हे जाणून नाथांनी ग्रंथ तेथे काशीनगरीत पूर्ण केला. रोज कीर्तन, नामस्मरण. अद्वैत ज्ञानोत्तर भक्तीचे प्रतिपादन. तत्त्वतः, शास्त्रतः आणि प्रेमतः रोजच्या भागवत-टीका विवरणासह. सारा संन्यासी मठवर्ग, तुरळक अपवाद वगळता,

या भक्तिकल्लोळाच्या सागरात लहर होऊन अखंड विहरला. काशी विश्वेश्वर सुखावले. पण त्यांच्या मनी वेगळीच योजना होती.

मठाधिपतींच्या मनात आले, या ग्रंथाचे ग्रंथकर्त्यासह विधिवत् पूजन करावे. काशी विश्वेश्वरांचा दृष्टांतच होता. या मठाच्या सर्वांनाच 'धन्य शास्त्रार्थ' अशी प्रचिती. मात्र इतर मठांतील पंडितांना काहीशी शंका, दुरभिमान, गीर्वाण भाषा अहंकार. अध्यात्म या भाषेवाचून, सुरभाषेवाचून, इतर भाषेत म्हणजे शांतं पापम् ! ग्रंथ, ग्रंथकर्ता-पूजनाचे आमंत्रण सर्व मठपंडितांना गेले. त्यांचा विचार वेगळाच.

या आमंत्रणकर्त्या मठाधिपतींनी हे अक्षम्य वर्तन केले आहे. महाराष्ट्र भाषेत भागवत टीका ही पाखंडपद्धती. ती अयोग्य, अन्यायी. या क्षेत्री तरी नक्कीच. या विचारावर बऱ्याच जणांचे एकमत झाले. मोठ्या समुदायाने ही पंडित मंडळी स्वामी पंडितांकडे येऊन वाद करू लागली. हा टीका ग्रंथ बुडविण्यासच योग्य; असा सर्वांचा सूर लागला. '**नीचवाणीचे श्रवण । शास्त्रविदितांना दूषण ।**' वर आदराने पूजन प्रस्ताव हाही भ्रष्टाचार, अधर्म. याचा उच्छेद व्हावयास हवाच. स्वामींनी हा प्रस्ताव मान्य करावा. स्वतः पापाचे धनी आणखी तरी होऊ नये.

अनुभव घेतलेले पंडित स्वामी मठाधिपती म्हणाले;

**नेणोनी पुरुष महिमान । पूर्वी तुम्हांसारिखा आपण ।**
**आग्रह केला उद्धत वर्तन । पै अभिमानभग्न परी झालो ॥२४.३२॥**
**तयाचे ऐश्वर्य आणि शांती । उपमा न देखो या त्रिजगती ।**
**कृतनिश्चय आमुचा चित्ती । तोचि निश्चित पूर्ण अवतार ॥२४.३३॥**
**तुम्हांसी भ्रांती अभिमान । तयाचे करू इच्छिता छळन ।**
**हे समूळ अप्रमाण । सहसा अनुमोदन न देववे ॥२४.३४॥**

इतर मठांचे पंडित क्षुब्ध झाले. नाथ शांतचित्त. परमानंद अवस्थेत. श्रीकृष्णरंगी रंगलेले. त्यांना याचा पत्ताच नाही. सहज समाधीतल्या नाथांना पाहून, संन्यासी मठाधिपती विस्मयचकित. क्षणार्धात् इतर पंडितांच्या घोळक्याने ग्रंथराज हाती घेतला. बुडविण्यासाठी नदीतीरी धाव घेतली. नाथभक्त संन्यासी मागोमाग



धावले. ग्रंथराज हाती घेऊन धावणाऱ्या पंडितांनी, नदीकिनारी पोहोचताच क्षणार्धाचा विलंब न करता ग्रंथ नदीकडे भिरकावून दिला; आणि आश्चर्य घडले !

**ते काळी भागीरथी । दोन्ही हात करी वरौती ।**
**चुडे कंकणरत्नयुक्ती । शोभा शोभती सौभाग्या ॥२४.४०॥**
**श्रीनाथकृत ग्रंथासी । वरीच झेली आदरेसी ।**
**समस्त पाहती कौतुकासी । अघटित पंडितांसी वाटले ॥२४.४१॥**

भागीरथी सरस्वतीची ही कृती पाहणारे यतिराज संन्यासी वायुवेगाने पिसाट धावले. उडी घेऊन त्यांनी भगवतीच्या हातून ग्रंथराज घेतला. त्याला वंदन केले. भगवतीने आपला करस्पर्श यतीच्या नेत्रांना केला. त्याला ग्रंथराजाच्या ठायी भगवान श्रीकृष्णांचे दर्शन. प्रेमोल्हास ओसंडला. नेत्रांतून सच्चिदानंद रसाचा पूर वाहू लागला. वाणी नाथयशाचा जयजयकार करू लागली. त्या तालावर पाय नृत्य करू लागले. आकाशात देवांची दाटी झाली. यतींचा सारा शिष्यवर्ग त्या नृत्यात सामील झाला. ग्रंथराजाला स्पर्श करण्याची चढाओढ लागली. मणिकर्णिका तीर नाथजयजयकाराने धुंद बेधुंद झाले. गंगाजलाला उधाण आले. या साऱ्या भक्तवर्यांच्या पदांना गंगाजल-प्रवाह स्पर्शू लागला; आपल्या पुण्याईत, शक्तितीर्थात वाढ व्हावी म्हणून. साऱ्या वाराणसीतल्या मंदिरांतल्या देवांनी सूक्ष्म रूपाने येऊन, ग्रंथस्पर्श करून घेतला. हृदयांच्या ठोक्यांनी, नाड्यांच्या स्पंदनांनी, मूळ स्फुरणाशी एकरूपता साधून नाथजयजयकारात आपली स्फुरणमयता विलीन केली. विश्वेश्वरांच्या पिंडीतून आपोआप जलधारा उचंबळू लागल्या.

सारी वाराणसीपुरी नाथांना नमन करू लागली. यती मठाधिपतींनी ग्रंथराज नाथांच्या हाती सोपविला. देही विदेहस्थिती. यतींनी स्वये साष्टांग दंडवत घातले. नाथनामाचा गजर चोहोकडून झाला. नाथ किंचित् भानावर आले. त्यांनी यतींना नमन करून त्यांना त्यांच्या आसनी बसविले. यती लाजिरवाणे. '**मोठेपणाचे सरो भोज । तुझिया कृपा आमुचे काज । येणेचि मज कृतकत्यता ॥**' असा त्यांचा भाव. त्यांनी मनी घेतले की, हत्तीवरून नाथांची मिरवणूक काढावी ! हत्ती अंबारीसहित, नळे, चंद्रज्योत, नाना वाद्ये तऱ्हांची, बुक्का, सुमनांचे हार, शृंगाराचे सामान, पूजाद्रव्य साऱ्या

साऱ्यांची तयारी पूर्ण झाली. बेत सांगून नाथांच्या संमतीसाठी प्रार्थना झाली. नाथांना हे सारे अनुचित वाटले. कारण वस्तुतः हे विप्रवर पंडित सदासर्वदा पूज्य होते. संन्याशांची आवडी. नाथांची नावडी. विचार-विमर्श झाला. ग्रंथराजाचे पूजन करून मिरवणूक काढण्याचे ठरले.

काशीविश्वेश्वरांचे पूजन करून कौल घेतला गेला. उत्साह ओसंडला. ज्या ग्रंथाच्या प्रसादाने कृतकार्यता साधून देहबुद्धी समूळ नाश पावून आत्मबुद्धी प्रकट होते, सर्वत्र श्रीकृष्ण प्रचिती येते; त्याचे यथाशास्त्र यथाविधी षोडशोपचारे पूजन झाले. हत्तीवरील अंबारीत ग्रंथराजाला स्थानापन्न करण्यात आले. नाना वाद्यांचा गजर सुरू झाला. टाळकऱ्यांची रांग उभी राहिली. मृदंग पखवाजावर थाप पडली. गुलाल-बुक्का लावून उधळला गेला. झांजा झणझणू लागल्या. नृत्याचे पदन्यास सुरू झाले. पंडितांसह काशीवासी अखिल जनता मिरवणुकीत सामील झाली. **'कृष्ण विष्णु हरि गोविंद, मुकुंद माधव चरणारविंद ।'**, **'राधाकृष्ण गोपाळकृष्ण'** नामांचा गजर निनादू लागला. तालाच्या लयीत, ठेक्याच्या टाळीबरोबर पदन्यास होत, पावले मंद मंद चालू लागली. साऱ्या सभोवतालातून पुष्पवृष्टी होऊ लागली. रस्त्यांवरून, घरांच्या गच्चींतून साऱ्या काशीनिवासियांचे डोळे तो स्वर्गसोहळा पाहत होते. संन्याशांच्या बरोबर चालणाऱ्या नाथांना, डोळेभरून पाहून हृदयी साठवून घेत होते. सारेजण गोपीभावात. त्यांना पापण्यांची उघडझाप आवडेनाशी झाली.

ते एकनाथ होते की श्रीकृष्ण भगवंत होते ? संन्याशांना श्रीकृष्ण प्रत्ययले. आम्हांलाही प्रत्ययतील. तो क्षण येईल. पण वेळ चुकू नये म्हणून डोळे अजिबात मिटता नयेत. ''भगवंता श्रीकृष्णा, नाथराया; आमच्या उघड्या नेत्रांना तुम्ही गोचर व्हा; चतुर्भुज रूपाने !''

फटाक्यांच्या आतषबाजीने आकाश लखलखून मिरवत होते. ग्रह, तारे थांबून तृप्त होत होते आणि या सर्व भावातून तृप्त होत होते वाराणसीचे सम्राट भगवान श्रीकाशी विश्वेश्वर शिवशंकर उमारमण ! सारे संत, सारे सिद्ध या सोहळ्याचा आनंद उपभोगत होते; माउली ज्ञानेश्वर महाराजांसह नाथांच्या ख्यातकीर्तीला अनंतत्वाने दुमदुमवत.

संपूच नये असा सोहळा श्रीकाशी विश्वेश्वरांच्या स्थानी संपन्न झाला.



असा सोहळा सात दिवस अखंड चालला. हिरिरीने एकेका आळीने जबाबदारी उचलली. दिवाळी सप्ताहभर साजरी झाली. कौतुकाला उधाण आले. प्रत्येक दिवशी नाथांचे कीर्तन झाले. श्रोते अखंड सप्ताहभर ब्रह्मानंदी तल्लीन झाले. भक्तियुक्त बोधश्रवण. समाधी अखंड. अपूर्व कथावक्तृत्वाची जाती दरवळली. सत्संगतीचे सौष्ठव सुखावले. सुरवर भुलले. ग्रंथकर्ता आणि ग्रंथ ख्यातकीर्त झाले. अहमहमिका सुरू झाली नाथभागवताची प्रत काढून घेण्याची. प्रती काढून झाल्या.

नाथांना निरोप न देता, त्यांना हृदयी साठवून, भागवताच्या नित्य पारायणाचा संकल्प करून, वाराणसीकर वेशीपर्यंत आले. आपले भागवत बरोबर घेऊन, (तत्स्वरूप नाथांना घेऊन) ते नाथांसह परतले.

असा नाथभागवताचा इतिहास, अशी कथा. नाथचरणींची आमची ही सेवा **'बापरखुमादेविवरु'** प्रेमिकांना रुचो. हे स्कंददासनाथ माउली महाराज ! आपली कृपा आणि आज्ञा न होती तर नाथभागवतातले आमचे हे छोटुले अवगाहन मुळीच पार पडले नसते. नाथ माउलीस्वरूप, श्रीकृष्णस्वरूप. नाथचरणी प्रेमभावो. श्रीकृष्णचरणी प्रेमभावो !

अजून कितीतरी अंगांनी नाथजीवनाचा विचार होऊ शकतो. पण आमची कोती कुवत आपण लक्षात घ्यावी; अन् चुकली माकली ही सेवा आपली समजून गोड करून घ्यावी. सप्ताक्षरी स्मरत, सप्ताक्षरीला जन्मोजन्मी चाहत, हा हार दानकृपा याचून आपल्या अम्लान चरणी वाहतो !

**एवढे ते देई दान । स्थापी हृदयी चरण ॥ १ ॥**
**आणिक नलगे कांही आता । शुद्ध प्रेमा यावा चित्ता ॥ २ ॥**
**प्रेमाविण अन्य काही । नलगे आण तुझी आई ॥ ३ ॥**
**ज्ञानेश्वर मायबहिणी । ठेवी अखंड चरणी ॥ ३१६.४ ॥**

- श्रीगुलाबराव महाराजांच्या अभंगांची गाथा.

सद्गुरुनाथार्पणमस्तु !

(**टीप :** प्रस्तुत लेख, श्री.भालचंद्र बुर्से यांच्या श्रीसंत एकनाथ महाराजांवरील लेखमालेतील अंतिम लेख असून, काही कारणवशात् तो चैत्र-अंकाऐवजी या वैशाख-अंकात प्रसिद्ध होत आहे. **- व्यवस्थापक.**)

□□

# ।। श्रीक्षेत्र आळंदीमाहात्म्य ।।

**(मागील अंकावरून ...)**

एक अप्रकाशित हस्तलिखित

तंव तेथें पाहावया । विसोबा आला त्या ठाया । पाहे तंव पाठीवरी मांडे लागले व्हावया । मोठ्या आश्चर्यते पावला तो ॥२०४॥ मुक्ताईचे पुढे ढीग मांडे होऊन । पाहून म्हणे अघटित विंदान । ज्ञानदेव मागे पाहे परतोन । म्हणे जाय येथोनी खेचरा तू ॥२०५॥ आधीचि जठराग्नीचा बंबाळ । तेणे नेत्र आरक्त जैसा अनळ । तेणे क्रोधाग्नीची निघाली ज्वाळ । परी ती अमृतगरळ ऐसी जाहली ॥२०६॥ खेचरा होय परते । म्हणता खेचरी मुद्रा लागली त्याते । उन्मिलित नयन लागले भ्रुकुटीते । उभा तेथे तैसाची ॥२०७॥ नाठवे काही देहभान । विसरला मागील आठवण । मी येथे आहे कोण । नाही आठवण स्वदेहाची ॥२०८॥ मी बैसला की निदसुरा । जागा किंवा स्वप्नी हिंडफिरा । स्वदेशी की परदेशी घरी की बाहेरा । नाठवे तिळभरा तयासी ॥२०९॥ ऐसा बुडे ब्रह्मानंदडोही । तेथे काहीच नेणवे पाही । सर्व एकार्णव नेणवे काही । चित्स्वरूपे सर्वही ग्रासिलेसे ॥२१०॥ मग त्याते सावध करोनी । बोधिते जाहले पूर्णपणी । ज्ञानदेव म्हणती समाधी ग्रासोनी । होई मनी निर्विकल्प ॥२११ ॥ विश्वाकार हा तुझेचि हृदयी सोहळा । निजात्मरूप दाविले डोळा । घेई परब्रह्म अवलीळा । भोगी निश्चळा आत्मरूप ॥२१२॥ ऐसा करूनि उपदेश । कोपेचि केला ब्रह्म त्यास । न वर्णवे संतमहिमेस । जेथे आस पुरे सर्वही ॥२१३॥ ऐसा श्रीगुरुचि दाता एक । जो का कामनाच नुरवी देख । जो का चुकवी कर्मलेख । जन्म-मृत्यू अनेक चुकविले ॥२१४॥ ज्ञानदेव संतांमाजि शिरोमणी । त्याने कर्मरेखा फाटा मारूनि । सोडविले अपार जग श्रेणी । विधी मुनीसी सांगत ॥२१५॥ ते पुढिल्या अध्यायी कथा यथार्थ । संतमहिमा कर्ममोचनार्थ । भक्तिविजयातील सार तेचि येथ । सत्राव्यात सांगितले ॥२१६॥ श्रीगुरुराया सर्वात्मक निवासिया । कर्मसूत्र हाती तुझिया । तरी तू सोडवी कर्मापासोनिया । नको देऊ हाती या कर्माच्या हे ॥२१७॥ श्रीपांडुरंग भीमातीरवासी । तू कर्ता सर्व ब्रह्मांडीचा असशी । तरी काय अशक्य तुज कर्म चुकवावयासी । घाली पाठीसी मी कर्मा भितो ॥२१८॥ इति श्री सह्याद्री खंड ग्रंथ । त्यातील सारांश मथितार्थ । निवडोनी काढिला ज्ञानलीलामृत । सदाशिवदास वदत प्रसंग ॥२१९॥ संपूर्णमस्तु ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु । श्रीसदाशिवार्पणमस्तु ॥

### अध्याय सतरावा

श्रीगणेशाय नमः । श्रीगुरु दयार्णवसागर । तेथे मिळाले साधकरत्न जोहार । अपरिमित रत्नाकर । पाहोनी जोहार बुडी देती ॥१॥ भावार्थे जिही बुडी दिधली । तया रत्नाकरे चिद्रत्ने दिधली । अभाविकाची बुडी व्यर्थ गेली । मुक्ती मुक्ताफळे लाधली भाविकासी ॥२॥ यास्तव एक भावचि कारण । ज्ञान अभिमान न चले द्रव्य अभिमान । जिही भावबळे राहिले बुडी देवोन । त्यांसी निजात्मदर्शन सापडले ॥३॥ आणखी न चलती काही सायास । संतकृपासागरी रिघावयास । एक भावबळेचि दृढ व्हावे त्यास । दुजा सायास वाया जाय ॥४॥ निजात्मप्राप्तीलागी करिता तपाचरण । तापसा क्रोध अत्यंत जाण । करिता आत्मप्राप्ती तीर्थाटन । हव्यास दारुण तीर्थभ्रामका ॥५॥ यज्ञयागादी करिता दान । तेथे अत्यंत वाढे अभिमान । यास्तव करावे संतसेवन । तेणे सकळ अभिमान दुरावे ॥६॥ संतदर्शनी अभिमान सर्व जाती । संतदर्शने मूर्ख तेही सज्ञान होती । संतांपासीचि लाभे निजात्मप्राप्ती । जीवदशा जाती संतदर्शने ॥७॥ लिंगदेह हा अनंत जन्मी अभंग । त्या संतसमागमे होय भंग । लिंगदेहाचा घडला संग । स्थूलदेहासी मग काय उणे ॥८॥ ज्याने लिंगदेह समूळ उपडे । ते कारण अनायासे घडे । संतसमागमी जरी देह सापडे । तरी तो समूळ मोडे लिंगदेह ॥९॥ ऐसे असता सर्व सोपे जाण । जग वृथा हिंडती रानोरान । याविण जरी ते नाना केले साधन । तरी तो सीण पूर्ण सर्वही ॥१०॥ असो गत अध्यायाच्या अंती । विसोबासी रागे भरिता जाहली प्राप्ती । सहज ज्ञानदेव रागे म्हणती । खेचरा परते सर ॥११॥ ऐसे म्हणता ज्ञानदेवे विसोबासी । तेथे खेचररूप देहे तात्काळेसी । तधीपासून

विसोबा खेचर ऐसे नामासी । प्रसिद्धेसी जाहला पै ॥१२॥ पाहा संतांचे महिमान । रागे म्हणता खेचर जाण । तो ब्रह्मचि जाहला परिपूर्ण । न कळे महिमान संतांचे ॥१३॥ मग तो उन्मत्तदशेने वावरे । दशा असती तीन प्रकारे । बाल उन्मत्त पिशाच विचारे । खेचर विचरे उन्मत्तदशे ॥१४॥ ऐसे संतांचे सहज चरित्र । तेचि वाचिती ऐकती ते परम पवित्र । येथे शंका न धरावी अणुमात्र । पवित्र संत महिमान ॥१५॥ रागे उद्धरती महापापियासी । ते का न उद्धरती उपदेश सायासी । ऐसे किती एक जन लाविती सन्मार्गासी । ज्ञानेश्वरापासी येती त्या ॥१६॥ नित्यशः हरिकीर्तन पुराण । ज्ञानदेवी भगवद्गीता रत्न । भजन करुणापर रात्रंदिन । तल्लीन मन सर्वांचे राहे ॥१७॥ भक्ति ज्ञान विरक्ती होण्यार्थ । मग अमृत अनुभव केला ग्रंथ । त्या ग्रंथी उपनिषदार्थ विशद । मथितार्थ काढिले ॥१८॥ आणि पवन विजय ग्रंथ साधनिक । त्यात साधका प्राप्ती अधिक । मार्ग आचरणी मुमुक्षू लोक । सुख्यात देख केलासे ॥१९॥ योगवासिष्ठ टीकाभेद । प्रांजळ मार्ग दाविले विशद । पंचकर्णादी अभंग जगा बोध । मार्ग दाविला शुद्ध परमार्थी ॥२०॥ ऐसे पाहोनी निवृत्तिनाथ । मग सकळांसी आज्ञापित । जगदोद्धारा कवित्वकळा यथार्थ । करावे ग्रंथ परोपकारा ॥२१॥ मग जगदोद्धारा कारणे । कवित्व अभंगादी केले सर्वांविणे । मुक्त मुमुक्षू विषयाकारणे । मार्ग जेणे प्रांजळ ॥२२॥ आषाढी-कार्तिकी वारी । मार्ग निर्मिले जगदोद्धारी । आपण जाती सहपरिवारी । संगे जन अपारी घेऊनि ॥२३॥ ऐसे काही दिवस लोटल्यावरी । ज्ञानदेव पांडुरंगा विनंती करी । तीर्था जावे वाटे पृथ्वीवरी । सत्संग नामा जरी मिळालिया ॥२४॥ पांडुरंग म्हणती तू स्वये तीर्थरूप । असता कासिया संकल्प । ज्ञानदेव म्हणे पलाटणे अमूप । होती पै संतदर्शने ॥२५॥ अवश्य म्हणितले पांडुरंगे । करावी तीर्थे पवित्र अंगसंगे । तीर्थे इच्छिती संतसंगे । तेही प्रसंगे करावी ॥२६॥ ज्ञानदेव म्हणे नामयासी । आज्ञा घेऊनि चलावे तीर्थासी । नामदेव म्हणे विठ्ठलचरणांपासी । मज तीर्थासी साठोवा ॥२७॥ मग नामदेवा म्हणे श्रीवासुदेव । केवढे तुझे भाग्य उदैले दैव । प्रत्यक्ष परब्रह्म ज्ञानदेव । करीत गौरव संगतीचा ॥२८॥ **श्लोक ॥ यस्य चित्तं द्रवीभूतं कृपया सर्वजंतुषु । तस्य ज्ञानेन प्रोक्षेणमन्यथा यो न जीवति ॥१॥** टीका॥



जो का सकळ ज्ञानाचे वैभव । जो का सकळ योगियांमाजी राव । ऐसियाचा संग तेचि दैवादैव । उघड राणीव स्वस्वरूपाची ॥२९॥ तो हा ज्ञानराज आत्मसुखाचे धन । तुज स्वमुखे इच्छितो संगतीकारण। ज्याचिया सहज दरुशने जीव पूर्ण । ब्रह्म सनातन होती पै ॥३०॥ मग नामदेवाचा हस्त धरोनी। पांडुरंग गुह्य सांगे कर्णी । ज्ञानिया मीच अवतरलो भक्तरक्षणी । मजसी त्यासी म्हणोनी भेद नसे ॥३१॥ मग नामदेवाचा हात धरोनी । ज्ञानदेवा करी देती शारंगपाणी । हे आवडते नामे माझे तुझे आर्त जाणोनी । देतो परी जनी वनी सांभाळी ॥३२॥ ऐसे जाणूनि यादवराव । तीर्थयात्रे बोळविले भक्त सर्व । नेत्री अश्रुधारा गळती धीर न धरवे। म्हणती माधव जावे आतां ॥३३॥ उतरोनी भक्त गेले नदीतीर । मग परतले शारंगधर । मनी वियोग अत्यंत न धरवे धीर । म्हणती माझे जिव्हार संतजन ॥३४॥ इकडे मार्ग क्रमित संत । मार्गी नामयासि ज्ञानदेव पुसत । सांगावे आमुते ज्ञान काही ॥३५॥ नामया तू प्रीतीचा भक्त देवा । तुज पुसतो भक्तिमार्ग सांगावा । आम्हां अज्ञाना दावावा । काही बरवा ज्ञानमार्ग ॥३६॥ मग म्हणे नामदेव तुम्ही ज्ञानमूर्ती । योगियांमाजी मुकुटमणी तुम्हां म्हणती । जे का निजस्वरूप चिदानंद स्थिती । ऐसे सकळ संती गाजिले ॥३७ ॥ **श्लोक ॥ श्रीपंढरीनाथसमाश्रिताय ज्ञानेश्वराय सततं शरणागतोऽस्मि ॥२॥** टीका॥ नामा म्हणे ज्ञानसागरा । श्रीपंढरीरायाचिया प्रियकरा । तंव ज्ञानदेव म्हणे नामया पुरे करा । स्तवनाचा सारा पाल्हाळ तो ॥३८॥ ज्ञानदेव म्हणे ऐक वचन । तू ज्ञानवंचक दिससी पूर्ण । सोडी हृदयग्रंथी करी श्रवणा पारण । आहे ते हे धन उघडचि ॥३९॥ ते तूं जाणता अससी सर्वकाळ । तेथीचा परब्रह्म चोखाळ । तरी काढी धन पायाळू तू केवळ । आता वेळ न लावीचि ॥४०॥ तरी सांग मजलागी गुह्य । कैसे ते श्रवण मनन हे । कैसे निज ध्यास दृढ पाहे । आत्मदर्शन हे कैशापरी ॥४१॥ कैसे ते मन समाधानी। कैसे ती भक्ती करणे निर्वाणी । मन समरस निरंजनी । राहे कैसेनी सांग मज ॥४२॥ कैसे नामस्मरण अंतरसुख । कैसा संगत्याग सकळीक । वैराग्यसंपत्ती कोणती सकळीक । सांग कौतुक इंद्रियदमनी ॥४३॥ ऐसे श्रीज्ञानदेवाचे बोलणे । ऐकूनि नामया म्हणे । सूर्यासी जैसे देखणे। तेजाने सूर्याच्या पै ॥४४॥ तैसे मज स्वामीचे हे ज्ञान ।

स्वामीप्रति करिता अर्पण । तेथे माझे काय वेचे धन । सांगाया कठीण मज काही ॥४५॥ तरी आता ऐका सर्वजणा । ज्ञानराजा आहेसी तू परमऋषी देखणा । तरी माझ्या ऐके साबडी वचना । चित्त देई जाणा सर्वज्ञा तू ॥४६॥ श्रवण ते ऐसे जाणा पाही । श्रवणेचि मन मुरे सर्वही । अहंभाव उरो न देई । आठवचि नाही देहाचा ॥४७॥ मनन ते ऐसे परी जाण । मनने आत्मानात्मा निवडे जेणें । चित्त उमटे परमात्मा सर्वां पूर्ण । मावळे मीपण समूळ जेथे ॥४८॥ निजध्यास समजे का वस्तूचा । जेथे नाशू होय सर्व कर्माचा । ओघ जाय अहंसरितेचा । जयाच्या निजात्मसागरी ॥४९॥ समाधान ऐसे मानी । जै मानस निश्चल आत्मदर्शनी । सर्वकाळ सदा अनुसंधानी । वृत्ती अचळपणी दंडाकार ॥५०॥ सोहं वृत्ती सर्वकाळ । ऐसा राहे जो अढळ । चित्ती कधीही न उमटे तळमळ । राहे निर्मळ स्वरूपी का ॥५१॥ त्याग तो ऐसा उमजे मज । जो का सर्वार्थी वीतराग । नाही आशा पाश इहपरत्री काज । वैराग्य उमज या नावे ॥५२॥ शमदमे इंद्रिये वर्तती नेमस्त । समाधानी ज्याचे चित्त । अनंत दुःखे जो न ढळे न तळमळीत । प्रसन्नचित्त सर्वदा ॥५३॥ ऐके सर्वज्ञा आणखी एक । कुलाळ चक्री बैसे मक्षिका देख । ती भ्रमे परी ठाई बैसका एक । तैसा आत्मसुखा मिनला जो ॥५४॥ का आमिषासी लुब्धला मीन । तो न सोडी जैसा गेलिया प्राण । तैसी स्वरूपी वृत्ती दंडायमान । नाही आठवण स्वदेहाची ॥५५॥ एका पांडुरंगावाचूनि । दुसरे न पाहे जनी वनी । ऐसे नामदेव बोलोनी । मस्तक चरणी ठेविती ॥५६॥ ज्ञानदेवासी म्हणे नामा। माझा अनुभव कथिला तुम्हां । या विरहित मज ठावा नसे ज्ञानमहिमा। हेही बोलविले आम्हां पांडुरंगे ॥५७॥ ऐसे एकमेका मार्गी बोलता ज्ञान । एकएका पाहती कसून । रमारमण आणि उमारमण । तैसे दोघेही जण मार्गी दिसती ॥५८॥ मार्गक्रमणा करीत करीत । संतां भेटती सांगाती घेती त्यांत । मार्गी मंडळी मिळाली बहुत । संग इच्छित संतांचा ॥५९॥ येऊनि राहिले करवीर क्षेत्री । महालक्ष्मी पाहोनी पुढे क्रमिती । तुळजादेवी दर्शना येती । तंव पुढे देखती तेरे ते (तेरगांव) ॥६०॥ तेथे हिंडत हिंडत मंडळी । गोराबांचे घरी पातले ते वेळी । हरिनाम गर्जत वाहाती टाळी । तंव आला जवळी गोरोबा ॥६१॥ नामदेव नरहरी ज्ञानदेवादी वैष्णववीर ।



त्यांसी नमस्कारी गोरा कुंभार । समस्तांसी करोनी आदर । बैसवी आसनावर, नमस्कारी ॥६२॥ घरी पाहता संतमंडळी । मृत्तिकापात्रे जंव न्याहाळी । शंखचक्रपद्मादी चिन्हे ते काळी । म्हणती सकळीक हे पाहे पा कैसे ॥६३॥ शंख चक्र ध्वजा चिन्हे मुद्रांकित । मृत्तिकापात्रे पाहोनी विचारीत । गोरोबासी म्हणती समस्त । तुम्हां नाही हस्त मडकी कोण करी ॥६४॥ मग म्हणे गोरा कुंभार । देवे दिला विठू गुमास्ता साचार । घरीचा सर्व व्यापार । मडकी अपार तो करी ॥६५॥ गोरोबा म्हणे संतमंडळीशी । विठू ऐसा कामारी नाही पृथ्वीसी । एवढा खटाटोप एकला करी तेरगावांसी । तोचि आम्हांसी प्रतिपाळी ॥६६॥ समस्तही म्हणती गोरोबासी । दावा तुमच्या गुमास्त्यासी । एवढा प्रपंच खटला करी अहर्निशी। एकला तेरगावांसी कैशा परी ॥६७॥ तरी तो पाहू आधी भागीन । तुम्ही जाऊनि आणा त्यासी त्वरेने । म्हणोनी गोरोबासी पाठविले सर्वांनी । इकडे विठू निघून जाता जाहला ॥६८॥ विठोबा म्हणे रुक्माईते । गोरोबाचे घरी आलेती वैष्णव संत । ते त्यासी देतील पुत्र आणि हस्त । आपण का व्यर्थ बैसावे ॥६९॥ रखमाई म्हणे तुम्ही आजपावेतो त्याचे । न्यून का पडो दिले हस्ताविण भक्ताचे । देव म्हणे कर्म स्वाधीन नसे आमुचे । असे भक्ताचे हाती कर्म ॥७०॥ आम्ही भक्ताचे कणवे करावे दास्य । भक्ती करावा पूर्व कर्माचा नाश । पूर्व कर्म अनावर आम्हांस । म्हणोनी दास्य करणे आम्हां ॥७१॥ ऐसे म्हणोनी विठू कुटुंबासहित जाय । भाविक तेथे काही न राहे । गोरोबा त्याचे घरी येऊनि पाहे । घर भणभणीत आहे नुसतेची ॥७२॥ गोरोबा येऊनि सर्वांसी सांगत । विठू गावा गेला नसे घरात । मी तुम्हांसी भोजना पाक करवीत । सिद्ध जाहलिया त्वरित तुम्ही यावे ॥७३॥ तंव गोरोबासी बोले ज्ञानेश्वर । ब्राह्मण शिंपी लिंगाइत आणि सोनार । भोजने एके ठाई न घडे साचार । याती भिन्न भिन्न विचार जमलेसे ॥७४॥ एकाचे तो ब्रह्म कर्म । एकाचा असे लिंगधर्म । वर्णावर्ण न मिळे आणि मनोधर्म । ज्ञानदेव म्हणे मी कोण हे वर्म कोणा न कळेचि ॥७५॥

**- (क्रमशः)**

□□

# संत तुकाराम आणि संत कबीर ; चरित्र व वाङ्मय

लेखांक : १०

डॉ.कृ.ज्ञा.भिंगारकर

---

**भक्तीचे विविध प्रकार :**

भगवंतांवर अहेतुकपणे निष्काम, एकनिष्ठ व अखंड प्रेम करणे यालाच 'भक्ती' म्हणतात. 'नारदभक्तिसूत्रे' आणि 'शांडिल्य भक्तिसूत्रां'प्रमाणे भगवंतांवर पराकाष्ठेचे प्रेम करणे म्हणजे 'भक्ती'.

**सा त्वस्मिन् परमप्रेमरूपा ॥ना.भ.सू.२॥**

**सा परानुरक्तिरीश्वरे ॥शां.भ.सू.२॥**

'हरिभक्ति रसामृतसिंधु'मध्ये रूपगोस्वामींनी भक्तीचे दोन प्रकार मानलेले आहेत. (१) परा भक्ती; आणि (२) गौणी भक्ती. 'परा भक्ती' सर्वांत श्रेष्ठ आहे आणि भक्त जेव्हा सिद्धावस्थेला पोहोचतो तेव्हाच ती भक्ती प्राप्त होऊ शकते. भक्ताच्या साधना-अवस्थेतील जी भक्ती असते, तिला 'गौणी भक्ती' असे म्हणतात. तिचे दोन प्रकार आहेत. 'वैधी' आणि 'रागात्मिका' किंवा 'रागानुगा'. अनेक विधिविधानांच्या द्वारे केलेली भक्ती ही 'वैधी भक्ती' होय. **'विधिसाध्यमाना वैधी सोपानरूपा ।'**. 'रागात्मिका भक्ती' प्रभुप्रेमावर आश्रित असते. तिच्यामुळे शांती आणि प्रेमरसाचा आनंद मिळतो. **'रसानुभाविकानंदशांतिप्रदा रागात्मिका ।'** (दैवी मीमांसादर्शन, रसवाद सू.१२).

ही भक्ती दोन प्रकारची असते. 'कामरूपा' आणि 'संबंधरूपा'. गोपींची भक्ती 'कामरूपा' होती. कारण कृष्णभक्तिसुखाव्यतिरिक्त इतर गोष्टी त्या तुच्छ मानीत होत्या. 'संबंधरूपा भक्ती' ही भगवंत व भक्त यांच्या संबंधावर आधारित असते. संबंधांच्या दृष्टीने ही चार प्रकारची आहे. 'दास्य', 'सख्य', 'वात्सल्य' आणि 'दांपत्य'. 'रागात्मिका भक्ती'च्या शेवटच्या पायरीवर पोहोचलेला भक्त, 'परा भक्ती'त प्रवेश करून प्रभुप्रेमाच्या आनंदात सदैव मग्न



असतो. तो सर्वत्र त्यालाच पाहतो, त्यालाच ऐकतो, त्याच्याशीच बोलतो आणि त्याचेच चिंतन करतो. **'तत्प्राप्य तदेवावलोकयति तदेव शृणोति तदेव भाषयति तदेव चिंतयति ॥ना.भ.सू.५५॥'** या प्रेमाचा आस्वाद 'मूकास्वादनवत्' अनिर्वचनीय आहे.

श्रीमद् भागवतात, साधनेच्या दृष्टीने भक्तीचे नऊ प्रकार सांगितलेले आहेत. तीच 'नवविधा भक्ती' होय. ती क्रमाने पुढीलप्रमाणे आहे. 'श्रवण', 'कीर्तन', 'स्मरण', 'पादसेवन', 'अर्चन', 'वंदन', 'दास्य', 'सख्य' आणि 'आत्मनिवेदन'.

**श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनम् ।**

**अर्चनं वंदनं दास्यं सख्यं आत्मनिवेदनम् ॥श्री.भा.७.५.२३॥**

नारदभक्तिसूत्रांनुसार, भक्ती एक प्रकारची असून सुद्धा आसक्तीच्या दृष्टीने अकरा प्रकारांची आहे. 'गुणमाहात्म्यासक्ती', 'रूपासक्ती', 'पूजासक्ती', 'स्मरणासक्ती', 'दास्यासक्ती', 'सख्यासक्ती', 'कांतासक्ती', 'वात्सल्यासक्ती', 'आत्मनिवेदनासक्ती', 'तन्मयतासक्ती' आणि 'परम-विरहासक्ती'. (ना.भ.सू.८२).

'गुणमाहात्म्यासक्ती'मध्ये नवविधा भक्तीच्या श्रवण आणि कीर्तनाचा समावेश होतो. 'पूजासक्ती'मध्ये पादसेवन आणि वंदनाचा, 'स्मरणासक्ती'मध्ये स्मरणाचा, 'दास्यासक्ती'मध्ये दास्याचा, 'सख्यासक्ती'मध्ये सख्याचा आणि 'आत्मनिवेदनासक्ती'मध्ये आत्मनिवेदनाचा समावेश होतो. 'रूपासक्ती', 'कांतासक्ती' आणि 'वात्सल्यासक्ती' यांचा नवविधा भक्तीत समावेश होत नाही. परंतु त्यांचा समावेश 'रागात्मिका' भक्तीत अवश्य होऊ शकतो.

संत तुकाराम महाराजांच्या भक्तिरसपूर्ण अभंगांत, भक्तीच्या सर्व प्रकारांचे सांगोपांग विवेचन जरी आलेले नसले, तरी भक्तीचे अनेक प्रकार त्यांच्या अभंगांत दिसून येतात. संत तुकाराम महाराज नवविधा भक्तीचे समर्थक होते. त्यांच्या पुढील अभंगात नवविधा भक्तीचा उल्लेख आलेला आहे.

**जाणे भक्तीचा जिव्हाळा । तोचि दैवाचा पुतळा ॥१॥**

**आणिक न ये माझ्या मना । हो का पंडित शहाणा ॥२॥**

**नामरूपी जडले चित्त । त्याचा दास मी अंकित ।।३।।**

**तुका म्हणे नवविध । भक्ती जाणे तोचि शुद्ध ।।तु.गा.४.७३६।।**

किंवा;

**नवविधीचा निषेध । जेणे मुखे करिती वाद ।**

**जन्मा आले निंद्य । शूकरयाती संसारा ।।तु.गा.१४३९।।**

संत तुकाराम महाराजांच्या काव्यात नवविधा भक्तीशी संबंधित अनेक अभंग ठिकठिकाणी आलेले आहेत. त्यांचे संक्षिप्त विवेचन याठिकाणी प्रस्तुत केले आहे.

## (१) श्रवण भक्ती

**संत तुकाराम :**

भगवंतांचे नाम, यश, महत्त्व, गुण आणि त्यांच्या लीलांचे वर्णन श्रद्धापूर्वक ऐकणे किंवा दुसऱ्याला ऐकविणे यालाच 'श्रवण भक्ती' असे म्हणतात. संत तुकारामांनी सुद्धा आपल्या आराध्य दैवताच्या, विठ्ठलाच्या यश, श्री, औदार्य, ज्ञान, वैराग्य आणि ऐश्वर्य या गुणांचे श्रद्धेने वर्णन केलेले आहे.

**सकलगुणे संपन्न । एक देवाचे लक्षण ।।१।।**

**वरकड कोठें काहीं । एक आहे एक नाही ।।२।।**

**षड्गुणऐश्वर्य संपन्न । एक भगवंती जाण ।।३।।**

**तुका म्हणे जें जें बोला । तें तें साजे या विठ्ठला ।।तु.गा.४.३७५१।।**

अशा सर्वगुणसंपन्न भगवंतांच्या नामाचे आणि लीलांचे नित्य श्रवण केल्यामुळे, भक्ताच्या हृदयातील पापे हळू हळू धुतली जातात व तो अनन्य भक्त बनतो. असा हा अनन्य भक्त भगवंतांना प्रार्थना करतो की, ''भगवंता ! माझ्या कानांवर नेहमी तुझे पवित्र नाम पडो व माझी जिव्हा नेहमी तुझ्या मधुर नामाचा उच्चार करो. माझ्या अंतःकरणात नामस्मरणाबद्दल विश्वास निर्माण होवो आणि काया-वाचा-मनाने नामसंकीर्तन घडो !

**हरी तुझे नाम गाईन अखंड । याविण पाखंड नेणें कांहीं ।।१।।**

**अंतरी विश्वास अखंड नामाचा । कायावाचामनें देईं हेंचि ।।२।।**

**तुका म्हणे आतां देईं संतसंग । तुझे नामीं रंग भरो मना ।।तु.गा.३.४०१४।।**



श्रवणाला चिंतनाची, मननाची जोड सदैव दिली पाहिजे. **'काळ सारावा चिंतने ।'**. कारण चिंतनाने व मननाने विठ्ठलाचा निदिध्यास लागतो व त्या ध्यासातूनच आत्मसाक्षात्कार होतो. मात्र या 'श्रवण' भक्तीसाठी मनामध्ये अपूर्व चिकाटी लागते. **'नव्हते अभ्यासी चित्त आधी । (तु.गा.१३३३)'** असे संत तुकारामांनी आपल्या आत्मवृत्तात म्हटलेले आहे. यावरून 'श्रवण भक्ती' व 'अभ्यास' हे दोन्हीही किती अवघड आहेत हे सहज समजते. 'श्रवण भक्ती'साठी मनात श्रद्धा असावी लागते. श्रद्धा व विश्वास नसेल तर, भक्तीच्या मार्गावर साधकाला चालताच येत नाही. संत तुकाराम आपल्या आत्मानुभवात म्हणतात; **'कांही पाठ केलीं संतांची उत्तरें । विश्वासें आदरें करोनिया । (तु.गा.१३३३)'**. श्रद्धा ठेवून, कंटाळा न करता भक्तिमार्गावर चालत राहिले की, भक्ताला त्याचे गोमटे फळ मिळते.

**संत कबीर :**

संत तुकाराम महाराजांनी ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, रामायण इत्यादी ग्रंथांचा अभ्यास केला होता. शास्त्रांचे आणि पुराणांचे श्रवण केले होते. परंतु संत कबीर निरक्षर होते. त्यांना लिहिता-वाचता येत नव्हते. ते स्वतःच म्हणतात; **'मसि कागज छुओ नहीं, कलम गह्यो नहीं हाथ ।'** (मी कागद आणि शाईला कधी स्पर्श केलेला नाही. हातात लेखणी धरलेली नाही.) तरी संत कबीरांनी एवढे ज्ञान कसे मिळविले ? संत कबीरांनी हे ज्ञान श्रवणाने आणि संतसंगतीने मिळविले. संत कबीर जन्मभर विद्येच्या माहेर घरी म्हणजे काशी क्षेत्री राहिले. तेथे नेहमी अनेक विद्वान-पंडित, योगी, नाथ संप्रदायी महात्मे व अनेक संप्रदायांचे लोक येत असत. त्यांची कीर्तने, प्रवचने ऐकून संत कबीरांनी ज्ञान मिळविले. संत कबीरांनी साधुसंतांकडून अनेक शास्त्रांचे श्रवण केले. समर्थ रामदासस्वामींनी सांगितल्याप्रमाणे त्यांनी फक्त सार घेतले, असार सोडून दिले.

**ऐसें हें अवघेंचि ऐकावे । परंतु सार शोधून घ्यावें ।**

**असार तें जाणोनि त्यागावें । या नाव श्रवणभक्ति ।।दा.बो.४.१.२९।।**

संत कबीरांनी निरंतर भगवंतांचे गुण श्रवण केल्यामुळे, त्यांच्या हृदयात भगवंतांचे गुण इतके पक्के बसलेले आहेत की, त्यांना पाणी पिण्याची सुद्धा भीती वाटते. कारण प्यायलेल्या पाण्यामुळे ते गुण धुतले जाऊ नयेत.

**गोव्यंद कै गुण बहुत हैं, लिखे जु हिरदै माँहि ।**
**डरता पाँणी ना पीऊं, मति वै धोये जाँहि ॥क.ग्रं. पृष्ठ ६२॥**

येथे 'पाणी पिणे' यातून 'विषयांची तृप्ती करणे' आणि 'मायेत अडकून राहणे' हा भाव प्रकट झालेला आहे.

संत कबीर म्हणतात की, सात समुद्रांची शाई केली, सर्व जंगलाची लेखणी केली, पृथ्वीचा कागद केला तरी, भगवंतांचे गुण लिहिले जाऊ शकणार नाहीत.

**सात समंद की मसि करों, लेखनि सब बनराइ ।**
**धरती सब कागद करौं, तऊ हरि गुण लिख्या न जाइ ॥क.ग्रं. पृष्ठ ४८॥**

संत तुकाराम महाराजांनी सुद्धा, श्रीविठ्ठलाच्या गुणवर्णनाच्या बाबतीत हेच सांगितलेले आहे.

**तुझी कीर्ती सांगो तुजपुढे जरी । ब्रह्मांडींही हरी माईना ते ।**
**मेरूची लेखणी सागराची शाई । कागद हा मही न पुरेचि ॥तु.गा.४१३१॥**

त्या भगवंतांच्या कृपेनेच संत कबीर त्यांचे गुणगान करू शकतात. **'जिनि ब्रह्माण्ड रच्यो बहु रचना ।'** ज्याने ब्रह्मांडाची रचना केली, त्या परमेश्वराला कसे विसरता येईल ? जो परमेश्वराच्या गुणसंकीर्तनात मग्न असतो, त्याचे सगळे भ्रम आणि कर्म समाप्त होतात. (क.ग्रं. पृष्ठ १२९). भगवंतांचे गुणसंकीर्तन करताना, क्षणभर संत कबीर हे विसरतात की, त्यांचा निर्गुण निराकारावर विश्वास आहे. त्यांचे उपास्य निर्गुण निराकार ब्रह्म आहे.

## (२) कीर्तन भक्ती

### संत तुकाराम :

भगवंतांचे नाम, गुण, लीला उच्च स्वराने गाणे म्हणजेच 'कीर्तन भक्ती' होय. सर्व संतांनी कीर्तनाचे महत्त्व मुक्तकंठाने गायिले आहे. कीर्तन प्रत्यक्ष देवालाही आवडते. **'कीर्तनाची गोडी । देव निवडी आपण । (तु.गा.१०११)'** कीर्तनाचा मार्ग हा 'राजमार्ग' आहे. प्रत्यक्ष पांडुरंगांना वश करण्याचे सामर्थ्य कीर्तनात आहे.

**कलियुगामाजी करावें कीर्तन । तेणें नारायण देईल भेटी ॥तु.गा.९६.२॥**



संत तुकाराम महाराज सांगतात की; ''परमेश्वराच्या भेटीसाठी युक्ताहार किंवा योगमार्गादी साधना करण्याची आवश्यकता नाही. भवसागर तरून जाण्यासाठी परमेश्वराने अगदी सोपा मार्ग सांगितला आहे. कलियुगामध्ये, कीर्तन करण्याने भगवंतांची प्राप्ती होईल. त्यासाठी योग-यागादी साधने करण्याची जरुरी नाही.''

**युक्ताहार न लगे आणिक साधनें । अल्प नारायणें दाखविलें ॥१॥**
**कलियुगामाजी करावें कीर्तन । तेणें नारायण देईल भेटी ॥२॥**
**न लगें हा लौकिक सांडावा वेव्हार । ध्यावे वनांतर भस्म दंड ॥३॥**
**तुका म्हणे मज आणिक उपाव । दिसती ते वाव नामाविण ॥तु.गा.९६.४॥**

हरिकथा ही सर्व दुःखांचा नाश करून जीवाला मुक्त करते. हरिकथा हेच तप आणि ध्यान आहे. कीर्तनाच्या वेळी यम सुद्धा थरथर कापतो. पुढील अभंगात संत तुकाराम महाराजांनी कीर्तनाने होणारे अनेक लाभ सांगितलेले आहेत.

**कथा दुःख हरी कथा मुक्त करी । कथा याचि बरी विठोबाची ॥१॥**
**कथा पाप नासी उद्धरिले दोषी । समाधि कथेसी मूढ जना ॥२॥**
**कथा तप ध्यान कथा अनुष्ठान । अमृत हे पान हरिकथा ॥३॥**
**कथा मंत्र जप कथा हरी ताप । कथा काळी कांप कळिकाळासी ॥४॥**
**तुका म्हणे कथा देवाचेही ध्यान । समाधि लागोन उभा तेथे ॥तु.गा.२१५४.५॥**

एके ठिकाणी श्रीतुकाराम महाराज म्हणतात; **'ब्रह्मरूप काया होतसे कीर्तनी ।'** कीर्तन म्हणजे देव, भक्त आणि नाम यांचा त्रिवेणी संगम असतो.

**कथा त्रिवेणी संगम । देव भक्त आणि नाम ।**

किंवा;

**तुका म्हणे ब्रह्मा नेणे वर्णू या सुखा ॥तु.गा.२३५७॥**

कलियुगात कीर्तनभक्तीला सर्वाधिक महत्त्व आहे. नामस्मरणाने एका व्यक्तीचा उद्धार होतो; परंतु कीर्तनाने समाजाचा उद्धार होतो. हरिकीर्तनाने असंख्य नरनारी शुद्ध होतात. सर्व तीर्थे हरिकीर्तनाच्या ठायी प्रत्यक्ष वास करतात. प्रत्यक्ष पांडुरंग हरिकीर्तनात नाचतो. हरिकीर्तनाचा महिमा अनुपमेय आहे. म्हणून संत तुकाराम महाराजांनी एकच प्रतिज्ञा केली आहे की;

**सांडूनि कीर्तन न करी आणिक काज ।**

**नाचेन निर्लज्ज तुझ्या रंगी ॥ तु.गा.२३५८॥**

कीर्तनकाराला काही पथ्ये पाळावी लागतात. तीही संत तुकाराम महाराजांनी कठोर शब्दांत सांगितलेली आहेत. कीर्तनकाराने पैशांसाठी कीर्तन करू नये. जेथे कीर्तन असेल तेथे जेवण करू नये. कपाळाला बुक्का लावू नये. गळ्यात माळ घालू नये. घोडा-बैलांसाठी दाणा-पाणी मागू नये. कीर्तनासाठी पैसे घेणारे आणि देणारे दोघेही नरकात जातात.

**जेथें कीर्तन करावें । तेथें अन्न न सेवावें ॥१॥**

**बुक्का लावू नये भाळा । माळ घालू नये गळा ॥२॥**

**तटा वृषभासी दाणा । तृण मागों नये जाणा ॥३॥**

**तुका म्हणे द्रव्य घेती । देती तेही नरका जाती ॥तु.गा.३०८४.४॥**

ही सर्व पथ्ये संत तुकाराम महाराज स्वतः पाळीत होते.

### संत कबीर :

सगुण भक्ती करणाऱ्या सर्व संतांनी कीर्तनभक्तीचे महत्त्व मुक्त कंठाने गायिले आहे. परंतु निर्गुण भक्ती करणाऱ्यांनी, भक्तीतील उपचार सोडून अंतःसाधनेवर जोर दिला आहे. ज्याला गुण नाही, आकार नाही अशा निर्गुण निराकार परब्रह्माचे कीर्तन कसे करणार ? त्यामुळेच संत तुकाराम महाराजांप्रमाणे संत कबीरांनी 'नवविधा' भक्तीच्या सर्व अंगांचा (विधांचा) स्वीकार केलेला नाही. कीर्तन, अर्चन आणि वंदन या तीन विधा फक्त सगुण भक्तीतच शक्य आहेत. निराकाराची उपासना करणारे भक्त मानसिक पूजेचे समर्थक आहेत. म्हणून संत कबीर, गुरु नानक, संत रैदास इत्यादी संतांनी अजपा-जपावरच जोर दिलेला आहे.

**च्यंत न सोज चित्त बिन चितवै, बिन मनसा मन होई ।**

**अजपा जपत सुंनि अभिअंतरि, यह तत जानै सोई ॥क.ग्रं. पृष्ठ ११८॥**

तरी देखील, खाली उद्धृत केलेल्या पदात, संत कबीरांनी हरिकीर्तनाचा महिमा गायिला आहे.



**चरन कमल गोबिंद रंग लागा ।**

**संतप्रसाद भये मन निर्मल, हरिकीर्तन महिं अनदिन जागा ॥क.ग्रं.पृ.२३१॥**

वास्तविक, संत कबीरांची कीर्तनभक्तीवर थोडी सुद्धा श्रद्धा नव्हती. उलट त्यांनी अशा कीर्तनकारांचा धिक्कार केला आहे, जे उच्च स्वरात कीर्तन करतात परंतु भगवंताशी एकनिष्ठ नसतात. ज्यांच्या मनात भक्ती नसते, ज्यांना आत्मज्ञानही प्राप्त झालेले नसते, अशा लोकांनी केलेले कीर्तन हा केवळ बाह्याचार असतो. संत कबीरांनी कठोर शब्दांत अशा लोकांचा विरोध केलेला आहे.

**करता दीसै कीरतन, ऊँचा करि करि तुंड ।**

**जाँणैं बूझे कुछ नहीं, यौंहीं आँधाँ रूँड ॥क.ग्रं. पृष्ठ २३१॥**

## (३) स्मरण भक्ती

### संत तुकाराम :

भगवंतांचे नाम, गुण, चरित्र, त्यांच्या लीला हे सर्व ध्यानात घेऊन त्यांचे सतत स्मरण करणे म्हणजे 'स्मरण भक्ती' होय. अखंड नामस्मरणानेच भक्त भगवंतांशी एकरूप होतो. अखंड श्रीकृष्णनाम घेतल्याने भक्त श्रीकृष्णरूप होतो. आसनावर बसले असताना, अंथरुणावर झोपताना, जेवण करीत असताना, अनेक भोग भोगत असताना देखील त्या नारायणाचे स्मरण करावे. दळण दळीत असताना नारायणाचे गुणगान ओव्यांतून करावे. कांडण करीत असताना व इतर कामे करीत असताना त्याचेच गायन करावे. श्रीतुकाराम महाराज म्हणतात की, ''एकनिष्ठतेच्या भावनेनेच या श्रीहरीचे भजन करावे. सूर्य आणि त्याची कांती जशी एकच; तसे तुम्ही व श्रीहरी एकरूप व्हाल !''

**कृष्ण गाता गीतीं कृष्ण ध्याता चित्ती । तेही कृष्ण होती कृष्णध्यानें ॥१॥**

**तुका म्हणे एका भावे भजा हरी । कांति ते दुसरी रूप एक ॥तु.गा.१८३५.५॥**

नवविधा भक्तीमध्ये, 'स्मरण भक्ती' सर्वांत श्रेष्ठ आहे. कारण ती आचरण्यास सोपी व सुलभ आहे. ईश्वरप्राप्तीसाठी योग, कर्म, ज्ञान इत्यादी अनेक मार्ग सांगितलेले आहेत. पण त्यांचे आचरण नामस्मरणापेक्षा कठीण

आहे. चंचल मनावर नियंत्रण ठेवल्याशिवाय योगाभ्यास शक्य नाही. विषयवासनांचा त्याग केल्याशिवाय वैराग्य शक्य नाही. जोपर्यंत देहबुद्धी जात नाही, तोपर्यंत कर्मफलाचा त्याग शक्य नाही. ज्ञानमार्गाने निर्गुण निराकाराची उपासना करणे सामान्य माणसाला कठीण आहे. म्हणून त्यांच्यासाठी 'नामस्मरणा'चा मार्ग सोपा आहे. त्यासाठी वनात जावे लागत नाही किंवा सांसारिक सुखाचा त्याग करावा लागत नाही. नामाची सुलभता स्पष्ट करताना संत तुकाराम महाराज म्हणतात;

**नामसंकीर्तन साधन पैं सोपें । जळतील पापें जन्मांतरें ॥१॥**

**न लगती सायास जावें वनांतरा । सुखें येतो घरा नारायण ॥२॥**

**ठायींच बैसोनि करा एकचित्त । आवडी अनंत आळवावा ॥३॥**

**राकृष्णहरि विठ्ठल केशवा । मंत्र हा जपावा सर्वकाळी ॥४॥**

**याविण असता आणीक साधन । वाहातसें आण विठोबाची ॥५॥**

**तुका म्हणे सोपें आहे सर्वांहूनि । शहाणा तो धणी घेतो येथें ॥तु.गा.२४५८.६॥**

संत तुकाराम महाराजांनी विठोबाची शपथ घेऊन सांगितले की; ''याहून सोपे असे दुसरे साधन नाही. भगवंतांच्या नामस्मरणाचा महिमा अपार आहे. श्रीविठ्ठलाचे नाम हे सर्व साधनांचे सार आहे. या नामामुळे सर्व पापे नष्ट होतात.

नामस्मरणाचे महत्त्व सांगताना, संत तुकारामांनी अनेक पौराणिक आख्यानांचा आधार घेतला आहे. ते म्हणतात की; ''आदिनाथ शंकर नित्य रामनाम घेतात. त्रैलोक्यात विहार करणारे देवर्षी नारद वीणेवर 'नारायण' नामाचा उच्चार करतात. नामस्मरणाच्या सामर्थ्यामुळे वाल्मीकी ऋषींनी 'रामायणा'सारख्या अलौकिक महाकाव्याची रचना केली. नामस्मरणामुळेच एका गणिकेचा उद्धार झाला. अहल्या शापातून मुक्त झाली. प्रह्लादांचे रक्षण झाले. हलाहल प्राशन केल्यामुळे होणारा शिवांचा शारीरिक दाह नामस्मरणानेच शांत झाला. ज्याठिकाणी नामाचा गजर चालू असेल, त्याठिकाणी भगवंत प्रत्यक्ष उपस्थित असतात. नामस्मरणाने भक्त जन्ममरणांच्या चक्रातून मुक्त होतो.'' (तु.गा.४४९७).

संत तुकाराम महाराजांचा नामस्मरणावर इतका विश्वास होता की, ते म्हणतात, ''नाम घेतल्यामुळे वाया गेला असा कोणी ऐकला आहे काय ?''



**नाम घेता वाया गेला । ऐसा कोणी आइकिला ॥**

**सांगा विनवितो तुम्हांसी । संत महंत सिद्ध ऋषी ॥तु.गा.२३९२॥**

**मुखी नाम हाती मोक्ष । ऐसी साक्ष बहुतांसि ॥तु.गा.२२९५॥**

म्हणूनच एका ठिकाणी बसून प्रेमाने नामस्मरण करावे.

**ठायीच बैसोनि करा एकचित्त । आवडी अनंत आळवावा ॥**

समुद्रवलयांकित पृथ्वीचे दान केले तरी, त्याची नामाशी बरोबरी करता येणार नाही. म्हणून आळस न करता नामस्मरण करावे.

**समुद्रवळयांकित पृथ्वीचें दान । करितां समान न ये नामा ॥१॥**

**म्हणऊनि कोणी न करावा आळस । म्हणा रात्रीदिवस राम राम ॥२॥**

- तु.गा.२२९८

संत तुकाराम महाराज कळवळून सांगतात की, बाबांनो तुम्ही नाम घ्या.

**हाकारोनि सांगे तुका । नाम घेतां राहों नका ॥**

ते म्हणतात की, ''तुमच्या पायांवर मस्तक ठेवून विनंती करतो की, वेळोवेळी 'विठ्ठल विठ्ठल' म्हणा. स्वर्गात सुद्धा हा सुखसोहळा अनुभवायला मिळणार नाही. 'कृष्ण', 'विष्णू', 'हरी', 'गोविंद', 'गोपाळ' ही नामे वैकुंठ-प्राप्तीची सोपी साधने आहेत.'' आणखी या मार्गाचे वैशिष्ट्य असे आहे की;

**सकळांसी येथे आहे अधिकार । कलियुगीं उद्धार हरिनामें ॥१॥**

**तुका म्हणे नामापाशी चारी मुक्ती । ऐसे बहुग्रंथी बोलियेले ॥तु.गा.२८७४.२॥**

नामस्मरणाचा विरोध करणाऱ्यांची तुकाराम महाराजांनी खूप निंदा केली आहे. श्रीतुकाराम महाराज म्हणतात की, ''जो वाचेने नाम उच्चारित नाही, तो दोन बापांचा पुत्र आहे. त्याच्या सहवासात न राहणेच चांगले. जो जिभेने हरिनाम घेत नाही, त्याचे तोंड चांभाराच्या कुंडाप्रमाणे आहे.'' (तु.गा.२९८२). याबाबतीत संत तुकाराम स्वतःबद्दलही कठोर आहेत. ते म्हणतात की; ''क्षणभर जरी तुझ्या नामाचे विस्मरण झाले, तरी मला कोटी हत्या केल्याचे पाप लागेल !''

संत तुकाराम महाराजांचे संपूर्ण जीवन हे स्मरणभक्तीचा आदर्श आहे.

## संत कबीर :

साधनेच्या क्षेत्रात अहंकाराचा पूर्णपणे त्याग करणे आवश्यक आहे. भक्त स्वतःला अत्यंत तुच्छ व अवगुणी समजतो आणि आपल्या सर्व इच्छा, सर्व कर्मे ईश्वराला अर्पण करतो. साधूंच्या संगतीत त्याला अतिशय आनंद मिळतो. संत कबीर म्हणतात की, ''पवित्र अंतःकरणाने जो रामाचे गुणगान करतो, तो भक्त मला आवडतो.'' **'सो भगता मेरे मनि भावै ।'** जे संत अखंड रामनाम घेतात, त्यांच्यावरून मी माझा जीव ओवाळून टाकीन. संत कबीर, साधु-संतांच्या संगतीचा लाभ मिळवण्यासाठी वाटेल तो त्याग करण्यास तयार आहेत. ते स्वतःला त्यांच्यासमोर अत्यंत तुच्छ मानतात. ते म्हणतात;

**जिहिं घटि राम रहे भरपूरि, ताकि मैं चरनन की धूरी ।।**

''जे रामनाम घेण्यात रंगून गेलेले आहेत, अशा संतांच्या पायीची मी धूळ आहे !''

या उलट जे रामाची भक्ती करीत नाहीत, त्यांचे जीवन व्यर्थ आहे. शरीर कितीही सुंदर असले तरी रामभक्तीशिवाय ते कुरूपच आहे. **'रामभगति बिन कुचल कुरूप ।'** जन्माला येऊन त्यांनी काय मिळवले ? रामनामाकडे पाठ फिरवणाऱ्या जीवांचा धिक्कार करीत ते म्हणतात की, ''ज्यांनी रामावर प्रेम केले नाही, अशांच्या जीवनाला आग लागो !'' **'जरि जाव ऐसा जीवनाँ, राजा रामसूँ प्रीती न होई ।'** संत कबीरांच्या दृष्टीने, जे रामनाम घेत नाहीत ते आध्यात्मिक दृष्टीने अंधळेच आहेत. ते नामस्मरणापुढे सिद्धींना सुद्धा तुच्छ समजतात. जोपर्यंत साधक मुखाने रामनाम उच्चारत नाही, तोपर्यंत त्याला जन्म-मरणांच्या चक्रातून हिंडावे लागते.

खऱ्या साधकाला योगाचा अभ्यास करणे, मस्तकाचे मुंडण करणे, बिंदू स्थिर करणे इत्यादी बाह्याडंबराची काही आवश्यकता नाही. संत कबीरांनी या बाह्याडंबरांची खूप टिंगल केली आहे. ते म्हणतात की, ''जर नग्न फिरण्याने योग साध्य झाला असता, तर जंगलातील सर्व पशूंना मोक्ष का नाही मिळाला ? केस कापण्याने जर स्वर्ग मिळाला असता, तर सर्व मेंढ्या स्वर्गात



गेल्या असत्या. जर केवळ वीर्य-रक्षणाने परमपदाची प्राप्ती झाली असती, तर नपुंसक त्याचे अधिकारी झाले असते !'' असा उपहास करून शेवटी संत कबीर सांगतात; ''बाबांनो, माझे ऐका. रामनामाशिवाय मुक्ती मिळत नाही. म्हणून रामाचे नामस्मरण करीत सत्याच्या मार्गाने चालण्याचा प्रयत्न करा.'' (क.ग्रं. पृष्ठ ९९).

नामस्मरणाबरोबरच संत कबीरांनी चित्तशुद्धीवर जोर दिलेला आहे. केवळ 'राम' नामाचा उच्चार करण्याने मोक्ष मिळणार नाही. 'साखर' शब्दाचा फक्त उच्चार केल्याने तोंड गोड होणार नाही, केवळ 'अग्नी' शब्दाचा उच्चार केल्याने तोंड पोळणार नाही. **'जल कही त्रिषा बुझाई ।'** 'पाणी' म्हटल्याने तहान भागणार नाही. 'भोजन' म्हटल्याने भूक भागणार नाही. तसे असते तर, सर्वांचाच उद्धार झाला असता. अनुकरणामुळे पिंजऱ्यातला पोपट सुद्धा 'विठू विठू' म्हणतो. पण त्याला त्या शब्दाचा अर्थ माहीत नसतो. नामस्मरण करताना, नामाचा उच्चार करताच त्या परमेश्वराच्या गुणांचे व लीलांचे स्मरण व्हायला पाहिजे. त्या नामाच्या ठिकाणी प्रेम उत्पन्न व्हायला पाहिजे.

संत कबीरांनी, संतांच्या सेवेत आणि गोविंदाच्या गुणगानात जीवनाची सार्थकता मानली आहे. नामस्मरणाचा उद्देश काय आहे ? या प्रश्नाचे उत्तर देताना संत कबीर म्हणतात की, ''चित्त चंचल आहे. चारी बाजूंनी वासनेची आग पेटलेली आहे. नामस्मरणाच्या पाण्यानेच ती आग विझविणे शक्य आहे !'' (क.ग्रं. पृष्ठ ७).

**कबीर चित चमकिया चहुँ दिसि लागी लाइ ।**
**हरि सुमिरण हाथूं छडा, बेगे लेहु बुझाई ।।**

संत कबीर सांगतात की, ''स्वतः तर रामनाम घ्याच; पण दुसऱ्यालाही रामनाम घेण्याचा आग्रह करा. मीच नाही; तर ब्रह्मदेव आणि शंकरांनीही सांगितले आहे की, रामनाम हेच सार तत्त्व आहे. नामस्मरण मनाने, वाचेने, शरीराने भक्तिपूर्वक केले, तर ते अत्यंत प्रभावी होते आणि परिणामस्वरूप भक्त राममय होऊन जातो. मग कोणापुढे मस्तक नमवायचे ?''

**अब मन रामहि व्है रह्या, सीस नवावौं काहि ।**

हे रामनामाचे भांडार सर्वांना सुलभ आहे. हे लुटायचे असेल तर अवश्य लुटा, जन्माचे सार्थक होईल. **'लूटि सके तो लूटियो ।'** त्या परमेश्वराचे दर्शन होणे अत्यंत कठीण आहे; कारण साधनेचा हा मार्ग अत्यंत अवघड आहे, वाटेत अनेक प्रकारच्या अडचणी येतात. पण मनात ज्याप्रमाणे मायेचे अस्तित्व असते, त्याप्रमाणे रामाचे अस्तित्व असेल तरच भक्ताला रामाचे दर्शन होते, स्वस्वरूपाचे ज्ञान होते. यासाठी घोर तपस्या करावी लागली तरी साधकाने ती करावी.

**यहु तन जालौं मसि करौं, लिखौं राम का नाऊँ ।**
**लेखणि करुँ करंक की, लिखि लिखि राम पठाउँ ।।क.ग्रं. पृष्ठ ६।।**

हे शरीर जाळून मी त्याची शाई करीन आणि त्या शाईने रामनाम लिहीन. संत कबीर म्हणतात की, ''सर्वांना सांगत असतो की रामनाम घ्या, तुमचे कल्याण होईल; पण कोणीच ऐकत नाही !''

**कबीर कहता जात है, सुणता है सब कोइ ।**
**राम कहै भला होईगा, नहिं तर भला न होइ ।।क.ग्रं. पृष्ठ ४।।**

संत कबीरांनी आपल्या तत्त्वदर्शी दृष्टीने, त्यावेळी प्रचलित असलेल्या सर्व नामांचा उल्लेख केलेला आहे. त्यात पंढरपूरच्या विठ्ठलाचे नामही आलेले आहे. 'कबीर ग्रंथावली'मध्ये पुढील नामांचा उल्लेख आलेला आहे. 'ॐ', 'राम', 'कृष्ण', 'विष्णू', 'परब्रह्म', 'साई', 'हरि', 'गोविंद', 'केशव', 'कमलाकांत', 'श्रीरंग', 'बनवारी', 'मुकुंद', 'नारायण', 'माधव', 'निरंजन', 'अल्ला', 'नूर', 'रहीम', 'खुदा', 'कर्तार', 'साहिब', 'करीम' इत्यादी. डॉ.सरनामसिंह शर्मा (कबीर : व्यक्तित्व, कृतित्व एवं सिद्धांत, पृष्ठ ४७६) आणि डॉ.मुंशीराम शर्माजींनी (भक्ति का विकास, पृष्ठ ४५२-४५८) या नावांची गणना करून असा निष्कर्ष काढला आहे की, ''जे विद्वान संत कबीरांना कोण्या मुसलमान किंवा पीराचा शिष्य मानतात, त्यांना ही नावे पाहून आपले मत बदलावे लागेल. संत कबीरांचे काव्य हिंदुत्वाने भरलेले आहे.''

**- (क्रमशः)**

□□



# एका जीवननिष्ठाचा वाङ्मयीन परिचय

**लेखांक : ६**

प्रा.जयंत वष्ट

---

ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, तुकाराम आणि रामदास हे प्रा.व.दि.कुलकर्णी यांना प्रातःस्मरणीय होते. या कविपंचकावर विस्ताराने वाङ्मयविमर्शात्मक आणि रसास्वादक असा एक ग्रंथ लिहिण्याचे त्यांनी पार्ले महाविद्यालयात असल्यापासूनच योजले होते. पण प्रत्यक्षात तशी बैठक कधी जमलीच नाही. तेव्हा प्रसंगाप्रसंगांनी या संतांविषयी त्यांनी जे स्फुट लेखन केले, तेच लेख एका विशिष्ट सूत्रात गुंफून, त्यांनी **'संतसारस्वत : आकलन आणि आस्वाद'** हा लेखसंग्रह तयार केला आहे आणि मध्ययुगीन मराठी संतकाव्याच्या अभ्यासकांच्या हाती ठेवला आहे. हा संग्रह मुंबई विद्यापीठाच्या मराठी विभागाच्या रौप्यमहोत्सवी वर्षात; म्हणजे सन १९९४ मध्ये प्रकाशित झालेला आहे.

'संत-सारस्वत' म्हणजे काय ? या पहिल्याच लेखाच्या प्रारंभी, त्यांनी 'ज्ञानेश्वरी'ला 'मराठीतील संत-सारस्वताची पायाभरणी करणारा व त्याचा कळसही दर्शविणारा आद्य ग्रंथ' असे म्हटले आहे आणि तत्त्वज्ञ, संत आणि कवी हे जरी तीन शब्द असले, तरी त्यांचा अर्थ एक 'ज्ञानेश्वर' असाच कसा होतो, त्याचेही विवरण केले आहे. तसेच 'साहित्यकृतीमधला मी' आणि 'संत-सारस्वतातला मी' यांमधला फरक सांगितला आहे. संतसाहित्यातल्या 'मी'चे स्वरूप आणि व्याप्ती लौकिकातल्या मीपेक्षा वेगळी असते म्हणजे कशी असते ? ते मांडले आहे. या साहित्यातल्या अनुभवाची अभिव्यक्ती 'मौन' असल्याचे प्रतिपादले आहे. संतांची अनुभवसृष्टी आणि सामान्यांची अनुभवसृष्टी याविषयी सांगता सांगता, 'व.दि.' संतसाहित्यातील अनुभवसृष्टी ही **'यतो वाचो निवर्तन्ते अप्राप्य मनसासह'** अशी असल्याचे स्पष्ट करतात.

'शब्दरहस्या'नंतर, ज्ञानेश्वरीचे काव्यरहस्य कशात आहे, हे 'व.दि.'

उलगडतात. केशवसुत, बी, यांची काव्ये दूरस्थ नसतात, तर ती आपली असतात. संतवाणी मात्र 'व.दिं.'ना दुरून, क्षितिजापलीकडून, पार अनंतातून कुठूनतरी येत आहे असे जाणवत राहते.

'अमृतानुभव' समजणे म्हणजे, 'या काव्यग्रंथाची चित्रे पाहण्याची कल्पकतापूर्ण क्षमता अंगी येणे' असे त्यांना वाटते. सामान्यांसाठी लिहिलेले ज्ञानेश्वरांचे ग्रंथ 'अंतरंग-अधिकारी' यांच्यासाठीही आहेत. आपण तसे होऊ शकत नाही असे म्हणतानाच, 'व.दिं.'नी संतांची कविता ही शांतरसाच्या भूमीवरची 'शांतिकथा' असल्याचे सांगितले आहे.

ज्ञानेश्वरीत, सर्व संतकाव्यात, 'शांतरस' हा स्थायी आहे. त्या रसाचे काव्यशास्त्र 'व.दि.' आपल्या पद्धतीने मांडण्याचा प्रयत्न करताना दिसतात. **'वाचे बरवें कवित्व। कवित्वीं बरवें रसिकत्व । रसिकत्वीं परतत्त्व । स्पर्शु जैसा ॥ज्ञाने.१८.१४.३४७॥'** ही ज्ञानेश्वरांची संत-सारस्वताची व्याख्या संस्कृततही **'वाक्यं परतत्त्वस्पृष्टरसात्मकं काव्यं'** अशी मांडतात. ज्ञानेश्वरांचे परतत्त्वस्पृष्ट रसात्मकतेचे लक्षण त्यांच्या दृष्टीने संत-सारस्वताचे आदिलक्षण ठरते.

पू.श्री.बाबा महाराज आर्वीकर यांच्या 'दिव्यामृतधारा' या ग्रंथाच्या जातीचे आणि प्रतीचे भाष्यग्रंथ वाचल्यानंतर, संतांच्या अमृतानुभवाची अंतरंग-ओळख पटू लागते. एक वेगळी पहाट फुटते आणि या सारस्वताकडे जाण्याच्या वाटा दिसू लागतात; हा स्वानुभव येथे 'व.दिं.'नी मांडला आहे.

**'गुणा आला विटेवरी ।'** या संत तुकाराम महाराजांच्या अभंगाचे, पू.श्री.बाबा महाराजांचे निरूपण 'व.दिं.'ना शब्दार्थांतील अंतःसंवेदना प्रकट करणारे, स्वतःला आतून बाहेरून पुरते जागे करणारे ठरले व या अनुभवातून अभंगातला प्रत्येक शब्द त्यांना भेटण्यासाठी धावू लागल्याचे त्यांना कसे जाणवले ? त्याचे विवरण येते. मग हा 'विठ्ठल' कोण ? हा प्रश्न उलगडत उलगडत **'रामकृष्णहरी'** या जीवनप्रत्ययाच्या भागवत-धर्मापर्यंत येऊन ठेपल्याचे त्यांना उमजते.

सत्याला एका 'विठ्ठल' नामात संतांनी अवतीर्ण केल्याचे सांगत, 'व.दि.' पू.श्री.बाबामहाराजांनी उभ्या केलेल्या 'विठ्ठला'चा विचार मांडतात.



त्याच्या रूपसौंदर्याची दर्शने ही त्याच्या सगुण भक्तीची उत्स्फूर्त गीते आहेत. तो त्यांच्या अनुभवाचा उत्कट आविष्कार आहे. विठ्ठलतत्त्वाचे मोजमाप नाही. तो सर्वत्र आहे. अवघ्या गगनाचा गाभा असलेला हा विठ्ठल म्हणजेच 'व.दिं.'च्या मते समर्थ रामदास स्वामींचे 'निर्मळ ब्रह्म' आहे. हा 'गगनाचा गाभा' 'व.दि.' सर्वांना सांगू पाहतात. तो तुकाराम महाराजांना अनादी अनंत रूपात कोंदाटलेला कसा दिसू लागला ? या तुकाराम महाराजांच्या अनुभवाविषयी ते बोलतात. आणि 'विठ्ठल पाहता पाहता विठ्ठल होणे' म्हणजे स्वतःच ते केवलानंदमय परमतत्त्व होऊन राहणे होय, असे स्पष्ट करतात.

पंढरीचा विठोबा आणि रुक्मिणी ही आपल्या नित्य उपासनेतली दैवते असल्याचे सांगत 'व.दि.' म्हणतात की, ''आमचा हा विठ्ठल आमच्या तुकाराम महाराजांचा विठ्ठल आहे.'' आपल्या संतांनी त्यांच्या हृदयीचा विठ्ठल आमच्या हृदयात घातला आहे. तो सर्व देवांतला 'वडिलधारा देव' म्हणून त्यांना दिसतो. आपल्या विश्वसंसाराकडे तो शांतपणे, तटस्थपणे पाहात उभा ठाकलेला आणि परमशांत मुद्रेत दिसतो असे त्यांना वाटते. परब्रह्माचे असे निवांत शांत रूप 'व.दि.' विठ्ठलाकडे 'संतांच्या डोळ्यांनी' पाहत अनुभवतात. ती अनुभूती आहे, विठ्ठल-मार्गाचे रहस्य आहे.

'व.दि.' सांगतात की, ''त्यांचे वडील वारकरी व माळकरी नव्हते, तरीही 'भक्त-भागवत' होते. 'एकनाथी भागवता'तील श्रीकृष्णदर्शन त्यांना आवडत असे. विठ्ठल-रुक्मिणींच्या दर्शनात ते 'समग्र भागवत' अनुभवत असत.''

''विठ्ठल पाहायचा तो महान अतिथिदेवाच्या रूपात पाहायचा; संतांनी तो असा पाहिला, घरचा केला आणि विठ्ठलाची सेवा-भक्ती केली'', हे 'व.दि.' सांगतात आणि पुढे म्हणतात की, ''ज्ञानदेवांच्या 'हरिपाठा'त विठ्ठलाचे मूळ सापडेल; संतांच्या अमृतवाणीतून गगनावेऱ्ही गेलेला त्याचा वेलविस्तार आपले डोळे दिपवून टाकील.'' ज्ञानेश्वरांनी व पुढे नाथपंथीय भक्तियोग्यांनी विठ्ठल कसा पाहिला ? तेही 'व.दि.' सांगतात. 'पांडुरंग कांती' असलेला कानडा विठ्ठल आतून-बाहेरून एकसमयीच पाहायचा, अनुभवायचा आहे. हे सनातन ब्रह्म 'सगुण निर्गुण दोन्ही विलक्षण'असल्याचे ते वर्णन करतात. शिवकल्याण यांनी, आपल्या 'अमृतानुभवा'वरील 'नित्यानंदैकदीपिके'त घडविलेल्या विठ्ठलमूर्तीच्या

आध्यात्मिक दर्शनाविषयी बोलतानाच ते पंढरीचा विठ्ठल निर्गुणता न मोडता सगुण भक्तीचा आनंद देणारा कसा आहे ? हेही सांगताना दिसतात. भक्तीच्या विटेवर समपदी उभे असणारे हे परमब्रह्माचे निर्मल निवांत रूप, 'व.दिं.'ना भूलोकीच्या वैकुंठी अवतरलेले अभेद भक्तीचे विमल विश्रांतिदर्शन जाणवते.

**'ब्रह्मस्तनीं पान्हाइली बाई ये वो ।'** या अभंगातून सद्‌गुरु श्रीनिवृत्तिनाथांच्या कृपाप्रसादाने उफरंडून आलेले अंतःकरण, श्रीज्ञानेश्वर महाराज शब्दाशब्दांतून मोकळे करत असल्याचे 'व.दिं.'ना दिसते. ते म्हणतात की, ''ज्ञानेश्वर महाराज श्रीनिवृत्तिनाथांसंबंधी बोलू लागले की, त्यांच्या मौनाचे ओघ सहस्र वाटांनी वाहू लागतात. ज्ञानेश्वर महाराज श्रीनिवृत्तिनाथांना 'माउली' असे संबोधतात. निवृत्तिनाथ-ज्ञानेश्वरादी संतांना पंढरीचा विठ्ठल हा 'विठोमाउली' रूपात दिसतो.'' विवेचनाच्या ओघात ते पुढे सांगतात की, ''निवृत्तिमाउली ब्रह्मस्तनी पान्हाइली; दोन्ही पक्षी प्रेमरसाच्या धारा फुटल्या आणि तो प्रेमरस, ब्रह्मरस त्यांनी ज्ञानेश्वरांच्या मुखी घातला, ज्ञानेश्वरांना ब्रह्म दाखवले. येथे गुरूंचे देणे संपत नाही आणि घेणाऱ्याचे घेणे संपत नाही. देणारा-घेणारा तृप्तीच देतो-घेतो. ब्रह्मसाक्षात्कार ही एका क्षणाची, एका क्षणापुरती असणारी, टिकणारी अनुभूती नसून, ही अखंडानुभूती आहे.''

गुरु गहिनीनाथांच्या कृपाप्रसादाने निवृत्तितटाक अखंड तुडुंबलेला आहे व नाथपरंपरेची शक्ती लाभलेल्या निवृत्तिनाथांनी ज्ञानेश्वरांना निर्वाळले आहे; विमल, विशुद्ध, परिपूर्ण केले आहे; उपाधिरहित केले आहे. येथे 'व.दिं.'नी **'निवृत्ति निर्वाळला ज्ञानदेव'** म्हणजे काय ? ते समजावून सांगितले आहे. शिष्याच्या रूपाने गुरु स्वतःच्याच आत्मरूपाशी क्रीडा करतात आणि शिष्य गुरुरूपाने आपणांसच, आपल्या स्वरूपालाच, मूळ रूपालाच पाहू बघतो. श्रीगुरु केवळ 'अवघे ब्रह्म' दाखवतात असे नाही; तर शिष्यालाच ब्रह्मरूप करतात. ही क्रीडा 'व.दिं.'ना निवृत्तिमाउली-ज्ञानेश्वर यांच्यात जाणवते.

**'मी माझे मोहित, राहिले निवांत ।'** हा साक्षात्कारानंतरच्या सहजावस्थेतला आनंदोद्‌गार आहे. हे विवरताना 'व.दि.' म्हणतात की, ''या अभंगामध्ये श्रीज्ञानेश्वर महाराजांची 'ज्ञानेश्वरी', 'अमृतानुभव', 'अभंगगाथा', 'हरिपाठ' आणि 'चांगदेव पासष्टी' एकरूप, एकघन झाली आहेत.



मधुराभक्तीच्या भावोत्कट रूपात नाट्यांग लेऊन हा अभंग अवतरला आहे.'' या अभंगास 'व.दिं.'नी संतसारस्वताचा गाभा मानले आहे. 'आम्ही मुळात जसे होतो, तसे गुरूंनी आम्हांला ठेवले, आम्हांस राखले. आम्हांला आमचे मूळ रूप दाखवले.' हे गुरूंनी केल्याचे ज्ञानेश्वर सांगतात. गुरूंनी आम्हांला वेगळे नवे काही दिले नाही; तर आम्हांला मूळ रूपात आणून निरुपाधिक, ज्ञानमात्र, आनंदरूप केवलावस्थेत आणले. अशा रीतीने 'माझे मी' झालेले ज्ञानेश्वर या अभंगातून दिसतात.

ते स्वतःच्याच रूपावर मोहित होतात, म्हणजे नेमके काय होते ? त्याचेही विवरण पुढे येते. या मोहित होण्यात आपल्या मूळ आनंदरूपाचाच निवांत आस्वाद आहे; असे म्हणत, नंतर शिवशक्तींच्या नात्याचे स्वरूप उलगडलेले आहे आणि 'शिव-शक्तींची अभेद रूपातील आत्मरती' वाचकांसमोर मांडली आहे. येथे अद्वैत न मोडता होणारा द्वैत-लीलाव्यापार सुखाने कसा सुरू असतो ? ते सांगताना 'व.दि.' म्हणतात की, ''येथे द्वैत हे अद्वैताला विरोधी राहतच नाही. प्रत्येक वस्तू ही अद्वैताशी अभिन्न होत असलेलीच येथे दिसत असते. त्यामुळे जेवढा भेद तेवढाच अभेद येथे वाढत्या जाणिवेने प्रत्ययास येतो.''

साक्षात्कारानंतरची भक्ती ही सहजस्थिती असते. देव आणि भक्त एकमेकांत मिसळून गेल्याने, कोण कोणाची भक्ती करतो तेच कळेनासे होते. ही अनुभूती उलगडण्याचा येथे प्रयत्न आहे. हे सारे ज्ञानेश्वर महाराजांना 'हरिपाठा'तून सांगायचे आहे, असे 'व.दिं.'ना वाटते. ते पुढे म्हणतात की, ''जाणिवेचा दरवाजा उघडल्यावर देवदर्शनाचा प्रेमानंद कसा मनसोक्त आस्वादावा, हे 'हरिपाठ' सांगतो. जेथे 'अमृतानुभव' संपतो तेथे 'हरिपाठ' सुरू होतो.'' **'मी माझे मोहित'** हा अभंग 'व.दिं.'ना ज्ञानेश्वरांच्या चिद्‌विलासाचे व प्रेमाभक्तीचे सहजसुंदर काव्यरूप वाटते, तेच त्यांच्या विवेचनातून साधार प्रकटते.

**'नामदेव महाराजांच्या पायरीशी'** या लेखातून नामदेवांच्या अध्यात्म मार्गावरील चढत्या-वाढत्या अवस्थांची कल्पना 'व.दिं.'नी वाचकांना दिली आहे. नामदेवांना 'बालभक्त' म्हणून ओळखताना, त्यांच्या परिणतावस्थेतील भक्तीकडे पुरेसे लक्ष दिले जात नसल्याचे जाणवल्याने, 'व.दि.' हा आलेख मांडत

आहेत असे दिसते. नामदेवांच्या कीर्तनाचे रंग-रूप काय असावे ? याचाही अंदाज ते येथे घेताना दिसतात. देव आणि भक्त यांचा भावबंध-प्रेमबंध विठ्ठल आणि नामदेव यांच्यात अखंडपणे कसा पाहायला मिळतो ? याचे विवेचन करीत, 'व.दि.' भक्तराज नामदेवांचे दर्शन वाचकांना घडवतात. नामदेवांना अक्षर, अव्यक्त परब्रह्म रूपाविषयी सांगून झाल्यावर, ज्ञानदेवांनी त्यांना 'भक्तिमार्गा'चे स्वरूप आणि रहस्य उलगडण्याची विनंती केल्याचा उल्लेख करून, 'व.दिं.'नी स्पष्ट केले आहे की, ''नामदेवांच्या भक्तिभावनेला ज्ञानदेवांनी सन्मानिले होते. नामदेवांच्या 'नामवेदा'ला तो अधिकार आला होता.''

यानंतरच्या (ज्ञानदेवांच्या भेटीनंतरच्या) नामदेवांकडे 'व.दि.' 'नामवेदाचे उद्गाते', 'प्रवक्ते' म्हणून बघतात. विठ्ठलास क्षणभर देखील न सोडणारे नामदेव ज्ञानदेवांबरोबर (इ.स.१२९६) तीर्थयात्रेस गेले तेव्हाची परिस्थिती सांगताना 'व.दिं.'ना प्रश्न पडला आहे की, नंतर इ.स.१३१८ मध्ये नामदेव दुसऱ्या तीथयात्रेस गेलेच कसे ? पण याची उत्तरे मिळू शकली नसल्याचे स्पष्ट करून, ते या दोन यात्रांच्या मधल्या बावीस वर्षांतल्या नामदेवांकडे वळतात व थोडक्यात सांगतात की, **'नाचू कीर्तनाचे रंगी । ज्ञानदीप लावू जगी ॥'** हे ब्रीदवाक्य त्यांनी प्रत्यक्षात आचरणात आणले असावे. निर्गुण परब्रह्माची सगुण भक्तिरूपे गात, नामभक्तीचे पीक मराठमंडळात ते पिकवत असावेत.

नामदेवांचे परिणत भक्तरूप म्हणजे 'व.दिं.'च्या मते ज्ञानदेवांच्या ज्ञानयोगी रूपाचे स्वाभाविक, सहजसिद्ध असे दुसरे तुल्यबळ आणि आवश्यक भक्तिअंगच आहे; आणि ते अर्करूपाने 'गुरुग्रंथसाहेबा'तील 'मुखबानी'त कसे दिसते, ते त्यांनी विस्ताराने मांडले आहे. येथे नामदेवांचा विठ्ठल हा अणुरेणूहून थोकडा आणि आकाशाहून वाड झाल्याचे 'व.दिं.'ना जाणवले आहे. म्हणूनच ते म्हणतात की, ''सद्गुरु विसोबा खेचर यांनी निर्वाणीची जी खूण नामदेवांना गुरूपदेशाच्या वेळी सांगितली, ती फळास आली होती.''

संत नामदेवांच्या बालभावावस्थेविषयी व विठ्ठलबोधावस्थेविषयी थोडक्यात सांगत, यानंतर 'व.दि.' नामदेवांच्या वैष्णव-भावावस्थेकडे वळलेले आहेत. दुसऱ्या तीर्थयात्रेनंतरचे नामदेव, हे विठ्ठलाच्या पूर्ण बोधाच्या भावावस्थेत येतात. ते 'वैष्णव' होतात. येथे **'विष्णुमय जग'** ची प्रचिती आहे. याच वैष्णव



भावावस्थेत नामदेव अखेरपर्यंत विहरल्याचे सांगून, 'व.दिं.'नी त्यांच्या 'नामसंकीर्तना'विषयी लिहिले आहे. 'नामदेवांचा भर 'नामवेदा'च्या तात्त्विक विवरणावर नसणार'; असे म्हणून, 'त्यांच्या कीर्तनात प्रायः त्यांच्याच अभंगांवरील निरूपण येत असावे' असा अंदाज ते व्यक्त करतात. ते अभंग-वाङ्मयाचे कदाचित् जनक नसतील; पण प्रवर्तक आणि प्रसारक नक्कीच होते, असे 'व.दि.' आवर्जून सांगतात. नामदेवांचा 'ज्ञानदीप' हा 'भक्तिदीप' असल्याचे सांगता सांगता, वारकरी-कीर्तनाच्या या आदिरूपाविषयीही ते लिहितात.

नामदेवांच्या आख्यानपर कवितेविषयी विवेचन करताना, 'ते उत्स्फूर्त आत्मोद्गारी भावकवितेचे जनक' असल्याचे 'व.दि.' सांगतात. नामदेवांच्या भक्तिभावोत्कट व्यक्तिमत्त्वाचे प्रभावी रूप त्यांच्या कथनात्मक काव्यरचनेतही दिसते. ही आख्यानात्मक काव्यरचना सहज, सफाईदार, प्रभावी, लयबद्ध तसेच उस्फूर्त असल्याचे जाणवते. यात संवादाबरोबरच मनःसंघर्ष, तीव्र उत्कट भावनारस आणि अंती प्रौढ प्रगल्भ जीवनदर्शन आहे.

नामदेवांच्या **'तीर्थावळी'** आणि **'समाधि-प्रकरण'** या दोन काव्यप्रकरणांत मराठी भागवतधर्माची मूळपीठिका सामावली असल्याचे सांगून 'व.दि.' म्हणतात की, ''हे एक सहज सुंदर कथाकाव्य आहे. तसेच त्यांच्या रचना कीर्तनातील कथनास अधिक अनुकूल आहेत. यातून भक्तिमार्गाचा, प्रेमभक्तीचा प्रसार ते करत होते. 'नामभक्तीचे महिमान गाणे' हेच त्याचे रूप होते.'' 'व.दि.' म्हणतात की, **'कैवल्य चरण विठोबाचे'** ही नामदेवांची निर्वाणीची खूण होती.

लोकांशी बोलत राहत असणारी, कळवळ्याची उस्फूर्त गती लाभलेली नामदेवांच्या अभंगाची धाटणी आपल्याला त्यांच्या कीर्तनातील ग्रंथ-निरूपणाचा अंदाज तर देतेच, पण तेच रूप आपल्याला तत्कालीन महानुभाव गद्यलेखनात दिसून येत असल्याचा उल्लेखही, 'व.दि.' स्पष्टपणे करतात. हे सहज ओवीरूपातही वाचता यावे, इतके प्रभावी पद्याविष्कार प्रकटवू शकते; यामुळेच कीर्तनकार नामदेवांच्या रचनेत गद्य-पद्यांचे एकजीव प्रवाहरूप दिसते; असेही 'व.दि.' मांडतात.

नामदेवांच्या भक्तियोगास पू.श्री.बाबामहाराज आर्वीकर 'सहजयोग' असे म्हणतात, याचे विस्ताराने विवरण यानंतर 'व.दिं.'नी केलेले आहे आणि नंतर मूलतःच गेय अशा पदे, भूपाळ्या, आरत्या यांची रचना करणारे, आराधनागीतांची रचना करणारे नामदेव हे जातिवंत भावकवी, कथाकवी कसे आहेत हेही त्यांनी दाखवले आहे. नामदेवांच्या पायरीशी उभे राहिले असताना 'व.दिं.'च्या मनी विचार येतो की, ''बहुधा ज्ञानदेवांचे 'पसायदान' पूर्ण करण्याच्या इच्छेनेच नामदेवांनी नंतरच्या दीर्घकाळात काम केले असावे.''

**'एकनाथांची ओवी, भारुडे'** यातून, एकनाथांच्या कविप्रकृतीचा धर्म 'व.दि.' सांगत आहेत. त्यांच्या एकसुरी वाटणाऱ्या रचनांचे कार्य व प्रयोजन वाचकांपुढे ते ठेवत आहेत. आपल्या वैविध्यपूर्ण व वैचित्र्यपूर्ण रचनांतून, नाथांनी आध्यात्मिक तत्त्वज्ञान, पारमार्थिक अनुभव आणि स्वधर्माचरणाचे नीतिशास्त्र शास्त्री-पंडितांपासून ते थेट तळागाळातील माणसांपर्यंत सर्वतोपरी पोहोचविण्याचे कार्य केले. असे सांगतानाच 'व.दि.' पुढे म्हणतात, ''संतसारस्वताचे एक मंडळ येथे पूर्ण होते.''

वडिलांच्या 'एकनाथी भागवता'ची आठवण सांगत 'व.दि.' नाथांकडे वळले आहेत. सर्वश्रेष्ठ वैष्णवाची-भागवताची लक्षणे, मनोवस्था या दृष्टांतांच्या साह्याने एकनाथ महाराजांनी मांडल्या आहेत. माय-लेकरांच्या निखळ प्रेमाचे अप्रतिम दृष्टांत येथे येतात. संत एकनाथ एकेक विषय, संज्ञा, संकल्पना समजावून सांगताना, 'शुचिता' म्हणजे काय हे कसे सांगतात ? ते 'दर्शन' 'व.दिं.'नी वाचकांना घडवले आहे आणि ज्ञानेश्वर महाराजांनी आपल्या चित्रमय भाषेत हेच कसे सांगितले आहे, याचीही कल्पना त्यांनी आपल्याला दिली आहे. संत एकनाथ हे 'आदर्श शिक्षक' म्हणून कसे जाणवतात, हेही येथे येते. ते अर्थ-स्पष्टीकरणाच्या अंगाने जातात हेही कळते.

ज्ञानेश्वरांच्या जातिवंत प्रतिभेची प्रकृती पाहताना 'व.दि.' म्हणतात की, ''गीता-तत्त्वज्ञान आबालसुबोध करावयाचे आहे, तेव्हा ते नेहमीच काव्यात्म पातळीवर न राहाता दृष्टांत, अन्वय-व्यतिरेकी पद्धतीसह विस्तारत येते. तेथे परिच्छेदात्मक रचनासौंदर्यही येते; आणि मुख्य प्रतिपाद्य ध्रुपदासारखे येते. या तुलनेत, अर्थविवरणाच्या आदर्श भूमीवरून लोकशिक्षकाची संत एकनाथांची



भूमिका वाचकांच्या दृष्टीने अधिक चांगली आहे,'' असे 'व.दिं.'चे म्हणणे दिसते. ''तेथे स्वच्छ आकलन आहे आणि नंतर 'एकनाथी भागवता'तून 'ज्ञानेश्वरी'च्या अंतरंगात उतरण्याच्या सहजसुंदर वाटा लाभतात;'' असे 'व.दि.' सांगतात व आपल्यासाठी, वाचकांसाठी एकनाथांकडून ज्ञानेश्वरांकडे जाणे सोईचे, सुखाचे आणि फलदायी असल्याचे स्पष्ट करतात.

संत एकनाथ हे अधिकारी संतसज्जन, व्युत्पन्न पंडित, स्वतः स्वानंद-साम्राज्य उपभोगणारे होते. तेथे संसारी जनांना नेण्याचा त्यांना ध्यास होता. सामान्यांची जागृती हे त्यांचे जीवनकार्य होते. 'व.दि.' त्यांना भागवत-धर्माचे सर्वश्रेष्ठ मिशनरी मानतात. संत एकनाथ रोमँटिक प्रवृत्तीचे कवी नाहीत असे ते सांगतात आणि त्याचवेळी त्यांच्या प्रतिभेचा धर्म निरूपणकाराचा, उपदेशकाचा किंवा मनोबोध करणाऱ्याचा होता हेही स्पष्ट करतात. ''एकनाथ महाराजांच्या कवितेने जनसामान्यांच्या स्तरावरील शब्दकळा स्वीकारली. त्यातून आणि लोकसंकल्पना, लोकदेवता, लोकधर्माचार, लोकभाषा, लोकगानप्रकार यांच्या वैविध्यपूर्ण, विपुल रूपांतून त्यांनी भागवत-धर्माचे तत्त्वज्ञान उभे केले आणि भगवद्भक्तीचे उद्गान केले. भारुडे यासाठी जन्माला आली'', असे 'व.दि.' सांगतात आणि संत एकनाथांच्या अवलोकनाविषयी, त्यांच्या सर्वस्तरीय अभ्यासाविषयी बोलतात.

संत एकनाथ सतत सर्वांना देत राहिले. त्यांना श्रीदत्तात्रेयप्रभूंचे साक्षात् दर्शन झाल्याचे सांगून 'व.दि.' म्हणतात की, ''नाथांच्या अभंगगाथेत राम, कृष्ण, विठ्ठलासह सकल संत एकरूपात्मक झालेले आहेत. एकनाथ हे कर्ते धर्मपुरुष होते, असे सोदाहरण सांगत 'व.दि.' यानंतर त्यांच्या 'हिंदु-तुर्कसंवादा'विषयी लिहितात. ह्या संवादातून एकोणिसाव्या शतकातील हिंदू-ख्रिश्चन वाद-झगड्यांची सतत आठवण होते असे सांगता सांगता, असे लेखन आंग्लपूर्व मराठी वाङ्मयात अपवादात्मक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

नाथांच्या **'अर्जदस्त'** आणि **'कौलपत्रा'**विषयी लिहिताना 'व.दिं.'नी त्यांच्या लेखनाविषयी सांगितले आहे. त्यांच्या राज्यव्यवहार आणि गाव-गाडा यांच्या संदर्भात असणाऱ्या ज्ञानाविषयी लिहिले आहे व या माध्यमातून ते आपल्या अध्यात्म व पारमार्थिक ज्ञानभक्तीची निवेदन-व्यवस्था किती

कुशलतेने व सहजतेने करतात हे त्यांनी दाखवले आहे. अध्यात्म-निरूपणासाठी संत एकनाथ 'रूपक' हे निवेदन-माध्यम वापरतात. भारुडे ही सांग-रूपकांची नमुनेदार उदाहरणे असल्याचे सांगून 'व.दि.' स्पष्ट करतात की, ''भारुडे ही साहित्यिक रचना असून, तिचा आविष्कार व आस्वाद हा बराचसा मुक्त, मोकळा, लवचिक आणि प्रभावी आहे. हे नाट्यरूप-प्रयोगरूप आहे; हे रूपक-बंध आहेत.'' असे म्हणताना 'व.दि.' काव्यालंकार या अर्थाने आणि नाटकप्रकार या अर्थाने विचार करताना दिसतात.

''ज्याला त्याला, ज्याच्या त्याच्या स्तरानुसार भारुडे आणि आख्याने देणारे संत एकनाथ महाराज, हे आशयाच्या पुनरावृत्तीचा कंटाळा न करणारे पारमार्थिक क्षेत्रातले प्रचारक, शिक्षक आहेत;'' हेच 'व.दिं.'ना सांगायचे आहे. ''आपल्या आचरणातून व वाग्देवतेच्या आराधनेतून स्वतः अखंडपणे 'धर्म' जगणारे संत एकनाथ हे आपले, आपल्यातले, आपल्या घरातले, थोर असूनही जवळचे, असे वडिलधारे साक्षात्कारी आहेत''; हेच 'व.दि.' पुन्हा एकदा आवर्जून सांगतात.

यानंतर याच परंपरेतल्या पण स्वतंत्रपणे उभे ठाकलेल्या, आपलाच वाद आपल्याशी करणाऱ्या संत तुकाराम महाराजांच्या अभंगांकडे 'व.दि.' वळले आहेत. **'तुका झालासे विठ्ठल'** या पुस्तकात 'व.दिं.'नी विस्ताराने तुकाराम महाराजांविषयी लिहिले असले तरी, या पुस्तकात ते 'विठ्ठल होऊन गगनाचा गाभा' बनलेल्या तुकारामांच्या **'सत्य तूं, सत्य तूं, सत्य तूं विठ्ठला ।'** व **'आम्ही वैकुंठवासी'** या दोन अभंगांविषयी लिहिताना दिसतात.

'विठ्ठल' आणि 'जगदाकार' यांत अभेद आहे; ही आध्यात्मिक अनुभूती येण्याआधीच्या अवस्थेतील **'सत्य तूं'** हा संत तुकाराम महाराजांचा अभंग आहे. सगुण-साकार जगत् त्या निर्गुणाकार विठ्ठलत्वाच्या आड येते आहे, ही तुकाराम महाराजांची तक्रार येथे 'व.दिं.'ना दिसते आहे. 'लटका श्रम' तुकाराम महाराज कशास म्हणतात ? त्याचे विवेचन करून, संत तुकाराम अंगावर येणाऱ्या मायेमुळे भयभीत झाल्याचे ते येथे सांगतात. 'तुझी माया तूच सांभाळ' असे त्यांच्या मनात येते आहे आणि निके सत्य भेटत नसल्याचे त्यांना जाणवते आहे.

भगवान श्रीकृष्णांचे विश्वरूप दर्शन पाहून भ्यालेल्या अर्जुनात आणि



तुकाराम महाराजांच्या अवस्थेत असणारा फरक मग 'व.दिं.'नी सांगितला आहे. तुकारामांना विठ्ठलमूर्तीत 'ते विराटरूप' दिसलेले नाही. पण जे दिसते आहे ते खोटे व विठ्ठलच तेवढा सत्य; हे त्यांच्या मनाने घेतल्याचे 'व.दिं.'नी स्पष्ट केले आहे. तुकाराम महाराज स्वतःच विठ्ठलाला शोधीत आहेत. त्यांच्यासाठी काही न करता, विठ्ठल त्यांना 'माया'च दाखवतो आहे; येथे 'विठ्ठल आपल्याला उपेक्षितो आहे,' याचे संत तुकारामांना दुःख आहे असे 'व.दिं.'नी तुकाराम महाराजांच्या अन्य अभंगांच्या आधाराने अधिक स्पष्ट केले आहे. **'होतासी निष्ठुर, निर्विकार ।'** असे त्यामुळे या अभंगात येते.

येथे संत तुकारामांची भाववृत्ती 'व.दि.' वाचकांपर्यंत पोहोचवू पाहात आहेत. तुकाराम महाराज विठ्ठलाला जाब विचारत आहेत. त्यात राग आहे, चीड आहे, प्रसंगी अपशब्दांचा वापरही आहे. 'व.दि.' सांगतात की, ''शेवटी तुकाराम महाराज उपरोध-उपालंभातून बोलतात'' आणि हेही स्पष्ट करतात की, ''मनाने जगदाकाराबाहेर पडलेले, मायेपलीकडचे पाहाणारे संत तुकाराम, नाम-रूपात्मक पसाऱ्यांचा लटकेपणा पुरतेपणी जाणत आहेत. तरीही अनेक अभंगांतून ते विठ्ठलाला उपरोधाचा शाब्दिक आहेर देऊ शकतात, त्याचे 'चातुर्य' चव्हाट्यावर आणू शकतात. या उपरोधाची पूर्वतयारी हळूहळू परिपूर्णतेने करतात.''

'व.दि.' म्हणतात की, ''येथे विठ्ठल हे भक्तमनोद्भव रूप आहे. भक्तीला आणि सगुणोपासनेला अधिष्ठान म्हणून ते उद्भवलेले आहे. हे चैतन्याचे, परब्रह्माचे **'गुणां आला विटेवरी'** असे रूप आहे. संत ज्ञानदेव, संत नामदेव, संत एकनाथ यांना गुरु आहेत तसे तुकारामांना गुरु नाहीत. आपल्या भक्तीचा सूळ त्यांना आपल्याच खांद्यांवरून न्यायचा आहे;'' हे सांगताना 'व.दि.' म्हणतात की, ''विठ्ठल सत्य आहे हे तुकाराम महाराजांच्या मनाला पटते आहे आणि प्रत्यक्ष प्रत्ययाला तर येत नाही.'' ज्या पांडुरंगाशिवाय तुकारामांना दुसरी गतीच नाही, तो हा पांडुरंग 'निष्ठुर-निर्विकार'आहे, ही तुकाराम महाराजांची कुंठित भावस्थिती या अभंगात 'व.दि.' विवरताना दिसतात. अवघ्या जगदाकारात विठ्ठल ओतप्रोत भरून तर राहावाच, पण तो दिसावा पंढरीच्या मूर्तीत; ही तर तुकारामांच्या भक्त-जीवनाची आर्ती आहे. या अनुभूतीच्या आधीच्या मनोवस्थेतला, पण बराचसा जवळचा **'सत्य तूं,**

**सत्य तूं, सत्य तूं, विठ्ठला ।**' हा विठ्ठलाला जरा खोचून बोलणारा असा प्रगत साधकावस्थेतला अभंग आहे.

**'आम्ही वैकुंठवासी'** हा संत तुकारामांचा अभंग त्यांचे समग्र व्यक्तिमत्त्व उभे करणारा आहे; हे सांगताना 'व.दि.' म्हणतात की, ''सर्व संतांच्या जीवनाचे उद्दिष्ट आणि त्यांची अवतारकार्ये स्पष्ट रूपात मांडणारा, त्यांच्या केंद्रस्थानी शोभणारा असा हा अभंग आहे. जिकडे पाहावे तिकडे विठ्ठल कोंदाटून गेल्याचे अनुभवणारे संत तुकाराम पृथ्वीवरचे होते पण पृथ्वीवरचे राहिलेले नव्हते तर ते विठ्ठलस्वरूपच झालेले होते; वैकुंठवासी झाले होते. ते खरे तर मूळ वैकुंठाचेच रहिवासी; पण काही एका निमित्ताने ते पृथ्वीवर आले.''

यानंतर 'वैकुंठ' ही संकल्पना स्पष्ट करून, त्या विष्णुलोकाचे कायमचे रहिवासी असणारे तुकाराम महाराज भूलोकी का आले ? ते 'व.दि.' सांगताना दिसतात. येथे प्रारंभी, '' 'आम्ही' म्हणजे 'आम्ही विष्णुभक्त', धर्म जगून दाखवण्यासाठी वैकुंठ सोडून या भूतलावर आलो असे तुकाराम महाराज सांगतात. ऋषींचे म्हणणे शब्दांनी सांगणे कठीण; ते अनिर्वचनीय, अनाख्येय आहे; तेव्हा ते वागून दाखवण्यासाठी आपण आल्याचे ते स्पष्ट करतात. विद्वान शब्दच्छलाने सामान्यांच्या मनात गोंधळ निर्माण करतात. अर्थाचा शोध घेताना पुराणकथा आल्या, पण अर्थ कळणे मात्र अवघड झाले. याविषयी सांगताना तुकाराम महाराज 'विषयलोभी मनां'विषयीही बोलतात,'' असे 'व.दि.' मांडतात व संत ज्ञानेश्वरांनी भोगासक्त कर्मठांची वृत्ती कशी वर्णिली आहे, त्याची कल्पना ते वाचकांना देतात.

संत तुकाराम महाराज रोखठोक आहेत. वेदांचा अर्थ आम्हांसच माहिती आहे, इतरांनी **'वाहावा भार माथा ।।'** असे ते सांगतात. तुकाराम महाराज स्वतःच्या आचरणाने धर्म जगून दाखवणार; तर ते कोणत्या मार्गाने आणि कसे जाणार आहेत ? याविषयी यानंतर लिहिताना 'व.दिं.'नी 'भक्तिमार्ग' हा 'मुक्तिमार्ग' आहे हे विस्ताराने मांडले आहे. संतांचे मार्ग झाडत, उच्छिष्टाचा भाग सेवून आम्ही भक्तीचा डांगोरा पिटू; असे सांगत तुकाराम महाराज भक्तिमार्गाचा संदेश देतात. येथे 'व.दिं.'ना तुकाराम महाराजांचे सर्वांगसुंदर परिपूर्ण असे रूप दिसते. कवी आणि संत या दोन्ही रूपांत ते तुकाराम



महाराजांना अनुभवतात. ऋषिवचन आणि संतमार्ग यांचे एकत्रित सहअस्तित्व तुकाराम महाराजांच्या अभंगांतून व उद्गारांतून उस्फूर्तपणे प्रकटते. येथे विशुद्ध धर्माचार, साधनामार्ग त्यांना जाणवतो.

''हेच 'हरिपाठा'च्या पहिल्याच अभंगात व पुढेही आपल्यास ज्ञानेश्वर महाराज प्रतिज्ञेवर सांगतात,'' असे 'व.दिं.'नी प्रतिपादले आहे. हे वैकुंठवासी त्याचसाठी खाली उतरतात; असे स्पष्ट करताना त्यांनी, **'वाचा बोलों वेदनीती । करूं संतीं केले ते ।।'** हे मराठी संतांचे ब्रीदवाक्य असल्याचे सांगितले आहे.

संत ज्ञानदेव, संत नामदेव, संत एकनाथ वा संत तुकाराम यांच्याप्रमाणेच श्रीसमर्थ रामदास स्वामींच्या 'विमलब्रह्म'चा संस्कार 'व.दिं.'वर शाळेपासून असल्याचे **'मना सज्जना'** या त्यांच्या लेखातून जाणवते. वारकरी-रामदासी असा पंथभेद घरातही नसल्याने, त्यांच्या 'विठ्ठलभक्त' घरात समर्थ रामदासही तितकेच पूजनीय होते. किंबहुना 'सर्व पिंड-ब्रह्मांडात प्रभू रामचंद्र कोंदाटून राहिला आहे' असे अनुभवणारे रामदासस्वामी आणि 'जिकडे पाहो, तिकडे विठ्ठलच व्यापून उरला आहे' असे उद्गारणारे तुकाराम महाराज यांच्यात किंवा 'श्रीरामदास्य' आणि 'श्रीकृष्णदास्य' यांत काही वेगळेपण त्यांना कधी जाणवलेच नाही, हे वाचकांच्या लक्षात येते ते या लेखातून. **'येथे उभा का श्रीरामा ।'** असे म्हणणाऱ्या समर्थ रामदासांच्या गीतातून, परब्रह्माच्या एकमेवाद्वितीयत्वाच्या साक्षात्काराचा प्रसन्न उमाळा 'व.दिं.'ना जाणवतो.

ज्ञान आणि भक्तीने मानवाचा देव कसा होतो ? हा आपल्या 'दासबोध' या ग्रंथाचा विषय असल्याचे समर्थ रामदास स्वामी स्पष्ट शब्दांत, पुनरुक्ती पत्करून विस्ताराने कसे सांगतात ते वर्णन करून, 'आपण कोण ?' हे निश्चिततेने दाखवून देणे ही या ग्रंथाची फलश्रुती आहे, उद्दिष्ट आहे; याची कल्पना 'व.दि.' येथे देतात. हा भक्तिमार्ग विशद करणारा 'अध्यात्मग्रंथ' असल्याचेही ते स्पष्ट करतात. या ग्रंथातून समर्थांनी 'विमल ब्रह्म' आपल्या मनःचक्षूंपुढे उभे केल्याचे त्यांचे सांगणे आहे व शेवटी 'आपण म्हणजे विमलब्रह्म' हे उत्तरही त्यात सापडते. पण हे लेखन उत्स्फूर्त स्वानुभूतीचे कथन आहे; जीवननिरीक्षणाचे चित्रण आहे; असे 'व.दिं.'चे विवेचन आहे. माणूस हा व्यक्ती म्हणून, समाज म्हणून, समजून घेण्यात रामदासस्वामींना गोडी

आहे. ऐहिकता आणि पारमार्थिकता यांच्या सामान्यांच्या श्रेणी ते जाणतात आणि ज्याला जसा लागू पडेल तसा बोध करतात.

अत्यंत वास्तवपूर्ण, अनुभवनिष्ठ, प्रत्ययकारी असे बोधवाङ्मय लिहिणाऱ्या समर्थ रामदासांच्या लेखनात सांकेतिकतेचा अभाव आहे आणि सामान्य संसारी माणसाचे, वास्तवाचे जे भान आहे ते पाहता, 'व.दिं.'च्या मते समर्थ रामदास स्वामी हे जुन्यातील नवकवी आहेत. ते केवळ संतकवीही नाहीत तर संघटक, क्रियाशील महंत आहेत. म्हणूनच त्यांचे कवित्व वेगळे आहे; हे 'दासबोध', 'मनोबोध' वाचणाऱ्यांनी लक्षात घ्यावे, असे 'व.दिं.'ना वाटते. संत एकनाथ महाराजांनी केलेला प्रपंच-परमार्थ समन्वय आणि समर्थ रामदास स्वामींनी सामान्यांना, त्यांच्या ऐहिक कर्तृत्वाचा वा सामर्थ्याचा अधिक्षेप न करता केलेला बोध पाहता, या दोघांत समस्पंदने 'व.दिं.'ना आढळतात.

सामान्यांच्या संसाराचा विचार करणारे रामदासस्वामी, आदर्श राजा-राज्याविषयी, राजधर्माविषयी सांगत-बोलत. **'राज्य या रघुनाथांचे'** या आदर्श राज्याच्या कल्पनाचित्रातून आणि 'संभाजीला लिहिलेल्या पत्रात' यामधून ते याचा साक्षेपाने विचार मांडताना दिसतात. तसेच **'सर्व संसार बुडाला'** या स्फुटातून सामान्यांच्या संसारातील दैन्य, दारिद्र्य, दुःख तसेच अगतिकता यांचे नेमके शब्दचित्र उतरलेले दिसते.

उदंड पाहून उदंड लिहिणाऱ्या समर्थ रामदासस्वामींचे लेखन आणि काव्य आत्मपरतेचे नाही तर तेथे लोकपरता आहे. लोकांनी धडपणे जगावे आणि मग निधडेपणाने देवाच्या मार्गी लागावे; यासाठी झटलेले रामदासस्वामींचे जीवनकार्य आहे 'व.दिं.'ना वाटते. 'भगवंताचे अधिष्ठान' हेच प्राप्तव्य मानणारे व जनी वंद्य तसेच निंद्य काय आहे ? याचा विवेक अध्यात्माच्या प्रकाशात करून, लौकिकाला अंती आध्यात्मिक शांतिस्थान कसे लाभते ? ते समर्थ रामदास सांगतात. 'समग्र रामदास' हे त्यांच्या 'मनाच्या श्लोकांत' कसे पाहायला मिळतात ? याची सूत्रे मांडत, ते 'दासबोधा'चे साररूप असल्याचे स्पष्ट करत, 'व.दि.' अखेरीस म्हणतात की, ''त्यांनी (रामदासांनी) सामान्य जनांना सुखाच्या प्रपंचाचे रहस्य सांगितले व त्यातून परमार्थाचा मार्ग कसा जातो हे दाखवत, त्यांना 'विमळ ब्रह्म' हे अखेरचे प्राप्तव्य, गंतव्य असल्याचे सतत स्पष्ट केले.''



**'विश्व स्वधर्म सूर्ये पाहो'** या दीर्घ लेखातून 'व.दिं.'नी ज्ञानेश्वरांचा 'स्वधर्म'विचार विस्ताराने मांडला आहे. गीतेच्या तिसऱ्या अध्यायातील आठव्या श्लोकात येणाऱ्या 'नियतकर्मा'च्या भाष्यातून, ज्ञानेश्वरीत 'स्वधर्म-' विचारास प्रारंभ होतो. **'नियतं कुरु कर्म त्वं'**च्या भाष्याच्या कारणाने, संत ज्ञानेश्वर कर्मयोगाच्या पूर्ण सिद्धांताचे विवरण करून, त्यास अन्वय-व्यतिरेकाने निश्चितपणा आणताना दिसतात. त्यानंतर 'यथार्थ कर्मा'विषयीचे संत ज्ञानेश्वरांचे भाष्य सांगत 'व.दिं.'नी 'पसायदाना'तील स्वधर्म, सत्कर्म, कुकर्म, पाप, पुण्य या संकल्पना स्पष्ट केल्या आहेत.

गीतेच्या तिसऱ्या अध्यायातील नवव्या श्लोकातल्या **'यथार्थ कर्म'** या शब्दाला पर्याय म्हणून वापरलेला **'स्वधर्म'** हा शब्द, प्रथम पस्तिसाव्या श्लोकात येतो. या अध्यायास 'व.दि.' 'स्वधर्मयोग' असे म्हणतात. 'यज्ञ' आणि 'यज्ञचक्र' यांविषयी लो.टिळक यांनी 'गीतारहस्या'त केलेले विवेचन देत, 'व.दि.' ज्ञानेश्वर महाराजांच्या यज्ञविषयक भाष्याविषयी सांगतात. 'मूळ यज्ञाचे रूप 'सूक्ष्म' आहे व ते प्राण्यांना समजणे अशक्य झाले,' त्याचप्रमाणे 'इच्छा पूर्ण होण्यासाठी स्वधर्म-पालनाव्यतिरिक्त आणखी काही करावे लागत नाही' या दोन गोष्टी 'व.दिं.'ना या भाष्यात नव्याने जाणवल्यासारखे दिसते.

**देवान् भावयताऽनेन ते देवाः भावयन्तु वः।**
**परस्परं भावयन्तः श्रेयः परमवाप्स्यथ ॥ भ.गी.३.११ ॥**

या श्लोकातून स्वधर्म-पालनाचा हेतू व फल स्पष्ट करणाऱ्या श्लोकावरील टीकेत येणाऱ्या तपशिलाची सूत्रे मांडत 'व.दि.' सांगतात की, ''देवलोक आणि मानवलोक यांचे प्रेमैक्य केवळ स्वधर्माचरणाने आपैसे (अनायासे) घडून येते, यावर संत ज्ञानेश्वरांचा भर आहे.'' स्वधर्माचरण केल्याने व न केल्याने काय होते ? याचा थोडक्यात उल्लेख करत, 'व.दिं.'नी विहित यज्ञक्रियाविधीविषयीही सांगितले आहे.

''आपले सारे जीवन हे 'यज्ञोपकरण' म्हणजेच हवनद्रव्य आहे'' असे सांगून, यज्ञावशिष्ट अन्नाविषयी 'व.दि.' माहिती देतात व 'स्वधर्मरूप यज्ञ' हा आचरणास योग्य कसा आहे ? ते स्पष्ट करतात. ज्ञानेश्वरांचा कर्मविचार, नियतकर्माचा विचार म्हणजेच स्वधर्माचा विचार, सूत्ररूपाने यानंतर देत,

ज्ञानेश्वरीचा तिसरा अध्याय हा ‘स्वधर्म योग’ असल्याचे ‘व.दि.’ सांगतात. मनुष्याला मोक्षप्राप्ती करवून देणाऱ्या या स्वधर्माचे व्यक्तिगत आचरण आणि त्याची व्यक्तिगत मोक्षप्रदानक्षमता यांविषयी विस्ताराने विवरण केल्यावर, ते याच स्वधर्माचरणाच्या सामाजिक अखिल मानव जातीय प्रयोजनाकडे, ‘लोकसंग्रहा’कडे वळले आहेत.

या संकल्पनेत, लौकिक सिद्धीबरोबरच पारलौकिक सिद्धी, श्रेयःसिद्धी एकजीव झाली आहे असे सांगत ‘व.दि.’ पुढे म्हणतात की; ‘‘विविध दृष्टिकोनांतून विविध प्रकारे, विशेषतः अन्वय-व्यतिरेक पद्धतीने, व्यक्तिगत स्वधर्मतत्त्वाची लोकसंग्रह-तत्त्वातच परिणती होते. मग ज्ञानेश्वरांच्या मते, ज्ञानी पुरुषांना ‘प्राप्तव्य’ म्हणून काही उरत नाही; पण तरीही त्यांनी ‘स्वधर्म विशेषे आचरावा’ असे ज्ञानेश्वर का सांगतात ? यासंबंधी विचार मांडून, भगवंत स्वतःच स्वधर्मात कसे उतरतात याचे विवेचन ‘व.दिं.’नी केले आहे. भगवंतांच्या या स्व-भूमिका-प्रकटनावर ज्ञानेश्वरांनी केलेले भाष्य, ‘व.दिं.’ना ज्ञानेश्वरांच्या ‘भाष्य-काव्य-रूपा’चे एक उत्कृष्ट उदाहरण वाटते व त्याचा काव्यदृष्ट्या स्वतंत्र आस्वाद घ्यावासा वाटतो.

‘‘लोकांत लोकांप्रमाणे राहून, त्यांना अलौकिकत्वाच्या मार्गी लावणाऱ्या ‘समर्थ’आणि ‘सर्वज्ञ’ पुरुषांनी ‘विशेषे करून’ स्वधर्माचरण केले पाहिजे’’, असे ज्ञानेश्वर म्हणतात. कारण लोकांना सदाचरणाचे धडे देऊन, निष्काम कर्माचरणाकडे नेणे हे त्यांना ज्ञानी कर्मयोग्याचे काम वाटते. हा उत्तम ‘स्वधर्म’ त्यांना इहलोकी आणि परलोकी हितकारक वाटतो. यानंतर **‘युध्यस्व विगतज्वरः ।’** यावरचे या संदर्भातले भाष्य ‘व.दिं.’नी मांडले आहे व पुढे तिसऱ्या अध्यायातील ‘स्वधर्म आणि लोकसंग्रह’ सूत्ररूपात दर्शविला आहे.

स्वधर्म किंवा चातुर्वर्ण्याधिष्ठित धर्मव्यवस्थेचा कर्ता व अकर्ता स्वतः भगवंत असल्याचे (गीता ४.१३) स्पष्ट करून, गुण-कर्मातीत मुक्त पुरुष हा तत्त्वतः वर्णातीतच असतो, याविषयीचे ज्ञानेश्वरांचे विवेचन देऊन, चातुर्वर्ण्य व्यवस्था ही स्वभावजन्य गुणभेदाने झाल्याचे ‘व.दिं.’नी सांगितले आहे. ज्ञानेश्वरांच्या स्वधर्म कल्पनेचे रूप, गीतेच्या अठराव्या अध्यायातील पंचेचाळिसाव्या व शेहेचाळिसाव्या श्लोकांवरील टीकेत पाहावे असे म्हणत, ते ज्ञानेश्वरांना स्वधर्माचरण सहजगत्या होणे अपेक्षित असल्याचे स्पष्ट करतात.



ज्ञानेश्वरांच्या स्वधर्म-विचाराचे परिपक्व, अंतिम आविष्करण ‘व.दिं.’ना गीतेच्या अठराव्या अध्यायातील सत्तेचाळिसाव्या व अठ्ठेचाळिसाव्या श्लोकांवरच्या भाष्यातून स्पष्ट होते. त्यातील कालसापेक्ष कोंडा काढून त्यातील शाश्वत-निके रूप पाहावे, ते पुन्हा पुन्हा आस्वादावे असे ते सांगतात.

याच संदर्भात स्वामी शिवानंद यांनी केलेले **‘स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः । (भ.गी.१८.४५)’** व **‘श्रेयान्स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात् । (भ.गी.१८.४७)’** याचे इंग्रजी भाषांतर व टिप्पणी ‘व.दिं.’नी दिली आहे. ‘स्वधर्म’ म्हणजे ‘वर्णविहित धर्म’ असे म्हणताना, ज्ञानेश्वरांच्या स्वधर्मविचारावरच्या टीकेचाही परामर्श ‘व.दि.’ घेतात. याविषयी रामशास्त्र्यांनी थोरले माधवराव पेशवे यांना जे सांगितले, ते स्पष्ट करून ‘व.दि.’ म्हणतात की; ‘‘मूलतः, तत्त्वतः चातुर्वर्ण्यविचार हा कोणत्याही एका देशाचा, एका धर्माचा, विशिष्ट कालाचा असा विचार नाही. तो सार्वकालीन, सर्वदेशीय असा सनातन, निरंतर विचार आहे.’’ ‘समाजाची धारणा करणारा तो धर्म’, या ज्ञानेश्वरांच्या विचाराच्या समर्थनार्थ डॉ.स.ग.गाडगीळ यांनी वस्तुनिष्ठ, ऐतिहासिक समीक्षापद्धतीचा अवलंब करून, गीता आणि ज्ञानेश्वरीमधल्या ‘स्वधर्म आणि वर्णधर्म’ यांचा घेतलेला परामर्श ‘व.दि.’ येथे थोडक्यात देतात. त्याचबरोबर प्रा.गं.बा.सरदार यांनी मांडलेली ‘ज्ञानेश्वरांची धर्मकल्पना’ही ते वाचकांसमोर ठेवतात. प्रा.सरदार यांनी, ही संकल्पना साकल्याने व साक्षेपाने मांडली असल्याचे ते आवर्जून सांगतात.

ज्ञानेश्वरांच्या धर्मविचारात ‘स्व’ची ओळख व ‘स्व’ला विहित अशा कर्माचे प्रतिपादन याला मूलतः केंद्रवर्ती स्थान आहे. येथे संत ज्ञानेश्वरांनी स्वधर्मच्युतांवर केलेली टीका ही स्वधर्माविषयी अज्ञानी असणाऱ्यांवर, धर्माचे ढोंग करण्याच्या वृत्तीवर असल्याचे ‘व.दिं.’नी स्पष्ट केले आहे. या भक्तीच्या क्षेत्रात वर्णभेद नसल्याचेही ते सांगतात.

‘गीता-गौरव’ करताना, संत ज्ञानेश्वर गीताग्रंथ वेदांहून कसा उदार आहे ते सांगतात. ज्ञानेश्वर महाराजांचा हा स्वधर्म-विचार त्यांच्या ‘पसायदाना’त जाणवतो, कारण मुळात वैचारिक एकरूपता आहे. ‘पसायदाना’तली ‘स्वधर्म’कल्पना ही ‘व.दिं.’च्या मते शास्त्रप्रणीत व अवसरोचित कर्माचरणाची

आहे. ‘पसायदाना’चे धर्मरूप प्रत्येकाने पुन्हा पुन्हा पाहावे असे सांगून, आजच्या काळातल्या स्वधर्म-विचाराच्या महत्त्वासंबंधी येथे ‘व.दि.’ अखेरीस म्हणतात की; ‘‘स्वधर्म-विचार सुटला तर समाज फुटला, राष्ट्र रसातळाला गेले असे अनुभवास येईल. या स्वधर्म-विचार देणाऱ्या गीता-ज्ञानेश्वरीसारख्या ग्रंथांच्या वाचनाने, ‘व.दिं.’च्या मते पायाखालची जमीन तर शाबूत राहतेच; पण आकाशाची भेट घेण्याचे बळही अंगी येते.’’

यानंतर या ग्रंथाच्या अखेरीस, ‘व.दिं.’नी **‘धर्मचिंतन’** मांडले आहे. यात संसारी माणसांची सुखदुःखे आणि साक्षात्कारी संतांची आनंद-साम्राज्ये, यांचा विचार येतो. पुण्य-परोपकाराची कल्पनाही ते येथे मांडतात. धर्माच्या एकत्वाविषयी ते सांगतात आणि अखेरीस ‘पसायदानाच्या इत्यर्था’ने हा ग्रंथ पूर्ण करतात.

□□

# वारी : एक शोध; कीर्तन, सादरीकरण आणि विवेचन

सौ.अंजली जोशी

दिनांक १६, १७ व १८ ऑक्टोबर२००८ रोजी, ‘मुंबई विद्यापीठाचा मराठी विभाग’ आणि ‘श्रीपाद सेवा मंडळ’ यांच्या संयुक्त विद्यमाने, **‘संतसाहित्य परिशीलन व्याख्यानमाला’** हा कार्यक्रम मुंबई विद्यापीठाच्या कविवर्य कुसुमाग्रज मराठी भाषा व साहित्य भवनात यशस्वी रीतीने संपन्न झाला. त्यानंतर दिनांक १६, १७ व १८ फेब्रुवारी २००९ रोजी झालेला कार्यक्रम मात्र महाराष्ट्राचे सामाजिक व सांस्कृतिक वैभव समजल्या जाणाऱ्या ‘वारी’ संदर्भातील विविध पैलूंचे दर्शन घडविणारा असा थोड्याशा वेगळ्या विषयावर आयोजित करण्यात आला होता.

श्रीसंत तुकाराम महाराज चतुर्थ-जन्मशताब्दी निमित्त आयोजित करण्यात



आलेला हा कार्यक्रम, **‘मुंबई विद्यापीठ मराठी विभाग’**, **‘श्रीपाद सेवा मंडळ, पुणे’** आणि **‘डी.जी.रूपारेल महाविद्यालय, मुंबई’** या तिन्ही संस्थांच्या संयुक्त विद्यमाने डी.जी.रूपारेल महाविद्यालयाच्या प्रांगणात संपन्न झाला. या कार्यक्रमात ‘हरिकीर्तन’, ‘वारीचे प्रत्यक्ष सादरीकरण’ आणि ‘संतसाहित्य विवेचन’ अशा विविध अंगांनी वारीचा शोध घेण्याचा प्रयत्न करण्यात आला.

सदर कार्यक्रमाचे उद्घाटन, ‘श्रीपाद सेवा मंडळ’ संस्थेचे अध्यक्ष प.पू.श्री.शिरीषदादा कवडे ह्यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले. त्यावेळी मुंबई विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख डॉ.वसंत पाटणकर, डी.जी.रूपारेल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.प्रदीप कुलकर्णी, उपप्राचार्य श्री.तुषार देसाई व डी.जी.रूपारेल महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ.प्रदीप कर्णिक उपस्थित होते.

विद्यापीठाच्या मराठी विभागातील अधिव्याख्यात्या डॉ.अलका मटकर व डी.जी.रूपारेल महाविद्यालयाच्या प्रा.अनघा मांडवकर यांनी उत्तम रीतीने सूत्रसंचालन केले. प्रथमतः प्रा.डॉ.वसंत पाटणकर यांनी स्वागतपर भाषण केले. श्रीसंत तुकाराम महाराजांच्या मराठी साहित्य-परंपरेतील अद्वितीय स्थानाचा उल्लेख करून, त्यांनी वारकरी संप्रदाय व संत तुकारामांचे घनिष्ठ नाते कसे आहे, ह्याचा थोडक्यात उल्लेख केला. ‘‘वारकरी संप्रदायाने तुकारामांसारखा संतकवी निर्माण केला, तर तुकाराम महाराजांनी आपल्या उत्कट भक्तीने व अलौकिक काव्याने वारकरी संप्रदायाला वेगळी उंची प्राप्त करून दिली. तुकाराम गाथा ही वारकरी संप्रदायाच्या प्रस्थान-त्रयींपैकी एक ठरली. म्हणूनच त्यांच्या चतुर्थ-जन्मशताब्दी निमित्त हा कार्यक्रम आयोजित केला आहे;’’ असे सांगून, ‘‘ ‘वारी’ हे मराठी समाजातील एकात्मकतेचे व समरसतेचे प्रतीक आहे, म्हणून तिचा शोध घेण्याचा यामागील उद्देश आहे,’’ असे स्पष्ट करीत त्यांनी आपले भाषण संपवले.

डी.जी.रूपारेल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.प्रदीप कुलकर्णी यांनी इतका पवित्र कार्यक्रम ह्या महाविद्यालयाच्या पवित्र वास्तूत संपन्न होत असल्याबद्दल खूप समाधान वाटल्याचे मत व्यक्त केले. त्यानंतर ‘श्रीपाद सेवा मंडळा’चे अध्यक्ष प.पू.श्री.शिरीषदादा कवडे यांचे उद्घाटनाचे भाषण झाले. त्यात ते म्हणाले; ‘‘वारकरी संतांनी दुःखनाशाचे जे नाना मार्ग सांगितले आहेत, त्या मार्गांपैकी वारी हा सर्वांत समर्थ व सशक्त पर्याय आहे. वारीचे मोल अनन्यसाधारण आहे. श्रीसंत नामदेव महाराज सांगतात;

**सुखालागीं जरी करिसी तळमळ ।**

**तरी तूं पंढरीसी जाय एक वेळ ॥१॥**

**तेथें अवघाची सुखरूप होसी ।**

**जन्मोजन्मीचें श्रम विसरसी ॥ना.गा.४२०.२॥**

वारीची आनंदयात्रा, शोधयात्रा ही अशी सुखाचा आस्वाद करविणारी यात्रा आहे. दुःखामधून बाहेर काढणारी यात्रा आहे. वारीला येण्यासाठी कोणी कोणाला आमंत्रण देत नाही किंवा तेथे कोणी आयोजक-संयोजक नाहीत. तरीही लाखो सज्जन-भक्त आटापिटा करून तीत सामील होतात. त्या आनंदाचा मोकळ्या अंतःकरणाने भरभरून आस्वाद घेतला जातो. परमेश्वराची, सगुण भगवंतांची जवळीक साधली जाते. त्या आनंदाचा स्वाद नेमका कसा असतो ? हेच ह्या तीन दिवसांत आपण समजून घेणार आहोत. हे स्टेज चंद्रभागेचे वाळवंट होणार आहे; श्रोते ज्या हिरवळीवर बसलेले आहेत, ती पंढरपूरची वाट होणार आहे !'' असे सांगून, या कार्यक्रमाचे उद्घाटन झाल्याचे त्यांनी जाहीर केले.

प.पू.श्री.दादांच्या ह्या हृदय-अमृत संवादाने, सर्वांनाच कार्यक्रमाबद्दल तीव्र उत्कंठा वाटू लागली. वारीच्या ह्या शोधयात्रेचा प्रारंभ, ह.भ.प.श्री.मुकुंदकाका जाटदेवळेकर आणि त्यांचे सहकारी यांच्या हरिकीर्तनाने झाला. कीर्तनाला सुरुवात करतानाच, 'कीर्तन' ह्या प्रकाराचे संतसाहित्यात व वारकरी संप्रदायात जे असाधारण महत्त्व आहे, त्याचे जे अढळ स्थान आहे, ते अधोरेखित करीत ह.भ.प.श्री.मुकुंदकाका म्हणाले की, ''कीर्तनाची दोन मुख्य अंगे आहेत; संतसाहित्य व संगीत. संतसाहित्यात मानवी मूल्यांच्या ज्या शिकवणी आहेत, त्या कीर्तनाच्या माध्यमाद्वारे जनमानसावर ठसवल्या जातात. संगीतात स्वर, ताल व भाव ह्यांचा एकत्रित परिणाम साधून परमात्म्यास प्रकट करण्याची शक्ती आहे. ह्या दोन्हींच्या संगमातून जनमानसांत भगवद्भक्तीचे बीज रुजवण्याचे काम सहजसाध्य होते.''

आनुवंशिक दृष्टिमंदत्व असलेल्या श्री.जाटदेवळेकर महाराजांचे शालेय शिक्षण अपुरे राहिले असले तरी, कीर्तनाला अत्यावश्यक असलेले संगीताचे सूक्ष्म ज्ञान त्यांच्या ठायी दिसून येत होते. तसेच 'श्रीज्ञानेश्वरी', 'एकनाथी भागवत',



'तुकाराम गाथा' व 'दासबोध' यांसारख्या ग्रंथांचा असलेला त्यांचा कमालीचा व्यासंग कीर्तनादरम्यान अनुभवास येत होता.

'श्रीपाद सेवा मंडळ' ही संस्था, संतश्रेष्ठ श्रीज्ञानेश्वर महाराजांचे वाङ्मय समाजाच्या सर्व स्तरांमध्ये प्रसारित करण्याचे महत्त्वाचे कार्य करीत असल्याचा उल्लेख करून, ह.भ.प.श्री.मुकुंदकाका जाटदेवळेकर महाराजांनी माउलींचीच विरहिणी कीर्तनाला घेतल्याचे सांगितले. विरहिणीचे शब्द होते;

**तुजवीण येकली रे कृष्णा, न गमे राती ।**

**तंव तुंवा नवल केलें, वेणू घेऊनि हातीं ॥ज्ञा.गा.२६०.१॥**

ह्या विरहिणीचे त्यांनी जे विवेचन केले, त्याचा सारांश पुढीलप्रमाणे मांडता येईल. ''ह्या विरहिणीत एक गोपी भगवंतांच्या विरहाने तडफडत आहे. तिला त्यांच्याशी तद्रूप होण्याची तीव्र आस लागलेली आहे. माउली जे एक थोर तत्त्वज्ञानी आहेत, ते येथे सगुण विरहाचे वर्णन करीत आहेत. पण ही त्यांची ज्ञानोत्तर भक्ती आहे. गोपींची भक्ती सर्वश्रेष्ठ असल्याचे उद्धवांनीही मान्य केले, जे भगवंतांजवळ अखंड राहात असत. गोकुळातून परतताना त्यांनी भगवंतांकडे अशी मागणी केली होती की, 'मला गोकुळातील एखादे झुडुप किंवा रोप बनवावे; ज्यामुळे ह्या गोपींची चरणधूळ माझ्यावर पडू शकेल !' अशा गोपींची भक्ती सर्वश्रेष्ठ आहे हे जगाला कळावे; आणि व्यावहारिक दृष्ट्या ज्ञानी नसलेल्या भक्ताची देखील श्रद्धा असल्यास तो ह्या मधुरभावाच्या भक्तीच्या मार्गाने त्या अद्वैत तत्त्वज्ञानापर्यंत पोहोचू शकतो; असे सांगण्याचा माउलींचा उद्देश ह्या विरहिणीच्या रचनेमागे असावा'' असे प्रतिपादन श्री.मुकुंदमहाराजांनी केले.

असे गोपींसारखे कामनारहित प्रेम कसे करावे ? ह्या संदर्भात त्यांनी सांगितले की; ''सर्व अन्यांवरचे प्रेम काढून भगवंतांकडे लावावे. असे प्रेम करीत असताना त्यांनी जर काही मागायला सांगितले; तर व्याकूळ होऊन फक्त त्यांचे थोडे प्रेम मागावे ! गोपींसारखी भक्ती मनुष्यमात्रांच्या अंतःकरणात निर्माण व्हावी व जीवन सफल करून घ्यावे !'' हाच संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांचा संदेश ह.भ.प.श्री.जाटदेवळेकर महाराजांनी सर्वांपुढे ठेवला. तसेच वारी करताना चालण्यामुळे कायिक तप होते, वाणीने सतत भजन केल्याने वाणीचे तप (वाचिक) होत असते, तसेच घरदार विसरून मनाने

केवळ पंढरीरायाचे चिंतन, सतत त्यांचा ध्यास लागल्यामुळे मानसिक तप होते; हेही त्यांनी सुलभपणे समजावून सांगितले.

अशा तऱ्हेने, पहिल्या दिवशीच वारीच्या 'कीर्तन' ह्या मुख्य अंगाचे सादरीकरण, ह.भ.प.श्री.जाटदेवळेकर महाराजांसारख्या व्यासंगी कीर्तनकारांनी व त्यांच्या साथीदारांनी उत्तम रीतीने केले. त्याबद्दल त्या सर्वांचा व त्यांना पखवाजावर साथ करणारे श्री.तुकाराम सांगळे व श्री.मनोज भांडवलकर यांचा यथोचित गौरव होऊन प्रथम सत्र संपले.

दुसऱ्या दिवशीच्या सत्राचे प्रमुख पाहुणे असलेले ज्येष्ठ नाट्यकर्मी श्री.प्रभाकर पणशीकर यांचे स्वागत डॉ.श्री.वसंत पाटणकर यांनी केले. श्री.पणशीकर आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले की; ''ठाण्यात 'इंद्रधनु संस्थे'ने **'वारी - एक आनंदयात्रा'** हा कार्यक्रम ठेवला होता. त्यात वारीचे पहिल्या दिवसापासून ते शेवटपर्यंतचे सम्यक् दर्शन घडले. त्या कार्यक्रमाने मी फारच भारावून गेलो. असे कार्यक्रम पाहणे, त्यांना प्रोत्साहन देणे हे आपले सर्वांचेच कर्तव्य आहे. हा कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल या तिन्ही संस्थांचे अभिनंदन ! अशा कार्यक्रमांद्वारेच विविध वारकरी संतांनी; संत सेना न्हावी, संत नरहरी सोनार, संत तुकाराम, संत बहिणाबाई, संत जनाबाई यांनी आपल्याला जे अमोल देणे दिले आहे ते जपले जाते!''

**'वारी - एक आनंदयात्रा'** या कार्यक्रमाचे लेखन, दिग्दर्शन व त्यातील प्रमुख भूमिका देखील श्री.रोहन उपळेकर यांची आहे. त्यांनी व त्यांच्या पंधरा ते वीस वारकरी सहकाऱ्यांनी विविध भूमिका साकारून, वारीचे अस्सल चित्र उभे केले आहे. या कार्यक्रमात, श्री.रोहन आपल्या अमेरिकेहून परतलेल्या डॉक्टर मित्राला वारीत सामील करून घेतात व त्याला ते वारीच्या विविध अंगांची माहिती देत असताना कार्यक्रम आपल्यासमोर सहजपणे उलगडत जातो. संपूर्ण कार्यक्रमात दोन्ही मित्रांचा संवाद, प्रत्यक्ष सादरीकरण व महत्त्वाच्या प्रसंगांच्या व्हिडिओ क्लिप्स ह्यांच्या एकत्रित परिणामातून, वारीच्या आळंदीहून प्रस्थानापासून पुणे, सासवड, तरडगांव, फलटण अशी विविध मुक्कामस्थळे घेत घेत, एकादशीला थेट पंढरपूरच्या विठ्ठलाच्या प्रत्यक्ष दर्शनापर्यंत सर्व प्रसंग प्रेक्षकांसमोर वास्तव रूपात उभे केले गेले.



वारकऱ्यांचे प्रत्यक्ष भजन-कीर्तन, पाउल्या दाखवत असतानाच, निरनिराळ्या वारकरी कलाकारांनी 'भारुडे'; उदा. 'ज्योतिषी', 'वासुदेव' व 'पोतराज-कडकलक्ष्मी'; आदींची प्रात्यक्षिके करून दाखवली. सहज संवादातून कित्येक संज्ञांच्या संकल्पना स्पष्ट कळत होत्या. उदाहरणार्थ; 'पाउल्या' म्हणजे पावलांवर खेळायचे भजन, 'प्रस्थान' म्हणजे प्रत्येक गावी देवांना प्रार्थना करून प्रवास सुरू करणे, 'उभे रिंगण' म्हणजे घोडा निघतो व माउलींपर्यंत जाऊन परत आपल्या जागी येऊन उभा राहतो, 'समाज आरती' म्हणजे एरवी चालताना अजिबात भांडण-वाद न करता दिंडीतील वारकऱ्यांनी ठरावीक वेळी आपली तक्रार मांडण्यासाठी केलेली सोयीची पद्धत.

**वारीतील दिनक्रम :** सकाळी काकड आरती; यात 'अंधळा', 'पांगळा', 'वासुदेव', 'जोगी' असे अभंग, श्री.हैबतबाबांनी ठरवून दिलेले गावाप्रमाणे अभंग, रात्री समाज-आरती, कीर्तन, जागर (शेजारती मात्र होत नाही.) इत्यादी कार्यक्रम होतात. सगळ्यात शेवटी पंढरपुरी 'ब्रह्मनाद' होतो; ज्यात सगळे पखवाजवाले पालखीभोवती उभे राहून एकाच वेळी पखवाज वाजवतात. शेवटी पंढरपूरची व्हिडिओ क्लिप दाखवली गेली; जीमध्ये प्रत्यक्ष श्रीपांडुरंग भगवंतांना अभिषेक चालू होता व त्याच वेळी श्री.राहुल कुलकर्णींच्या भावमधुर आवाजातील श्रीसंत चोखामेळा महाराजांचा, **'पंढरीचे सुख नाही त्रिभुवनी ।'** हा अभंग ऐकून तर सर्व श्रोते कमालीचे भारावून गेले.

रूपारेल महाविद्यालयाच्या हिरवळीवर स्थूल देहाने असूनही, मनाने सर्वजण थेट पंढरपुराला चंद्रभागेच्या वाळवंटात जाऊन पोहोचले होते. काळ तेथेच थांबावा, कार्यक्रम संपूच नये असे वाटत होते. मला वाटते, सर्वजण भारावून पुढील वारीत सामील होण्याचा निश्चय करीत होते. कारण प.पू.श्री.दादांनी सांगितल्याप्रमाणे, वारीत सामील होण्यासाठी कोणालाच निमंत्रणाची गरज नसते.

एकंदरीत ह्या कार्यक्रमातील भारुडे पाहत असताना, हे प्रकर्षाने जाणवले की, वारकरी हे अभंग प्रत्यक्ष जगत असतात. ह्या संतसाहित्यातून जे समाजप्रबोधन सहज घडत असते, त्याचे महत्त्व ह्या कार्यक्रमामुळे चांगलेच

पटले. श्री.रोहन उपळेकर व इतर वारकरी सहकलाकारांचा यथोचित सत्कार होऊन, त्यांचे उदंड कौतुक करीत दुसऱ्या दिवशीच्या सत्राची सांगता झाली.

**'वारी : एक शोधयात्रा'**च्या तिसऱ्या दिवशी, तत्त्वज्ञानाचे गाढे अभ्यासक, एम.ए.ला सुवर्णपदक व मानाचा डॉ.राधाकृष्णन् पुरस्कार पटकावणारे प्रा.डॉ.शंकर रामचंद्र तळघट्टी सर ह्यांचे **'वारकरी वाङ्मय : एक आढावा'** या विषयावर अत्यंत अभ्यासपूर्ण व्याख्यान झाले. त्यांचे स्वागत श्रीपाद सेवा मंडळाचे ज्येष्ठ साधक श्री.श्रीकांत जोशी ह्यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन करण्यात आले. श्री.तळघट्टी सरांनी आपण वारकरी संतसाहित्याचा तात्त्विक आढावा घ्यायचा प्रयत्न करीत असल्याचे सांगून, प्रथमच 'वारी म्हणजे काय ?' ही संकल्पना स्पष्ट केली. ते म्हणाले; ''वारी म्हणजे एखादी वरच्यावर करीत असलेली गोष्ट ! आध्यात्मिक दृष्टिकोनातून व्याख्या पाहिली तर, जन्ममरणांची वारी चुकविण्यासाठी जी यात्रा केली जाते, ती वारी !

आता ही वारी खरे तर एकवेळच करायची असते व तेही परमेश्वराच्या धामामध्ये (पंढरी) जाऊन राहत नाही तोपर्यंत ! पण आपल्याला ते साधणे शक्य होत नाही. तेवढा आपला अधिकार नसल्यामुळे, आपल्याला त्यासाठी साधना, उपासना करावी लागते. ह्या वारीचे गंतव्य कोणते ? तर पंढरी ! अभंगाप्रमाणे **'काया ही पंढरी'** म्हटले तर देह नाशिवंत आहे. पण माउलींनी आपल्या एका अभंगात त्याचे वर्णन **'अव्यंग निजधाम'** असे केलेले आहे. तेथे गेल्यावर परतायचे नसते. माउलींची तर ही सहजस्थिती आहे. एक वेळ ही वारी केल्यावर साधक सुखरूप होतो; असे संतांनी आपल्या अभंगात म्हटलेच आहे !''

डॉ.श्री.तळघट्टी सरांनी वारकरी संप्रदायाचे, संतसाहित्याचे तत्त्वज्ञान उपस्थित श्रोत्यांच्या मनी सोपे करून ठसवत असे प्रतिपादन केले की, ''वारकरी संतांनी जरी निर्गुणाची उपासना व अद्वैती भक्ती हा अंतिम मार्ग सांगितला असला तरी, सर्वसामान्यांना जमेल अशा सगुण भक्तीचा आधारमार्गही आचरता येईल;'' असा दिलासाही आपल्या साहित्यातून दिला आहे. सद्गुरुकृपेने अहंकाराचा लोप झाल्याशिवाय खरे ज्ञान, खरी भक्ती प्राप्त होत नाही. ह्याविषयीचे झणझणीत अंजन संतांनी आपल्या डोळ्यांत घातल्याचे सरांनी निदर्शनास आणून दिले. किंबहुना ह्याच ज्ञानप्राप्तीचे धडधडीत उदाहरण म्हणजे प्रत्यक्ष श्रीज्ञानेश्वर माउली; जे आपल्या समग्र वाङ्मयात सर्व काही



करून अकर्त्याची भूमिका घेऊन, सगळ्याचे श्रेय आपल्या सद्गुरूंना देतात. म्हणूनच हे सर्व संत मुक्त होते,'' हेही सरांनी अचूकपणे सर्वांच्या लक्षात आणून दिले. 'मायावाद', 'चिद्विलासवाद', 'ज्ञान', 'भय', 'अज्ञान', 'पूर्णाद्वैतवाद' अशा अनेक तात्त्विक संज्ञा त्यांनी सुस्पष्ट करून दाखवल्या.

''वारकरी वाङ्मय, त्याचा आवाका, त्यामधील विषय, संतांची शैली, संतांची भूमिका ह्याच्या पलीकडे जाऊन, एका अक्षर-तत्त्वाची प्राप्ती करून देणारे हे सारे वाङ्मय असल्यामुळेच हे 'अक्षर वाङ्मय' ठरते. हा त्यांच्या व्याख्यानाचा मथितार्थ होय;'' अशा शब्दांत रूपारेल महाविद्यालयाच्या प्रा.अनघा मांडवकर ह्यांनी, डॉ.श्री.तळघट्टी सरांचा गौरव करीत त्यांचे आभार मानले.

त्यानंतर समारोपाच्या कार्यक्रमास सुरुवात झाली. त्यावेळी व्यासपीठावर मुंबई विद्यापीठाचे प्रकुलगुरु डॉ.अरुण सावंत, प.पू.श्री.शिरीषदादा, डॉ.वसंत पाटणकर, डॉ.प्रदीप कुलकर्णी व डॉ.प्रदीप कर्णिक उपस्थित होते. डॉ.अरुण सावंत यांनी आपल्या भाषणात सांगितले की; ''पंढरपूरच्या वारीत लाखो भाविक सामील होतात. त्या वारीत कीर्तन, प्रवचन इत्यादी कार्यक्रम होत असतात. 'श्रीपाद सेवा मंडळ' अशा सांस्कृतिक विषयांत विशेष रुची दाखवते, ही अतिशय आनंदाची गोष्ट आहे. सध्या मराठी संस्कृतीचे, साहित्याचे विडंबन होत असल्याचे आपण पाहतो. पण वारकरी संप्रदायात मात्र तसे होणार नाही. वारीचा हा वारसा जगाला प्रेरणादायी ठरतो आहे. त्यामुळे वारीचे संवर्धन व विकास आमच्या विद्यापीठाद्वारे व्हावा. खऱ्या अर्थाने विद्यापीठाच्या प्लॅटफॉर्मवर सर्टिफिकेट कोर्सेसच्या रूपात असे कार्यक्रम व्हावेत. त्यासाठी विद्यापीठाचे सर्वतोपरी सहकार्य मिळेल. विद्यापीठाच्या अभ्यासक्रमांमधून याविषयी काही करण्याकरिता, 'श्रीपाद सेवा मंडळा'ने आम्हांला साह्य करावे. विद्यापीठाचा पूर्ण पाठिंबा, प्रोत्साहन अशा कार्यक्रमांना लाभेल !''

असे भरघोस आश्वासन प्रकुलगुरूंनी दिल्यानंतर, 'श्रीपाद सेवा मंडळा'चे अध्यक्ष प.पू.श्री.शिरीषदादा कवडे यांचे समारोपाचे भाषण सुरू झाले. ते म्हणाले; ''वारीला जसे एक बहिरंग आहे, तसे एक अंतरंग देखील आहे. पहिल्या दोन दिवसांत आपण वारीच्या बहिरंगाचा धांडोळा घेतला व आज श्री.तळघट्टी सरांनी वारीच्या अंतरंगाचे अतिशय मार्मिक विवेचन केले. श्रीसंत

तुकाराम महाराजांचा एक अप्रसिद्ध अभंग आहे. बहुसंख्य वारकरी मंडळी तो 'योगपर' असल्याने प्रक्षिप्त मानतात.

**श्वासोश्वासीं निमिषोनिमिषीं । वारी केली पंढरीसी ॥ १ ॥**
**प्रत्यक्वृत्ति येरझारी । तुझ्या दर्शना आलो हरी ॥ २ ॥**
**प्रेम अंगी स्वेद कंप । तेचि घेऊनि पताक ॥ ३ ॥**
**गेलों राउळाभीतरीं । सहस्रदळाचे माझारीं ॥ ४ ॥**
**संतीं दाविला मारग । अखंडित राजयोग ॥ ५ ॥**
**रंगशिळें उभा ठेलों । तुका म्हणे धन्य झालों ॥ स.तु.गा.८३८१.६ ॥**

वारीचा अंतरंग अर्थ सांगायचा तर, वारी म्हणजे आवर्तन ! या अभंगात तुकाराम महाराजांनी वारीचे अंतरंग मांडलेले आहे. प्रत्यक् वृत्ती म्हणजे परमात्म्याकडे घेऊन जाणारी वृत्ती, परमात्म्याकडे उठणारी वृत्ती ! अशा वृत्तीच्या येरझारीलाच महाराजांनी 'वारी' म्हटले आहे. श्वासोच्छ्वासाच्या आवर्तनाच्या माध्यमातून श्रीमहाराज ही वारी सांगत आहेत. काही सांप्रदायिकांनी म्हणूनच तो अभंग प्रक्षिप्त ठरवलेला आहे. पुढील चरणांत श्रीमहाराजांनी वारीची लक्षणे सांगितली आहेत. अंतःकरणातील प्रेम, भेटीची अनिवार ओढ, अंगाला सुटलेला कंप, अश्रू, अंतःकरणात दाटलेला सात्त्विक भाव ह्यांना 'पताक' म्हटले आहे. ही पताका घेऊन सूक्ष्म-कायारूपी असलेल्या पंढरीतील राउळात म्हणजेच सहस्रदळ कमळाशी आलो; असे ते म्हणतात. तेथेच श्रीविठ्ठलांची भेट होते. आतमध्ये ही जी भेट होणे आहे, तिलाच 'अंतरंग वारीची सांगता' असे म्हणतात. ह्या एकूण कार्यक्रमात, वारीच्या दोन्ही अंगांचा आढावा घ्यायचा होता. अशा वारीपासून आपण मात्र उगाचच वंचित राहतो, कारण आपल्या मनात एक भ्रम असतो.

एक स्वतःला शहाणा समजणारा पोपट बेफाम उडत होता. तो एका ट्रकच्या काचेवर आदळला व बेशुद्ध पडला. ट्रक ड्रायव्हरने दया येऊन त्याला उचलून औषधोपचार केले व घरी आणून पिंजऱ्यात ठेवले. थोड्या वेळाने पोपट शुद्धीवर आला व स्वतःला पिंजऱ्यात पाहून म्हणाला; ''अरेच्चा ! मी तुरुंगात ? तो ट्रक ड्रायव्हर मेला वाटतं ?'' ह्यालाच भ्रम असे म्हणतात. त्या पोपटासारख्याच एका भ्रमाच्या भूमिकेमध्ये आपण सदैव मुरलेले असतो. त्यातून बाहेर पडण्यासाठीच 'वारीचा शोध' घ्यायचा असतो.



असा वारीचा शोध जर आम्हांला लागला, तर ती वारी निरंतर आनंदाची, सुखाची अनुभूती देणारी ठरते. निखळ सुखाची उराउरी भेट घडवणारी, अशी ती वारी ठरते. अशा वारीची किमान ओढ तरी लागावी; ह्यासाठीच या तीन दिवसांच्या कार्यक्रमांचे आयोजन होते !''

प.पू.श्री.दादांच्या ह्या अर्थगर्भित, आशयघन ज्ञानसंवादाचे अतिशय चपखल वर्णन प्रा.अनघा मांडवकर यांनी त्यांचे आभार मानताना केले;

**''तैसे साच आणि मवाळ । मितले आणि रसाळ ।**
**शब्द जैसे कल्लोळ । अमृताचे ॥ज्ञाने.१३.७.२७०॥''**

खरोखरच प.पू.श्री.दादांनी वारीचा सांगितलेला अर्थ, ती साधण्याचा मार्ग, त्या मार्गाच्या आड येणारा आपला भ्रम, अहंकार आदींचे विवेचन ऐकून मती गुंग झाली. विशेषतः अंतरंग-वारीचे उत्तुंग परंतु अवघड ध्येय आपल्याला नामस्मरण व सद्गुरुप्रदत्त साधनेच्या आधाराने गाठायचा प्रयत्न करायचा आहे, अशी खूणगाठ मनात बांधली गेली.

डी.जी.रूपारेल महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ.प्रदीप कर्णिक यांनी, आभार-प्रदर्शन करताना प्रारंभी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.विजय खोले व प्रकुलगुरु डॉ.अरुण सावंत यांचे आभार मानले. कारण त्यांच्या निर्णयामुळे या महाविद्यालयाची वास्तू आजच्या पवित्र कार्यक्रमाने आणखीच पावन झाली. महाविद्यालयाचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आपला घरचा कार्यक्रम असल्यासारखे राबत होते. त्यांचेही त्यांनी आभार मानले. दुसऱ्या दिवशीच्या **'वारी : एक आनंदयात्रा'** ह्या कार्यक्रमाच्या वेळेस तर श्रोत्यांचा इतका उदंड प्रतिसाद मिळाला की, दोनशे खुर्च्या बसण्यासाठी वाढवाव्या लागल्या. ''ही उत्स्फूर्त दाद पाहून, प.पू.सद्गुरु श्री.मामासाहेब देशपांडे ह्यांचे घरोघरी श्रीज्ञानेश्वरी पोहोचवण्याचे स्वप्न पूर्ण होण्याची निश्चितच खात्री वाटायला लागते,'' असे ते म्हणाले. सर्वांत शेवटी; परंतु सर्वांत महत्त्वाची कृतज्ञता; त्यांनी प.पू.श्री.शिरीषदादांविषयी व्यक्त केली. कारण त्यांच्या कृपेनेच सर्व कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न झाला.

समारोपाची हुरहूर सर्वांनाच लागली होती. कार्यक्रमाची सांगता

हरिपाठाच्या कार्यक्रमाने झाली. 'श्रीपाद सेवा मंडळा'च्या कार्यकर्त्यांनी अत्यंत सुरेख व मने हरिनामात गुंगवून टाकणारा श्रीहरिपाठ सादर केला.

माउलींचा हरिपाठ सर्वांत श्रेष्ठ आहे. माउलींच्या सर्व तत्त्वज्ञानाचे सार, उपासनामार्गाची किल्लीच त्यातून प्रकट झालेली दिसते. म्हणूनच तो वारकऱ्यांची 'संध्या' होऊन बसला आहे. 'हरिपाठ' म्हटल्याशिवाय वारकरी तोंडात अन्न घेत नाहीत किंवा तसा प्रसंग आलाच तर तो अन्न घेईल परंतु हरिपाठ केल्याशिवाय झोपणार नाही. तर अशा हरिपाठाचे सुस्वरात व टाळ-मृदंगांच्या साथीसह गायन ऐकताना सर्व श्रोते निश्चितच सुखावले. हरिपाठामध्ये ब्रह्मानंद-लीनता अनुभवल्यानंतर कु.मधुरा कुंभार ह्या रूपारेल महाविद्यालयाच्या विद्यार्थिनीने अतिशय ताकदीने 'पसायदान' सादर केले. त्यानंतर ह्या सर्वांगसुंदर कार्यक्रमाची सांगता झाली.

□□

# श्रीसंत ज्ञानदेवांची परम-भक्ती : स्वरूप आणि व्याप्ती

डॉ.ब.ना.तुरंबेकर

**ज्ञानी इयेतें स्वसंविति । शैव म्हणती शक्ति ।**
**आम्ही परम भक्ती । आपुली म्हणों ॥ज्ञाने.१८.५५.११३३॥**

मध्ययुगीन भारतात जे अनेक भक्तिसंप्रदाय जन्माला आले, त्यांमध्ये महाराष्ट्रातील 'वारकरी संप्रदाय' हा एक महत्त्वाचा संप्रदाय मानला जातो. या संप्रदायाचे मुख्य प्रवर्तक श्रीसंत ज्ञानदेव हे होते. मध्ययुगीन भारतातील हे भक्तिसंप्रदाय म्हणजे तत्कालीन धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक चळवळीच होत्या. महाराष्ट्राच्या मध्ययुगीन धर्मजीवनात, लोकाभिमुख धर्म-संप्रदायाची स्थापना प्रथम नाथसंप्रदायाने केली. नाथपरंपरेचा गुरुपरंपरेने वारसा घेतलेल्या संत ज्ञानदेवांनीही आपल्या साहित्याद्वारे ही परंपरा पुढे चालू ठेवली. संत



ज्ञानदेव जरी नाथपंथी असले तरी, त्यांनी जाणीवपूर्वक भक्तिमार्गाचा पुरस्कार केला. त्यांची भक्ती भोळी-भाबडी नाही. ती जाणीवपूर्वक स्वीकारलेली एक जीवननिष्ठा आहे. म्हणून त्यांच्या तत्त्वज्ञानात ज्ञानयोग, कर्मयोग, ध्यानयोग, भक्तियोग यांमध्ये विरोध जाणवत नाही. ज्ञानदेवांचा भक्त हा 'ज्ञानी भक्त' आहे. तो निष्काम कर्माचे आचरण करणारा 'कर्मयोगी' आहे. भगवंतांशी सतत अनुसंधान ठेवणारा 'ध्यानयोगी' आहे. म्हणून अशा भक्तीला ज्ञानदेव 'परम-भक्ती' म्हणतात आणि अशा भक्ताला 'परम-भक्त' म्हणतात. 'अनन्य भक्ती', 'सहज भक्ती', 'सहजप्रकाश' असे शब्दप्रयोगही ज्ञानदेवांनी या संदर्भात केलेले आहेत.

ही परम-भक्तीच ज्ञानदेवांना अधिक प्रिय आहे. त्यामुळे अशा परम भक्तीचे वर्णन ज्ञानेश्वरीत सातत्याने येत राहते. हे वर्णन करताना, ज्ञानदेवांच्या भाववृत्ती प्रफुल्लित होतात. हे वर्णन उत्तरोत्तर वाढत जाते. अठराव्या अध्यायात या परम-भक्तीचे स्वरूप अधिकच खुलून दिसते. अशा परम-भक्तीचे वर्णन आणि ही परम-भक्ती ज्याला प्राप्त झाली आहे अशा परम-भक्ताचे वर्णन हा ज्ञानेश्वरीचा खास विशेष आहे. संपूर्ण ज्ञानदेव-वाङ्मयाचाही तो खास विशेष आहे. या परम-भक्तीत ज्ञान, प्रेम आणि शक्ती यांचा त्रिवेणी संगम आहे. त्याचे थोडक्यात स्वरूप येथे पाहावयाचे आहे.

ज्ञानेश्वरीच्या अठराव्या अध्यायातील श्लोक क्रमांक चौपन्न ते सहासष्ट वरील भाष्यात, ज्ञानदेव या परम-भक्तीचे स्वरूप अधिक उच्च पातळीवरून आविष्कृत करताना दिसतात. ही परम-भक्ती ब्रह्मभूत, प्रसन्नचित्त, दुःखरहित, इच्छारहित व सर्व प्राणिमात्रांबद्दल समदृष्टी असणाऱ्या पुरुषाला प्राप्त होते, असे भगवद्गीता सांगते.

**ब्रह्मभूतः प्रसन्नात्मा न शोचति न काङ्क्षति ।**
**समः सर्वेषु भूतेषु मद्भक्तिं लभते पराम् ॥भ.गी.१८.५४॥**

या परम-भक्तीलाच माउली 'चौथी भक्ती' असे म्हणतात. ही पराभक्ती म्हणजेच आत्मानुभूती अथवा आत्मसाक्षात्कार होय, हे या श्लोकावरील ज्ञानदेवांचे भाष्य पाहिल्यानंतर लक्षात येते. एखाद्या गोष्टीबद्दल शोक करणे अथवा एखाद्या गोष्टीची इच्छा करणे या दोन्हीही वृत्ती अशा परम-भक्ताच्या

ठिकाणी नसतात. कारण त्याच्या ठिकाणी साम्यवृत्ती निर्माण झालेली असते. अशा पुरुषाच्या ठिकाणी भूतमात्रांतील भेदभाव लयास जाऊन, त्याला सर्वत्र आत्मदर्शनच होत असते. ही साम्यस्थिती अथवा आत्मस्थिती म्हणजेच परम-भक्ती होय. म्हणून ज्ञानदेव म्हणतात, **'साम्यापरौति प्राप्ती जगी नाही ।'** अशा भक्ताच्या ठिकाणी, त्याच्यासह एका परमात्म्याशिवाय काहीही शिल्लक राहत नाही. **'सोऽहं तेंही अस्तवलें ।'** अशी स्थिती त्याला प्राप्त झालेली असते. या अवस्थेलाच 'सहजस्थिती' अथवा 'सहजप्रकाश' असे माउलींनी म्हटलेले आहे.

**तैसा मी एकवांचूनि कांहीं । तया तयाहीसकट नाहीं ।**
**हे चौथी भक्ती पाहीं । माझी तो लाहे ॥ ज्ञाने.१८.५४.११११॥**
**येर आर्तु जिज्ञासु अथार्थी । हे भजती जिये पंथीं ।**
**ते तिन्ही पावोनि चौथी । म्हणिपत आहे ॥ ज्ञाने.१८.५४.१११२॥**
**येऱ्हवीं तिजी ना चौथी । हे पहिली ना सरती ।**
**पैं माझिये सहजस्थिती । भक्ति नाम ॥ज्ञाने.१८.५४.१११३॥**
**ऐसा हा सहज माझा । प्रकाशु जो कपिध्वजा ।**
**तो भक्ति या वोजा । बोलिजे गा ॥ ज्ञाने.१८.५४.१११७॥**

आर्त, जिज्ञासू आणि अर्थार्थी यांच्या भक्तीमध्ये अज्ञानामुळे देव, भक्त आणि भक्ती म्हणजेच द्रष्टा, दृश्य आणि दृष्टी असा त्रिपुटी व्यवहार असतो. **'एवं घेऊनि अज्ञानातें । माझी भक्ति जे हे वर्ते । ते दावी मज द्रष्टयातें । दृश्य करूनि ॥ ज्ञाने.१८.५४.११२१॥'** मात्र या चौथ्या भक्तीमध्ये, देव-भक्त-भक्ती किंवा द्रष्टा-दृश्य-दृष्टी असा भेद शिल्लक राहत नाही. येथे देव-भक्तांचे पूर्ण ऐक्य असते. या अवस्थेत दृश्यत्व व द्रष्टृत्व संपून केवळ परमात्माच शिल्लक राहतो. येथे 'देव-भक्तपण' संपलेले असते. ज्ञानदेव वर्णन करतात;

**तैसा सर्वत्र मीचि मियां । घेपतसें भक्ति इया ।**
**परि दृश्यत्व हें वायां । अज्ञानवशें ॥ ज्ञाने.१८.५४.११२४॥**
**तैसा मीचि अज्ञानद्वारें । दिसें परि हस्तांतरें ।**
**मग द्रष्टृत्व तें सरे । मियांचि मी लाभें ॥ ज्ञाने.१८.५४.११२८॥**



**म्हणौनि दृश्यपथा- । अतीतु माझा पार्था ।**
**भक्तियोगु चवथा । म्हणितला ॥ ज्ञाने.१८.५४.११२९॥**

हीच 'ज्ञानभक्ती' होय. अशा ज्ञानभक्तीने जो भक्त भगवंतांशी एकरूप होतो, तो केवळ भगवंतच होऊन राहतो. असा 'ज्ञानी भक्त' म्हणजे 'भगवंतांचा आत्मा'च होय असे सांगून, माउलींनी हे देव-भक्तांचे ऐक्य किती पराकोटीचे असते, ते सूचित केले आहे. हेच 'निकराचे अद्वैत' होय. पण या निकराच्या अद्वैतातही भक्ती संभवते; हेच या भक्तीचे विशेष होय. म्हणून ज्ञानदेव या भक्तीला 'उत्तम भक्ती' असे म्हणतात. ''ही भक्ती उत्तम असल्याने, कल्पाच्या आरंभी ती आपण भागवताच्या निमित्ताने ब्रह्मदेवाला सांगितली. ज्ञानी पुरुष हिलाच 'स्वसंविति' असे म्हणतात, तर शैव 'शक्ती' असे म्हणतात. हिलाच आम्ही आमची 'परम-भक्ती' म्हणतो,'' असे सांगून, ज्ञानदेवांनी ज्ञान्यांची 'स्वसंविति', शैवांची 'शक्ती' आणि आपली 'परम-भक्ती' एकच आहे हे स्पष्ट केलेले आहे.

**इया ज्ञान भक्ती सहज । भक्त एकवटला मज ।**
**तो मीचि केवळ हें तुज । श्रुतही आहे ॥ ज्ञाने.१८.५५.११३०॥**
**जे उभऊनियां भुजा । ज्ञानिया तो आत्मा माझा ।**
**हें बोलिलों कपिध्वजा । सप्तमाध्यायीं ॥ ज्ञाने.१८.५५.११३१॥**
**ते हे कल्पादि भक्ति मियां । श्रीभागवतमिषें ब्रह्मया ।**
**उत्तम म्हणोनि धनंजया । उपदेशिली ॥ ज्ञाने.१८.५५.११३२॥**
**ज्ञानी इयेतें स्वसंविति । शैव म्हणती शक्ति ।**
**आम्ही परम भक्ती । आपली म्हणों ॥ ज्ञाने.१८.५५.११३३॥**

'स्वसंविति' म्हणजे केवळ ज्ञानमात्र अवस्था, सहज ज्ञानस्फूर्ती होय. हीच आपल्या स्वरूपाची स्वसंवेद्य अवस्था होय. ज्ञानदेवांनी, ज्ञानेश्वरीच्या पहिल्याच ओवीत, या परमतत्त्वाला वंदन करताना **'जय जय स्वसंवेद्या । आत्मरूपा ॥ ज्ञाने.१.०.१॥'** असे म्हटले आहे. चांगदेव पासष्टीमध्ये 'संवित्ती' असा शब्द आलेला आहे. (चांगदेव पासष्टी, ओवी क्रमांक १२,१३,१४). ज्ञानी पुरुषांचा निकराचा आत्मानुभव म्हणजेच ही 'स्वसंविति' होय. शैव हिलाच 'शक्ती' म्हणतात. शैव संप्रदायामध्ये आणि

नाथसंप्रदायामध्ये 'शक्तियुक्त शिव' हे जगाचे अंतिम तत्त्व मानलेले आहे. हे 'शिवशक्ती' एकच आहेत, असे ज्ञानदेवांनी अमृतानुभवाच्या पहिल्या प्रकरणामध्ये स्पष्ट केलेले आहे. हा सर्व संदर्भ लक्षात घ्यावयास हवा. तात्पर्य; ज्ञानी पुरुषांची 'स्वसंविति', शैवांची 'शक्ती' आणि वैष्णवांची 'परम-भक्ती' ही एकच आहे. येथे नाममात्र भेद असून ती अवस्था एकच आहे. अशा स्थितीत वैराग्य विवेकासह नाहीसे होते; तर बंध हा मोक्षाच्या कल्पनेसह लयास जातो आणि वृत्ती ब्रह्मचिंतनादी अभ्यासासह लोप पावते. **'बंधनची नाही ठावे । मुक्त कासया म्हणावे ।'** असे या अवस्थेचे वर्णन संत तुकारामांनी केले आहे.

या भक्तीचे स्वरूप, सातव्या अध्यायामध्येही स्पष्ट केलेले आहे. भगवद्गीतेच्या सातव्या अध्यायातील सोळाव्या श्लोकामध्ये आर्त, जिज्ञासू, अर्थार्थी आणि ज्ञानी अशा चार प्रकारच्या भक्तांचा उल्लेख येतो. मात्र ''त्यांतील ज्ञानी भक्त हाच आपल्याला अधिक प्रिय आहे,'' असे भगवंतांनी म्हटले आहे.

**तेषां ज्ञानी नित्ययुक्त एकभक्तिर्विशिष्यते ।**
**प्रियो हि ज्ञानिनोऽत्यर्थमहं स च मम प्रियः ॥ भ.गी.७.१७॥**

आर्त, जिज्ञासू आणि अर्थार्थी हे तिन्ही भक्त मनात काही ना काही हेतू ठेवून त्याच्या पूर्तीसाठी भक्ती करतात. मात्र ज्ञानी भक्ताच्या ठिकाणी कोणताच हेतू नसतो, अपेक्षा नसते. त्याच्या ठिकाणी 'काहीच करणे नसते'. म्हणून ज्ञानी भक्त हाच खरा भक्त होय. त्याच्या ज्ञानाच्या प्रकाशाने भूतमात्रांतील भेद नाहीसे झालेले असतात. तो भगवंतांशी समरस झालेला असतो आणि तेव्हाच भक्तही असतो. भगवंतांशी ऐक्य होऊनही 'मी भक्त आहे' याचा त्याला विसर पडलेला नसतो. या ज्ञानप्रकाशाने 'मी आत्मा आहे' असे तो म्हणतो, तेव्हा भगवंतही प्रेमाने 'तो माझा आत्मा आहे' असे म्हणतात. ''असा ज्ञानी भक्त म्हणजे केवळ माझे चैतन्यच होय;'' असेही भगवंतांनी सांगितले आहे. **'एऱ्हवी ज्ञानिया जो म्हणिजे । तो चैतन्यचि केवळ माझे ।'** ज्ञानदेवांचे याविषयीचे भाष्य मुळातून पाहण्यासारखे आहे.



**तेथ आर्त तो आर्तीचेनि व्याजें । जिज्ञासु तो जाणावयालागीं भजे ।**
**तिजेनि तेणें इच्छिजे । अर्थसिद्धि ॥ ज्ञाने.७.१७.११०॥**
**मग चौथियाच्या ठायीं । कांहींचि करणें नाहीं ।**
**म्हणौनि भक्त एक पाहीं । ज्ञानिया जो ॥ ज्ञाने.७.१७.१११॥**
**जे तया ज्ञानाचेनि प्रकाशें । फिटलें भेदाभेदांचें कडवसें ।**
**मग मीचि जाहला समरसें । आणि भक्तही तेवींचि ॥ ज्ञाने.७.१७.११२॥**
**जैसा वारा कां गगनीं विरे । मग वारेपण वेगळें नुरे ।**
**तेवीं भक्त हे पैज न सरे । जरी ऐक्या आला ॥ ज्ञाने.७.१७.११४॥**
**तैसें शरीरीं हन कर्में । तो भक्त ऐसा गमे ।**
**परी अंतरप्रतीतिधर्में । मीचि जाला ॥ ज्ञाने.७.१७.११६॥**
**आणि ज्ञानाचेनि उजिडलेपणें । मी आत्मा ऐसें तो जाणे ।**
**म्हणऊनि मीही तैसेंचि म्हणें । उचंबळलासांता ॥ ज्ञाने.७.१७.११७॥**

आपापल्या हितासाठी, लोभासाठी अनेक भक्त भगवंतांची भक्ती करतात. खरे तर भगवंतांशी झोंबतात. म्हणजे त्यांच्याकडे अनेक इच्छा व्यक्त करून त्यांना एक प्रकारे त्रासच देत असतात. मात्र एक ज्ञानी भक्तच भगवंतांना आवडतो.

**म्हणौनि आपुलाल्या हिताचेनि लोभें । मज आवडे तोही भक्त झोंबे ।**
**परी मीचि करी वालभें । ऐसा ज्ञानिया एक ॥ ज्ञाने.७.१८.११९॥**

अशा भक्ताने विषय आणि त्यांतून निर्माण होणारे कामक्रोधादी विकार यांच्यावर विजय मिळवलेला असतो. निषिद्ध-कर्माचा त्याग करून, फलाशारहित सत्कर्माच्या मार्गाने शेकडो जन्म तो वाट चालत असतो. अशा वेळी कर्मक्षय होऊन त्याच्या ठिकाणी ज्ञानोदयाची पहाट होते. मग गुरुकृपा होऊन ब्रह्मसाम्यतेचे ऐश्वर्य त्याला दिसू लागते. अशा वेळी त्याला सर्वत्र परमात्म्याचीच प्रतीती येऊ लागते. भगवंतांशिवाय दुसरे काहीच नाही, याचा अनुभव तो घेऊ लागतो. तो परमेश्वराच्या आत असतो; तर परमेश्वर त्याचे अंतर्बाह्य व्यापून असतो. तो सर्व जग आत्मरूप पाहतो. 'हे सर्व विश्व वासुदेवरूप आहे' अशा अनुभवरूपी रसाने त्याचा भाव भरलेला असतो.

असा भक्त म्हणजे भक्तांचा राजा होय आणि तोच ज्ञानी होय. माउली वर्णन करतात;

**ते वेळीं जयाकडे वास पाहे । तेउता मीचि तया एकु आहें ।**
**अथवा निवांत जरी राहे । तऱ्ही मीचि तया ॥ ज्ञाने.७.१९.१३२॥**
**हें असो आणिक कांहीं । तया सर्वत्र मीवांचूनि नाहीं ।**
**जैसें सबाह्य जळ डोहीं । बुडालिया घटा ॥ ज्ञाने.७.१९.१३३॥**
**तैसा तो मजभीतरी । मी तया आंतबाहेरी ।**
**हें सांगिजेल बोलवरी । तैसें नव्हे ॥ ज्ञाने.७.१९.१३४॥**
**हें समस्तही श्रीवासुदेव । ऐसा प्रतीतिरसाचा वोतला भाव ।**
**म्हणोनि भक्तांमाजी राव । आणि ज्ञानिया तोचि ॥ ज्ञाने.७.१९.१३६॥**

या संदर्भात आलेला भागवत पुराणाचा उल्लेखही महत्त्वाचा आहे. ''हा भक्तिमार्ग उत्तम असल्यामुळे, कल्पाच्या आरंभी आपण ब्रह्मदेवाला सांगितला;'' असे भगवान श्रीकृष्ण सांगतात. म्हणजे भक्तिमार्ग कल्पाच्या आरंभापासून अस्तित्वात आहे, असे येथे स्पष्ट होते. भक्तिमार्ग हा वैदिक धर्मापेक्षाही पुरातन आणि अनादी आहे. तात्पर्य; भागवत धर्म हा वैदिक धर्मापेक्षाही पुरातन आहे, हे येथे ज्ञानदेवांना सूचित करावयाचे आहे.

**ते हे कल्पादि भक्ति मियां । श्रीभागवतमिषें ब्रह्मया ।**
**उत्तम म्हणौनि धनंजया । उपदेशिली ॥ ज्ञाने.१८.५५.११३२॥**

या एकाच ओवीतून ज्ञानदेवांचा धर्मविषयक, जीवनविषयक व तत्त्वज्ञानात्मक दृष्टिकोन समजून येतो.

वारकरी संप्रदाय हे भागवत-धर्माचेच एक रूप आहे. विठ्ठलभक्तांना 'भक्त भागवत' असे म्हणतात. 'श्रीमद् भगवद्गीता' आणि 'श्रीमद् भागवत पुराण' हे भागवत-धर्माचे मुख्य आधार-ग्रंथ आहेत. भक्तिमार्गाचा पुरस्कार हे भागवताचे सार आहे. ही परमभक्ती भगवंतांनी उद्धवाला सांगितलेली आहे. ज्ञानदेवांना अभिप्रेत असणारी भक्ती ती हीच होय. संतांनी याच भक्तिमार्गाचा; म्हणजेच भागवत धर्माचा पुरस्कार केला. **'आम्हां सापडले वर्म । करू भागवत धर्म ।'** असे आपल्या कार्याचे स्वरूप संत नामदेवांनी स्पष्ट केले.



संत एकनाथांनी तर, भागवत पुराणाच्या एकादश स्कंधावर विस्तृत भाष्य (एकनाथी भागवत) लिहून याच भागवत-प्रणीत भक्तीचा पुरस्कार केला आणि संत तुकाराम महाराज या भागवत भक्तिमंदिराचे कळस ठरले.

'स्वसंविति', 'शक्ती', 'परम-भक्ती' आणि भागवतातील 'उत्तम भक्ती' ही एकच आहे; असे सांगून, ज्ञानदेवांनी 'नाथ' आणि 'वारकरी' या उभय संप्रदायांची तात्त्विक बैठक एकच आहे असे दाखवून दिले. नाथ आणि वारकरी संप्रदायांतील अनेक थोर पुरुषांनी मोक्षापेक्षा परमभक्ती श्रेष्ठ असल्याचे प्रतिपादन केले आहे. **'चहूं पुरुषार्थां शिरीं । भक्ति जैसी ॥ज्ञाने.१८.४३.८६७॥'** असे ज्ञानदेव स्पष्ट करतात. एवढेच नव्हे तर, असे भक्त या भक्तीच्या प्राप्तीपुढे कैवल्यालाही बाजूला सारतात. अशा भक्तांच्या लीलेमध्ये नीती जगलेली असते. अशा भक्तांचे सर्व आचार-विचार सामाजिक नीतिमूल्यांवर अधिष्ठित असतात. असे सांगून ज्ञानदेवांनी भक्तीच्या सामाजिक अंगावरही प्रकाश टाकलेला आहे. सर्व प्राणिमात्रांमध्ये भगवंत पाहणे, हाच ज्ञानदेवांचा भक्तियोग आहे. भक्तिमार्गावर टीका करणाऱ्यांनी ज्ञानदेवांच्या पुढील दोन ओव्यांचे चिंतन अवश्य करावे.

**जयां भक्तीची येतुली प्राप्ती । जे कैवल्यातें परतें सर म्हणती ।**
**जयांचिये लीलेमाजि नीती । जियाली दिसे ॥ज्ञाने.९.१३.१९२॥**
**जें जें भेटे भूत । तें तें मानिजे भगवंत ।**
**हा भक्तियोग निश्चित । जाण माझा ॥ज्ञाने.१०.८.११८॥**

या परम-भक्तीत मग्न झालेला भक्त, भोग आणि मोक्ष हे दोन्ही सारखेच समजून दोहोंचाही त्याग करतो. कारण त्याच्या दृष्टीने भगवंतांचे परमप्रेमच महत्त्वाचे असते. या भक्तीच्या क्षेत्रात भोग आणि मोक्ष दोन्हीही बापुडेच असतात. ज्ञानदेव म्हणतात;

**जयांचिये आवडी । केली मजशीं कुळवाडी ।**
**भोग मोक्ष बापुडीं । त्यजिलीं कुळें ॥ज्ञाने.१२.६.८१॥**

भागवताने ज्ञानाला भक्तिपुत्र मानले आहे. **'भक्ती ते मूळ । ज्ञान ते फळ । वैराग्य केवळ । येथीचे फूल ॥'** असे संत एकनाथ वर्णन करतात.

‘ज्ञानोत्तर प्रेमभक्ती असे तिचे स्वरूप नसून, ज्ञानासह ज्ञानकाली परम-भक्ती असे तिचे खरे स्वरूप आहे.’ ज्ञान आणि भक्ती या दोन्हींत ज्ञानदेवांना पूर्व-उत्तर दशा अपेक्षित नाहीत. भक्तीच्या उदरीच ज्ञान जन्मलेले असल्याने, भक्तीनेच ज्ञानाला ‘महिमान’ दिले आहे.’ (‘ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानदेवी’, संपा.रेळेकर-नसिराबादकर, पृष्ठ ३२८).

अद्वैतावस्थेत भक्ती संभवत नाही; असे म्हणणेही चुकीचे आहे. या अवस्थेत भक्त भगवंताशी पूर्णपणे ऐक्य पावलेला असतो आणि तरीही त्याची भक्ती थांबलेली नसते. **‘शिवो भूत्वा शिवं यजेत् ।’** किंवा **‘मीचि होऊनि पांडवा । करिती माझी सेवा ।’** असे या भक्तीचे स्वरूप आहे. असा भक्त भगवंत होऊनच भगवंतांचा भोग घेत असतो. तो कोणत्याही क्रियेशिवाय भगवंतांचे भजन करतो. चंदनाचा सुगंध स्वभावतःच चंदनाशी एकरूप असतो, चंद्रप्रभा सहजच चंद्राशी एकरूप असते, अलंकार सुवर्णाशी एकरूप असतो; त्याप्रमाणे अद्वैतात कोणत्याही प्रकारची क्रिया सहन होत नसली तरी भक्ती संभवते. पण ही गोष्ट अनुभवानेच जाणण्यासारखी आहे; बोलून दाखविता येण्यासारखी नाही. तात्पर्य; ही परम-भक्ती अनुभवसिद्ध आहे. ज्ञानदेव म्हणतात;

**यालागीं तो कर्मयोगी । मी जालाचि मातें भोगी ।**
**तारुण्य कां तरुणांगी । जियापरी ॥ज्ञाने.१८.५५.११४७॥**
**तरंग सर्वांगीं तोय चुंबी । प्रभा सर्वत्र विलसे बिंबीं ।**
**नाना अवकाश नभीं । लुंठत जैसा ॥ज्ञाने.१८.५५.११४८॥**
**तैसा रूप होऊनि माझें । मातें क्रियावीण तो भजे ।**
**अलंकारु कां सहजें । सोनयातें जेवीं ॥ज्ञाने.१८.५५.११४९॥**
**कां चंदनाची द्रुती तैसी । चंदनीं भजे अपैसी ।**
**कां अकृत्रिम शशीं । चंद्रिका ते ॥ज्ञाने.१८.५५.११५०॥**
**तैसी क्रिया कीर न साहे । तऱ्हीं अद्वैतीं भक्ति आहे ।**
**हें अनुभवाचिजोगें नव्हे । बोलाऐसें ॥ज्ञाने.१८.५५.११५१॥**

अशा ज्ञानी भक्ताच्या कृतीत ‘हे कर्म आणि हा मी कर्ता’ असा भाव



नसतो. तो भक्त भगवद्रूपच असतो. हे आरशाने आरशाला पाहिल्यासारखे किंवा सुवर्णाने सुवर्ण झाकल्यासारखे आहे. भगवंत सांगतात; ‘‘अशी मद्रूपता आल्याने, त्याच्याकडून जी जी क्रिया घडेल ती ती न केल्यासारखीच होते. हीच माझी खरी खुणेची पूजा होय.’’ हीच त्या भक्ताकडून होणारी महापूजा आहे. अशा भक्ताला कोणतेच बंधन नसते. तो बोलेल ते भगवंतांचे स्तवन होते. तो पाहील ते भगवंतांचे दर्शन. तो जाईल तिकडे त्या अद्वय परमात्म्याची यात्रा घडते. त्याची सर्व प्रकारची कृती म्हणजे भगवंतांची पूजा, तो कल्पील तो त्यांचा जप व तो ज्या ठिकाणी असेल तीच त्या परमात्म्याची समाधी होय. तात्पर्य; त्याच्या सर्व कृतीत सहजता असते. त्यालाच वेगळे अस्तित्व नसते; तर त्याच्या कर्मांना वेगळे अस्तित्व कसे असणार ? त्याच्या सर्व क्रियाही भगवद्रूपच असतात.

ज्ञानदेवांनी या अवस्थेचे मोठे उत्कट, रसाळ आणि भावमधुर शैलीत वर्णन केले आहे. ज्ञानदेवांची ही वाणी अंतःकरणाचा तात्काळ ठाव घेते.

**कर्महीं करीतचि आहे । जैं करावें हे भाष जाये ।**
**तैं न करणेंचि होये । तयाचें केलें ॥ज्ञाने.१८.५५.११७७॥**
**क्रियाजात मी जालेपणें । घडे कांहींचि न करणें ।**
**तयाचि नांव पूजणें । खुणेचें माझें ॥ज्ञाने.१८.५५.११७८॥**
**म्हणौनि करितयाही वोजा । तें न करणें हेंचि कपिध्वजा ।**
**निफजे तिया महापूजा । पूजी तो मातें ॥१८.५५.११७९॥**
**एवं तो बोले तें स्तवन । तो देखे तें दर्शन ।**
**अद्वया मज गमन । तो चाले तेंचि ॥ज्ञाने.१८.५५.११८०॥**
**तो करी तेतुली पूजा । तो कल्पी तो जप माझा ।**
**तो निजे तेचि कपिध्वजा । समाधि माझी ॥ज्ञाने.१८.५५.११८१॥**

अशा ‘अनन्यसिद्धा भक्ती’ने तो भगवंताशी एकरूप होतो आणि आत्मत्वाने सर्व दृश्य पदार्थांमध्ये त्या द्रष्ट्याला म्हणजे परमात्म्यालाच पाहात असतो.

**इया अनन्यसिद्धा भक्ती । या आघवाचि दृश्यजातीं ।**
**मज आपणपेंया सुमती । द्रष्टयातें जाणे ॥ज्ञाने.१८.५५.११८५॥**

या 'अनन्यसिद्धा भक्ती'लाच स्वामी स्वरूपानंदांनी 'स्वयंसिद्ध भक्तियोग' असे म्हटले आहे. प्रस्तुत ओवीचा, स्वामी स्वरूपानंदांचा अनुवाद पुढीलप्रमाणे आहे;

**ह्या चि स्वयंसिद्ध । भक्तियोगें पूर्ण । मद्रूप होवोन । निरंतर ॥**
**आत्मत्वें तो पाहे । ज्ञानी-भक्त साच । मज द्रष्ट्यासी च । दृश्यजाती ॥**

- अभंग ज्ञानेश्वरी

हीच अद्वय भक्ती होय. जेथे जाणणारा वेगळा राहत नाही. येथील जाणणेही आत्मानुभूतीत विलीन होते. हा अनुभव जाणीव-नेणीव यांच्या पलीकडील आहे. येथे बोधालाच बोध होतो. आनंदालाच आनंद होतो. सुखालाच सुखाचा भोग घडतो. अशी ही अवस्थातीत अवस्था म्हणजे परम भक्ती होय. हे सर्व माउलींच्याच शब्दांत पाहावयास हवे.

**ऐसें आत्मत्वे मज एकातें । इया अद्वयभक्ती जाणोनि निरुतें ।**
**आणि याही बोधा जाणतें । तेंही मीचि जाणें ॥ज्ञाने.१८.५५.१२००॥**
**मग द्वैताद्वैतातीत । मीचि आत्मा एक निभ्रांत ।**
**हें जाणोनि जाणणें जेथ । अनुभवीं रिघे ॥ज्ञाने.१८.५५.१२०५॥**
**न बोलणेंही न बोलोनी । तें बोलिजे तोंड भरूनी ।**
**जाणीव नेणिव नेणोनी । जाणिजे तें ॥ज्ञाने.१८.५५.१२१४॥**
**तेथ बुझिजे बोध बोधें । आनंद घेपे आनंदें ।**
**सुखवरी नुसधें । सुखचि भोगिजे ॥ज्ञाने.१८.५५.१२१५॥**

या पराभक्तीलाच माउलींनी 'क्रमयोग' म्हटले असून, या मार्गाने येणाऱ्याला भगवंतांची प्राप्ती विनासायास होते, असे स्पष्ट केले आहे.

**म्हणौनि माझ्या ठायीं । जाचावें नलगे कांहीं ।**
**मी लाभें इये उपायीं । साचाच गा ॥ज्ञाने.१८.५५.१२२५॥**

या परम-भक्तीत अनन्य भाव आणि शरणागत भाव महत्त्वाचा आहे.



त्याशिवाय ही परम-भक्ती प्राप्तच होत नाही. म्हणून भगवान श्रीकृष्ण अर्जुनाला शेवटी सांगतात;

**तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत ।**
**तत्प्रसादात्परां शान्तिं स्थानं प्राप्स्यसि शाश्वतम् ॥भ.गी.१८.६२॥**

या श्लोकावरील माउलींचे भाष्य परमसुंदर असून, त्यात वरील सर्व विवेचनाचे सार आले आहे.

**तया अहं वाचा चित्त आंग । देऊनियां शरण रिग ।**
**महोदधी कां गांग । रिगालें जैसें ॥ज्ञाने.१८.६२.१३१९॥**
**मग तयाचेनि प्रसादें । सर्वोपशांतिप्रमदे ।**
**कांत होऊनियां स्वानंदें । विरूपींच रमसी ॥ज्ञाने.१८.६२.१३२०॥**
**संभूति जेणें संभवे । विश्रांति जेथें विसंबे ।**
**अनुभूतिही अनुभवे । अनुभवा जया ॥ज्ञाने.१८.६२.१३२१॥**
**तिये निजात्मपदींचा रावो । होऊनि ठाकसी अव्ययो ।**
**म्हणे लक्ष्मीनाहो । पार्था तूं ॥ज्ञाने.१८.६२.१३२२॥**

ही परम-भक्ती म्हणजे त्या सर्वात्मक, सर्वव्यापक, हृदयस्थ ईश्वराचा प्रसाद होय. हा प्रसाद ज्याला प्राप्त होतो, तो वेगळेपणाने कसा राहील ?

□□

# श्रीसंत ज्ञानेश्वर आणि महानुभाव संप्रदाय

डॉ.मीरा घांडगे

---

यादवकाळ हा महाराष्ट्र-संस्कृतीचा आरंभकाळ आणि मराठी सारस्वताचा वैभवकाळ होता. भागवत संप्रदायाचे अध्वर्यू श्रीसंत ज्ञानदेव आणि संत नामदेव, संत जनाबाई इत्यादींनी मराठी संस्कृतीची जडण-घडण केली होती. महानुभाव संप्रदायाच्या चक्रधर स्वामींच्या प्रेरणेतून नरेंद्र,

भास्करभट्ट बोरीकर इत्यादी महंतांनी गद्य-पद्यात्मक वाङ्मयाची निर्मिती केली होती. कर्नाटकात महात्मा बसवेश्वरांचे अद्‌भुत धर्मकीर्तन आकारास येत होते. एकूण हा काळ धार्मिक आणि सामाजिक चळवळींनी बहरलेला होता.

ज्ञानेश्वरीपूर्वी (शके १२१२), मुकुंदराजांच्या 'विवेकसिंधु' (शके १११०) या सुबोध गद्य-पद्यस्वरूप निबंधरूपी ग्रंथाची रचना झाली होती. चक्रधर स्वामींच्या लीळांचे शोधन करून, त्यांचा चरित्रग्रंथ 'लीळाचरित्र' (शके १२००), तर गोविंदप्रभूंच्या लीळांचा चरित्रग्रंथ 'गोविंदप्रभूचरित्र' (शके १२१०) या दोन ग्रंथांची निर्मिती म्हाइंभटांनी केली होती. ज्ञानेश्वरीच्या रचनेनंतर लगेचच एक-दोन वर्षांत नरेंद्रांचे 'रुक्मिणी-स्वयंवर' (शके १२१४-१५), भास्करभट्टांचे 'शिशुपालवध' (शके १२३४), 'उद्धवगीता' (शके १२३५), दामोदर पंडितांचे 'वच्छहरण' (शके १२३८) इत्यादी महत्त्वपूर्ण ग्रंथांची रचना झाली होती. मुकुंदराजांचा 'विवेकसिंधु' आणि म्हाइंभटांचे 'लीळाचरित्र', 'गोविंदप्रभूचरित्र' या व्यतिरिक्त महानुभाव संप्रदायातील इतर सर्वच ग्रंथांची रचना ज्ञानेश्वरीच्या उत्तरकाळात झालेली आहे.

श्रीसंत ज्ञानदेव हे नाथ व भागवत संप्रदायांचे; तर नरेंद्र आणि भास्करभट्ट बोरीकर हे महानुभाव पंथाचे अनुयायी असले तरी, या सर्वांची वाङ्मयनिर्मितीची प्रेरणा एकच होती. लीळाचरित्रकार म्हाइंभट, नरेंद्र, भास्करभट्ट इत्यादी महानुभावीय महंत उच्चवर्णीय, अत्यंत विद्वान, संस्कृत भाषेची व साहित्याची जाण असणारे व्युत्पन्न पंडित होते. तात्पर्य; श्रीसंत ज्ञानदेवांप्रमाणे या व्युत्पन्न पंडितांची साहित्याकडे पाहण्याची दृष्टी रसपरिपूर्णतेची होती. संत ज्ञानदेवांच्या रचनेतील कल्पनाविलास, शब्दरचनेतील माधुर्य, महानुभाव कवींच्या रचनेतूनही दिसते. म्हणूनच **'मुक्ताफळांचिया तुरंबीसारख्या अक्षेरांचिया लोंबी कवितालतेवर असाव्यात', 'कवितेतील पदांचा ढाळु कामिनी कटाक्षांसी सराऊ देईल असा असावा'** असे नरेंद्र म्हणतात; तर भास्करभट्ट **'शब्दसुखाची नव्हाळी', 'बोलाचा रंग रसाळ वाचा'** इत्यादी शब्दसौंदर्याची दखल घेणारी वचने 'शिशुपालवधा'त वापरतात. संत ज्ञानदेवांनी नवरसांमध्ये शांतरसाला प्राधान्य दिलेले आहे.



**जयाचिया बरवेपणीं । कीजे आठां रसांची वोवाळणी ।**
**जो सज्जनाचिये आयणी । विसावा जगी ।।ज्ञाने.४.४२.२१३।।**
**जो शांतुचि अभिनवेल । ते परियसा मऱ्हाटे बोल ।**
**जे समुद्राहूनि खोल । अर्थभरित ।।ज्ञाने.४.४२.२१४।।**

श्रीसंत ज्ञानदेवांप्रमाणेच भास्करभट्टांनी **'साहित्यांचा राहाणी । शांतिरसा अवतरण आणि ।'** असे 'उद्धवगीते'त तर 'शिशुपालवधा'त **'ना तरी शांतरसे सींपतां । सासीनली ज्ञानलता ।।'** असे सांगत, संत ज्ञानदेवांचेच अनुकरण केलेले दिसते. नरेंद्रांनीही भक्तिरसाबरोबर शांतरसाचे महत्त्व वेळोवेळी मान्य केले आहे.

'साहित्य म्हणजे आशय आणि अभिव्यक्ती यांचे एकत्रित रूप'; हे संत ज्ञानदेवांप्रमाणे महानुभाव कवींनी देखील मान्य केले आहे. **'वाचे बरवें कवित्व । कवित्वीं बरवें रसिकत्व । रसिकत्वीं परतत्त्व । स्पर्शु जैसा ।।ज्ञाने.१८.१४.३४७।।'** ही संत ज्ञानदेवांची ओवी सर्वश्रुत आहे. **'साहित्याचिये सेजे । बोलांचा रंग उपलविजे । तेवीच काव्य कीजे । भणे कवि भास्करु ।।'** किंवा **'साहित्याचेनि परिमळे । शृंगाराचेनि मेळे । प्रबंधे होती भातावळे । कविजनांचे ।।'** असे भास्करभट्ट म्हणतात. तर **'कविताकामिनीचा हात धरू', 'भावो दोन्ही आंगी मलपतु'** असे नरेंद्र म्हणतात.

श्रीसंत ज्ञानदेवांनी संस्कृत भाषेपेक्षा मराठीचा पुरस्कार केला. त्यामागे **'ये मऱ्हाठियेचिया नगरीं । ब्रह्मविद्येचा सुकाळु करीं । घेणें देणें सुखचिवरी । हों देईं या जगा ।।ज्ञाने.१२.०.१६।।'** हाच उद्देश होता. म्हणूनच;

**माझा मऱ्हाठाचि बोल कौतुके । परी अमृतातेही पैजा जिंके ।**
**ऐसी अक्षरे रसिके । मेळवीन ।।ज्ञाने.६.१४।।**

अशी संत ज्ञानदेवांची भूमिका आहे. महानुभाव महंतांनी ज्ञानदेवांप्रमाणेच मराठीचा पुरस्कार केलेला दिसतो. सिद्धांतसूत्रातील प्रकरणांचा संस्कृत अनुवाद करणाऱ्या केशिराजबासांना नागदेवाचार्य म्हणतात; **'नको गा केशवदेवा :**

**एणे माझिया म्हातारीया नागवतीला :' 'म्हातारीया'** म्हणजे संस्कृत न जाणणारी साधी-भोळी माणसे अडाणी राहतील. संस्कृतमधून बोलणाऱ्या केशिराजबासांना **'तुमचा अस्मात् कस्मात् मी नेणो गा : मज श्रीचक्रधरे निरूपली मऱ्हाटी : तियाची पुसा ॥ (स्मृति.६६)'** यावरून नागदेवाचार्यांचे भाषाविषयक धोरण स्पष्ट होते. नरेंद्रांनीही आपल्या काव्यारंभी मराठीचा गौरव केलेला आहे.

**जिये भाषेचिये रसवृत्ती : सा भाषांचे कुपे काजेति निगुती :**
**ते मऱ्हाटी कवण जाणे निरुती : जे रसाचे जीवन ॥४६॥**
**ते मऱ्हाटी बोल रसिक : वरि दावीन देशियेचे बीक :**
**म्हणौन सव्याख्यान श्लोक : मिसे वोवियेचेनि ॥४७॥**

या रचनेतून संत ज्ञानदेवांच्या भूमिकेशी व रचनेशी साम्यच दिसते. कवीश्वर भास्करांनीही 'शिशुपालवधा'त मराठीचा गौरव केलेला आहे.

**साहित्याचिया खेळकुळिया : सुदेशा बोलांचिया चिपोळिया :**
**सिंपणे खेळती सावळिया : रसवृत्तीसी ॥२६॥**

पंधराव्या शतकातील संतोषमुनी कृष्णदासांनी, आपल्या 'रुक्मिणी-स्वयंवरा'त मराठीला सर्व भाषांची जननी म्हटले आहे.

**मऱ्हाटी स्त्रीलिंग वाक्य : आनि संस्कृत तव नपुंसक :**
**म्हणौनि बाळकत्व आइक : तयासिच साजे ॥**

संत ज्ञानदेवांप्रमाणे महानुभाव महंतांचा आणि मराठी भाषेचा संबंध हा अत्यंत जिव्हाळ्याचा व पारमार्थिक स्वरूपाचे स्थान असलेला आहे हे जाणवते.

वारकरी संप्रदायात, विठ्ठलाचे बालरूप म्हणून श्रीकृष्णाची भक्ती केली जाते. श्रीकृष्णाने अर्जुनाला कुरुक्षेत्राच्या युद्धभूमीवर सांगितलेल्या गीतेवर श्रीसंत ज्ञानदेवांनी केलेली टीका 'ज्ञानेश्वरी'. तिला वारकरी संप्रदायाच्या प्रस्थानत्रयीत आद्य स्थान आहे. **'गीतार्थाचे सार । ते विवेकसिंधूचे पार ।'** असे ज्ञानेश्वर महाराजही म्हणतात. ज्ञानेश्वरीत गीतेची महती अनेक ठिकाणी वर्णन केली आहे.

**तो गीतेचिया बाहळीं । वेदबीज गेलें पाहाळीं ।**
**कीं गायत्री फुलीं फळीं । श्लोकांच्या आली ॥ज्ञाने.१८.६८.१५११॥**



**ते हे मंत्ररहस्य गीता । मेळवि जो माझिया भक्ता ।**
**अनन्यजीवना माता । बाळका जैसी ॥ज्ञाने.१८.६८.१५१२॥**
**तैसी भक्तां गीतेसीं । भेटी करी जो आदरेंसीं ।**
**तो देहापाठीं मजसीं । येकचि होय ॥ज्ञाने.१८.६८.१५१३॥**
**तैसा भूतळीं आघवा । आन न देखें पांडवा ।**
**जो गीता सांगे मेळावां । भक्तजनांचा ॥ज्ञाने.१८.६९.१५१६॥**
**मज ईश्वराचेनि लोभें । हे गीता पढतां अक्षोभें ।**
**जो मंडन होय सभे । संतांचिये ॥ज्ञाने.१८.६९.१५१७॥**

यांसारख्या अनेक ओव्या भगवद्गीतेच्या अध्ययन, ज्ञान, फलश्रुतीच्या संदर्भात ज्ञानेश्वरीत दिसतात.

महानुभाव संप्रदायातील पंचकृष्णांपैकी, श्रीकृष्ण चक्रवर्ती हे परमेश्वराचा अवतार म्हणून त्यांच्या जीवनातील सर्वच घटनांना या संप्रदायात अनन्यसाधारण स्थान आहे. महानुभाव पंथाच्या तत्त्वज्ञानानुसार, श्रीकृष्ण हा पूर्णावतार असल्याने त्याने अर्जुनाला सांगितलेला 'गीता' ग्रंथ हा पंथ प्रमाण मानतो. महाभारताच्या संदर्भात **'गीता श्रीकृष्णोक्ती । एर अवघी व्यासोक्ती ॥ (सूत्र १०९)'** असे श्रीचक्रधरांचे वचन आहे. त्यामुळेच भगवद्गीतेवर अनेक महानुभाव पंडितांनी टीका रचल्या आहेत. महंत कृष्णदास महानुभाव यांनी त्यांपैकी बाहत्तर गीता-टीकांचा शोध लावला असून, त्यांपैकी चाळीस गीता उपलब्ध आहेत. यांतील बहुतेक गीता मराठीत असून, काही हिंदीतही आहेत. त्यांपैकी लक्ष्मींद्रभटकृत 'गीता टीका', मुरारीमल्ल यक्षदेव किंवा निवृत्तिदेवकृत 'यक्षदेवी टीका' (शके १२२४), दिवाकर मुनींची 'दिवाकरी टीका' (शके १३०८), गंगाधर मुनींची पंधराव्या शतकातील 'गंगाधरी टीका' 'गीतार्थबोधिनी' किंवा 'भिंगारकरी टीका', 'गोपाळदासी टीका' अशा अनेक टीकांचे काही भाग प्रसिद्ध आहेत. चाल्हणाच्या नावावर त्याचा शिष्य नृसिंह याने चौदाव्या शतकात लिहिलेल्या 'संकेत गीता' किंवा 'चाल्हण संकेतनी' या टीकेत, संप्रदायाबाहेरच्या अनेकांच्या टीकांचे उल्लेख आहेत.

**भूषण कवि भास्करासारखे : निवृत्ति सोपान ज्ञानदेवो निके :**
**तयाचि सरी केवी ठाके : दैवहत ॥२६॥**

**शंकरभाष्य शंकरानुसारु : ज्ञानदेवो बोलिला अतिपसरू :**

**तया अद्वैती भरू : भणौनि लाठा अर्थ ॥२७॥**

यावरून ज्ञानेश्वरी अन्य सांप्रदायिकांपर्यंत पोहोचलेली होती हे मान्य करता येते. ज्ञानेश्वरीतील तत्त्वज्ञान अद्वैती आहे. महानुभाव संप्रदायाचे तत्त्वज्ञान द्वैती आहे. त्यामुळे 'गंगाधरी टीके'त (पंधरावे शतक) शंकराचार्यांच्या अद्वैतमताचे खंडन करून, चहू पदार्थांचा (जीव, देवता, प्रपंच, परमेश्वर) निवाड करण्यासाठी गीतेची रचना केल्याचे सांगतात;

**का जे मागा संकरादिका बोलता । गीतार्थु राहिला आनौता ।**

**का ते भरले गेले अद्वैता । भ्रांती तव ॥१४॥**

**त्याकारणे अवतरण जगन्नाथा । निवाडु केला चहु पदार्था ।**

**मग बोधु देउनि पार्था । करवी घातु कौरवांचा ॥१५॥**

**म्हणौनि पदार्थ निर्वचेविण । बोलिजे तेतुके अन्यथा ज्ञान ।**

**या कारणे श्लोक व्याख्यान । करीन ओवी प्रबंधे ॥२६॥**

श्रीसंत ज्ञानदेवांच्या ज्ञानेश्वरीतील साडेतीन किंवा चार चरणी ओव्यांचा रचनाप्रकार बहुतेक अनेक महानुभाव महंतांनी गीता-टीकेच्या रचनेसाठी स्वीकारलेला दिसतो.

यादवकाळात, मराठवाडा-विदर्भास **'उभे गंगातीर'** असे म्हटले जात असे. या काळात पैठण ही धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक राजधानी होती. म्हणूनच श्रीसंत ज्ञानदेवांना शुद्धिपत्रासाठी आळंदीहून पैठणला यावे लागले. या प्रवासात ज्ञानदेवादी भावंडांनी लोकस्थितीचे निरीक्षण, वेदशास्त्रांचे अध्ययन चालविले असावे. पैठणला शुद्धिपत्र नाकारल्यानंतर, ही भावंडे गावोगावी फिरत नेवाश्याला नदीकाठी आली आणि तेथे वास्तव्य करून, शके १२१२ मध्ये श्रीज्ञानदेवांनी 'भावार्थदीपिका' लिहिली. ज्ञानेश्वरी लिहिली ते ठिकाण मराठवाडा-पश्चिम महाराष्ट्राच्या सीमारेषेवरील होय.

महानुभावांच्या तीर्थस्थानांमध्ये प्रतिष्ठान किंवा पैठण हे महास्थान होते. या पंथाचे संस्थापक श्रीचक्रधर आपली एकाकी अवस्था सोडून लोकांत



पैठणमध्येच प्रकट झाले. तेथेच ते वर्षभर राहिले. त्यांना प्रतिष्ठानीचे 'चांगदेव राऊळ' म्हणून ओळखले जात असे. त्यांच्या आयुष्यातील महत्त्वाच्या घटना पैठणमध्येच घडल्या. महानुभाव संप्रदायाचा उदय आणि कर्मभूमीचा हा प्रदेश, भागवत संप्रदायाची पताका घेऊन फिरणाऱ्या श्रीसंत ज्ञानदेव माउलींनाही अतिपरिचित होता. त्यांच्या आयुष्यातील काही महत्त्वाचे घटना-प्रसंग याच पैठणमध्ये घडलेले होते. म्हणूनच संत ज्ञानदेवांचे कार्य महानुभाव सांप्रदायिक विद्वान महंत व कवींना परिचित असणे शक्य आहे. त्यामुळेच संत ज्ञानदेवांच्या तत्त्वज्ञान व रचनाबंधाचा काही अंशी प्रभाव महानुभाव सांप्रदायिक महंतांवर असण्याची शक्यता आहे काय ? याचा शोध घेणे महत्त्वाचे ठरते.

**संदर्भ :**

(१) श्रीज्ञानेश्वरी, संपादक- श्री.अण्णा मोरेश्वर कुंटे, श्रीवामनराज प्रकाशन पुणे, २०००.

(२) श्रीचक्रधर दर्शन, श्री.वि.भि.कोलते व इतर, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८२.

(३) मराठी वाङ्मयाभिरुचीचे विहंगमावलोकन, श्री.रा.श्री.जोग.

(४) महानुभाव पंथ आणि त्यांचे वाङ्मय, श्री.शं.गो.तुळपुळे, व्हीनस प्रकाशन, पुणे, १९७६ गोरखपूर आवृत्ती.

(५) सार्थ ज्ञानेश्वरी, श्री.शं.वा.दांडेकर तथा मामासाहेब, वारकरी शिक्षण संस्था, आळंदी देवाची, पुणे, १९९८.

(६) श्रीज्ञानेश्वर वाङ्मय आणि कार्य, श्री.न.र.फाटक, मौज प्रकाशन, मुंबई, १९५२.

□□

● BAPRAKHUMADEVIVARU [बापरखुमादेविवरु] ●

A spiritual & philosophical Marathi monthly magazine, Edited & Published by Prof. Shireesh Shantaram Kawade, at Shreewamanraj Prakashan, 'Shreegurukrupa', ShreeSant Mamasaheb Deshpande Path, Anandnagar, Sinhagad Road, Pune - 411 051, Phone : (020) 24351840; on behalf of ShreeJnanadev Siddhabet Tapovan, Jnana-Yoga-Adhyatma Vidyapeeth Pratishthan, Alandi, Dist. Pune. Printed by Mr.Rajwardhan Gaddam, at Samarth Offset, Plot No. 18, Hingne home colony, Karvenagar, Pune - 411 052.

Pune : 07.05.09

RNI NO. : MAH MAR/2001/6694 & PNCW / M-161 / 2009-2011